**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९३९
निर्णय दिनांक: ०१-१२-२००९

१. श्री. माधव कोंडिबा बुक्तरे, : अपिलार्थी
रा.वाडी बु.ता.जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली
२. जन अपिलीय अधिकारी तथा,
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली
जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात पूर्णा सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांच्याकडे सन २००५-०८ या

कालावधीमध्ये अ.ब.क.ड या प्रवर्गातील कामाच्या निविदासंदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जास रु.१०/- इतक्या किमतीचा कोर्ट-फी-स्टॅम्प नसल्याचे अपिलार्थीस अवगत करुन त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात येऊन पाहण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचविल्याप्रमाणे कार्यवाही न करता, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.११.२००८ रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती हस्तांतरित केली. ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची पोचसही असलेली पावती आयोगास सादर केली. तथापि माहिती प्राप्त होऊनही अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी दि. २१.११.२००८ रोजी त्यांना व्यक्तिशः हस्तांतरित केली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती ही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सुसंगत असल्याचे

दिसून येत आहे.  या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याचे, प्राप्त माहितीवर त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे दि. २१.११.२००८ रोजी कबूल केले आहे. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर कोणतेही भाष्य आयोगाकडे यानंतर दि. २४.११.२००८ रोजी केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेले नाही. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन नाही, अशा निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. १९३९/०८, दि.२४.११.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०१-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. माधव कोंडिबा बुक्तरे, रा. वाडी बु. ता.जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९४०
निर्णय दिनांक: ०१-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. सय्यद मोईनोद्दीन सय्यद सैफोद्दीन इनामदार, औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा, मालमत्ता अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा, उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २१.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक ५२ इंदिरानगर मध्ये बांधलेले सभागृहाबाबत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - प्रभाग क्र.५२, इंदिरानगर सभागृह हॉल लिजवर केव्हा व कोणाला भाडेतत्त्वावर देण्यात आला. यासाठी आकारण्यात आलेले

भाडे, तसेच हॉल लिजवर देताना स्थानिक वृत्तपत्रामध्ये सूचना/टेंडर देण्यात आले होते का, सध्या ज्या व्यक्तीला हा हॉल लिजवर देण्यात आला, त्या व्यक्तीने केव्हा अर्ज दिला, तसेच या हॉलची एकूण जागा, चतु:सिमा इ.- या मुद्यांचा समावेश होतो.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत सविस्तर बिनचुक माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले तथापि माहिती प्राप्त होऊनही अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, या हॉलची एकूण जागा किती आणि हॉलच्या चतु:सिमा काय आहेत, या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या जागेसंदर्भातील माहिती,इमारत विभागाकडे उपलब्ध असण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस इमारत विभागाकडून घेऊन नंतर ती अपिलार्थीस देणे त्यांना शक्य आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना चतु:सिमा वगळता पूर्णपणे दिलेली आहे. अपिलार्थीने ज्या सभागृहाच्या चतु:सिमाबाबत जन

माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली त्या सभागृहाच्या पूर्णत्त्वाचा दाखला व नकाशा त्यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिल्यास अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या बांधकामाशी संबंधित चतु:सिमाचे माहिती समजू शकेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त विषयी अपिलार्थीने ज्या इमारतीच्या बांधकामाविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती, त्या इमारतीच्या पूर्णत्त्वाच्या नकाशाची प्रत त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत संबंधित विभागाशी संपर्क साधून विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील 'चतु:सिमा' या मुद्यावरील माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद मोईनोद्दीन सय्यद सैफोद्दीन इनामदार,न्यु बायजीपुरा, इंदिरानगर,गल्ली नं.११,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी,महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सिडको),महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९४१
निर्णय दिनांक: ०१-१२-२००९

१. श्री. अब्दुल रहेमान इस्माईल मलंग, : अपिलार्थी
रा. उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नगर परिषद कार्यालय, उदगीर, जि.लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा,
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,उदगीर,
जि.लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक,
नगर परिषद कार्यालय,उदगीर,
जि.लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे. याचे स्पष्टीकरण करताना त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना पंचनाम्याची प्रत मागितली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी अहवाल दिला असून पंचनाम्याची प्रत दिली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून दंड शिक्षा लावण्यात यावी. तसेच दिलेली माहिती संबंधित व्यक्तीशी संगनमत करुन कार्यालयात बसून दिली आहे म्हणून त्यांना ही माहिती खोटी वाटत आहे. तसेच या

पाहणी अहवालामध्ये साक्षीदाराचे नावे व पत्ते आढळून येत नाहीत. त्यामुळे या पाहणी अहवालास पंचनामा असे मानता येणार नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडील संचिका क्र. २९५/८५ घ.क्र. १-३-५८/१/४ शी संबंधित होती. यातील मुद्दा क्र. १ मध्ये श्री. मलंग नुरोद्दीन यांच्या खरेदीखतामध्ये विहिरीचा उल्लेख आहे काय? मुद्दा क्र. २ मध्ये श्री. मलंग नुरोद्दीन यांनी दि. १३.०६.२००८ रोजी श्री. मलंग अ.रहेमान यांच्याविरुध्द केलेल्या तक्रार अर्जाची सत्यप्रत व यासंदर्भात मुख्याधिकारी यांनी संबंधितांना पाठविलेली पत्रे किंवा नोटीस यांच्या प्रती व मुद्दा क्र. ३ द्वारे दि. १०.०१.२००५ रोजी श्री. निहाल अहमद मलंग यांच्या घर क्र. १-३-५८/१/४ यांच्या नामांतरासाठी दि. ०४.०१.२००५ रोजी जागेची मोजणी करण्यात आली, असून मोजणी अहवालाच्या प्रती व साक्षीदाराचे पूर्ण नाव व पत्ता असलेली प्रत.- अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.०८.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दि. ०९.०९.२००८ रोजी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०४.०७.२००८ व दि. ०९.०९.२००८ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त माहिती चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, याचे विवेचन केले आहे. त्यांच्या या विवेचनावरुन त्यांना मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे असलेल्या माहितीसाठीच्या मूळ प्रतीवरच आक्षेप असल्याचे आयोगास आढळून येत आहे. आयोगास असेही आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती त्यांना दिलेली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देणे मुळात, या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मूळ माहितीमध्ये अपिलार्थीस जर काही अनियमितता आढळून आली असेल तर त्यांनी ही अनियमितता दूर करण्याकरिता नगर परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे वेगळयाने तक्रार केल्यास अथवा संबंधित नस्तीची तपासणी केल्यास त्यांच्या शंकेचे निराकरण होण्यास मदत होईल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत

असल्याने या मुद्याव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी दिलेल्या संदर्भावरुन शोधून काढून त्यावरुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अब्दुल रहेमान इस्माईल मलंग,रा. दबीरपुरा, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय,उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९४४
निर्णय दिनांक: ०१-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अविनाश बालराज नगरे,<br>रा.जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद | | |

| | |
|---|---|
| विद्यमान जन माहिती अधिकारी : | उपविभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१,जालना |
| जन अपिलीय अधिकारी: | कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१,<br>जालना |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि.०१.१२.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये, त्यांचे विचाराधीन अपील क्र. १९४४/०८ हे ते स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद करुन त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपील आता मागे घेतले असल्याने त्यांची उपरोक्त विनंती मान्य करण्यात येऊन, अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. १९४४/०८, दि.२०.११.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अविनाश बालराज नगरे,रा. रंगार गल्ली, काद्राबाद, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९३७

निर्णय दिनांक ०१/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. हाजी मो. युसूफ कमाल,<br>रा.मालेगांव, जि.नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जनता को-ऑप.बँक लि., मालेगांव, जि. नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.०२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १५.११.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जनता को-ऑप. बँक लि., मालेगांव, जि.नाशिक यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर अर्जास संबंधित बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०३.१२.२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ हा त्यांच्या बँकेस लागू होत नसल्याने त्यांनी मागणी केलेला माहितीसाठीचा अर्ज नाकारण्यात येत असल्याचे कळविले. बँकेकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने परत जनता को-ऑप. बँक लि., मालेगांव, जि. नाशिक यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १९.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यानंतरही बँकेकडून माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व बँकेचे संबंधित अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित अपिलार्थी, बँक अधिकाऱ्यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.

अशाप्रकारे मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ संबंधित बँकेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १९३७ /०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हाजी मो. युसूफ कमाल, ७३९, बरकतपुरा, मालेगांव, जि. नाशिक.

२. जन माहिती अधिकारी, जनता को-ऑप. बँक लि., किदवाई रोड, मालेगांव, जि. नाशिक.

३. जन अपिलीय अधिकारी, जनता को-ऑप. बँक लि., किदवाई रोड, मालेगांव, जि.

नाशिक.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९३८
निर्णय दिनांक ०१/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख अहेमद इब्राहीम,<br>रा.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ शाखाधिकारी,<br>वसंतदादा नागरी सहकारी बँक मर्यादित,<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, उस्मानाबाद | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०९.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १६.०४.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे शाखाधिकारी, वसंतदादा नागरी सहकारी बँक मर्यादित, उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर अर्जास शाखाधिकारी, वसंतदादा नागरी सहकारी बँक मर्यादित यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३१.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. २६.०६.२००८ रोजीच्या आपल्या आदेशाव्दारे अपिलार्थीस हवी असलेली माहिती ७ दिवसात पुरविण्याबाबत बँकेस सूचित केले असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या

कागदपत्रांवरुन दिसून येते. परंतु त्यानंतरही हवी असलेली माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी शाखाधिकारी, वसंतदादा नागरी सहकारी बँक मर्यादित व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच सर्व उपस्थितांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.

अशाप्रकारे मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ संबंधित बँकेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. १९३८ /०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख अहेमद इब्राहीम, सांजावेस गल्ली, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा शाखाधिकारी, वसंतदादा नागरी सहकारी बँक मर्यादित, उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९४५
निर्णय दिनांक ०१/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विठ्ठल पांडुरंग काळम,<br>रा.कंधार, जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती, कंधार, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. विठ्ठल पांडुरंग काळम यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १५.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.१०.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२३.११.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २०३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. विठ्ठल पांडुरंग काळम, उस्माननगर, कंधार, ता.कंधार, जि.नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९३१

निर्णय दिनांक ०१-१२-२००९

१ श्री. अनिल विष्णू काळे, : अपिलार्थी

रा. भिमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता, महानगरपालिका,

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, महानगरपालिका,

औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी खोटी माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलांच्या सुनावणीच्या वेळी संबंधित जन अपिलीय अधिकाऱ्यांकडून त्यांची बाजू ऐकून न घेता त्यांच्यावर मानसिक दबाव निर्माण करुन, त्यांची सही घेऊन व खोट्या कारवाईचा अहवाल अपिलीय अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून दिला असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणूनही ही बाब अपिलीय अधिकाऱ्याने सुनावणीच्या वेळी विचारात घेतली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील भिमनगर भावसिंगपुरा दलितवस्ती सुधार योजनेअंतर्गत, महानगरपालिकाने हाती घेतलेल्या कामासंदर्भात व इतर मुद्यावर एकूण ८ मुद्याव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - भिमनगर भावसिंगपुरा येथील दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत घेतलेल्या कामाची अंदाजपत्रकीय किंमत, मंजुरी आदेश, निधी कोणत्या कामासाठी वापरण्यात आला, हा निधी किती व कोणत्या भागाकरिता व कसा वापरण्यात आला, वॉर्ड क्रमांक ७ मध्ये शासनाच्या मान्यतेप्रमाणे घोषित दलित वस्ती नकाशाची प्रत, भिम नगर भावसिंगपूरा येथे दलितवस्ती सुधार योजनेअंतर्गत येणा-या भागांची नावे व मनपा प्रशासनाकडून दलितवस्ती असल्याबाबतचे प्रमाणपत्राची प्रत, वार्ड क्रमांक ७ मधील शासनाच्या मान्यतेप्रमाणे घोषित केलेल्या नवीन वसाहती नाव व नकाशाची प्रत, आयुक्तांचे पत्र दिनांक २१-०२-२००८ वर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आणि या योजनेअंतर्गत काम करणारे ठेकेदारांचे देयक अदा करण्यात आले आहे का, बील देण्यात आले असेल तर त्याची प्रत, व देण्यात आले नसेल तर त्याचा सविस्तर तपशील - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या

शुल्काचा त्यांच्याकडे भरणा करण्याचे जन माहिती अधिकारी यांनी सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने दिनांक ०५-०९-२००८ रोजी पावती क्रमांक ३०१६६८ व्दारे या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करुन त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-१०-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील जो भाग प्रकल्प संचालकाकडे उपलब्ध आहे त्या भागाची माहिती देण्याचे सूचित केले. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व चूकीची माहिती प्राप्त झाली असल्याचे व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्याचे आयोगाने आदेशित करावे असा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक ०५-०९-२००८ रोजी त्यांच्याकडील सर्व उपलब्ध माहिती अपिलार्थीस हस्तांतरीत केली असून नगर रचना विभागाकडून त्यांना त्या विभागाशी संबंधीत माहिती प्राप्त झाली नाही .

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस माहिती देण्याचा या प्रकरणी निश्चितपणे प्रयत्न केला आहे. तथापि ही माहिती त्यांनी अपिलार्थीस प्रश्नांना उत्तरे द्यावीत अशा स्वरुपात दिलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास देण्याची कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात विनामूल्य देणे भाग आहे. तसेच या प्रकरणी असेही दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ४, ५ व ६ च्या संदर्भातील माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती, ती माहिती त्यांच्या प्राधिकरणाचा दुसरा भाग असलेल्या नगररचना कार्यालय यांच्याकडे उपलब्ध होती त्यामुळे या मुद्यावर माहिती देण्यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कार्यवाही करणे जास्त उचित ठरले असते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे व परिणामी अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांनाच ही माहिती संबंधित प्राधिकरणाकडून स्वतः प्राप्त करुन घेऊन नंतर ती वरील आदेशात दिलेल्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीस हस्तांतरीत करावी लागेल.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मूद्या क्रमांक १ व २ व्दारे त्यांनी मागणी केलेली माहिती ही ज्या कामावर प्रशासकीय मान्यतेचे आदेश उपलब्ध आहेत त्यामधील प्रशासकीय मान्यतेचे आदेश व आयुक्तांकडून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास मंजूर झालेल्या निधीच्या पत्राची प्रत या दोन मुद्दयावरील माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या कामाच्या प्रशासकीय मान्यतेच्या आदेशाची प्रत व या कामाकरिता आयुक्तांकडून प्राप्त झालेल्या मंजूर निधीच्या आदेशाच्या प्रती अपिलार्थीस द्याव्या लागतील. मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भात जन

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. त्यामुळे यावर आयोगाचे भाष्य नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात शासनाच्या अधिसूचनेची प्रत अपिलार्थीस देण्याऐवजी अथवा अपिलार्थीचा अर्ज प्रकल्प संचालकाकडे पाठविण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी या मुद्यावरील माहिती संदर्भात अपिलार्थीस प्रकल्प संचालकाच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. आता त्यांनी वार्ड क्रमांक ७ संबंधीच्या शासनाच्या आदेशाची प्रत अपिलार्थीस पुरवावी. मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस बरोबर माहिती दिलेली आहे. मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सहायक संचालक, नगररचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले त्याबाबत वर स्पष्ट केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांची ही कृती चूकीची आहे. मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात आयुक्तांच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी आयुक्तांनी पाठविलेल्या पत्रावर केलेली कारवाई आणि आयुक्तांकडे पाठविलेल्या अहवालाची प्रत आयोगास दाखविली. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी आयुक्तांना दिनांक २५-०२-२००८ रोजी त्यांच्याकडून पत्र क्रमांक ३३२९ प्रमाणे पाठविलेला हा अहवाल आयुक्तांना दिनांक २६-०२-२००८ रोजी ३८११ या क्रमांकाने प्राप्त झाल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, या अहवालासंदर्भात त्यांना आयुक्तांच्या स्वीय सहायकाकडून पत्र प्राप्त झाले असून या पत्रामध्ये आयुक्तांच्या स्वीय सहायकांने जन माहिती अधिकारी यांना अहवाल प्राप्त न झाल्याबद्दल स्मरणपत्र दिले आहे. हे पत्र दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या नंतरच्या कालावधीतील असल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकाऱ्यांकडून दिलेली माहिती खोटी वाटत आहे. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात आले की, या प्रकरणी आयुक्तांचे स्वीय सहायक यांनी अपिलार्थीस त्यांच्या पातळीवर परस्पर पत्रव्यवहार केलेला आहे. मूळात आयुक्तांचे स्वीय सहायक अशाप्रकारचा पत्रव्यवहार करण्यासाठी प्राधिकृत केले गेले आहेत किंवा कसे हे आवश्यक त्या प्राधिकार

आदेशाच्या प्रती अभावी आयोगास कळण्यास मार्ग नाही. त्यामुळे आयुक्तांच्या स्वीय सहायकाच्या या पत्राची दखल आयोग घेत नाही. कारण जन माहिती अधिकारी यांनी आयुक्ताकडे दिनांक २५-०५-२००८ रोजी अहवाल पाठविला आहे आणि आयुक्तांना तो दिनांक २६-०२-२००८ रोजी प्राप्त झाल्याचा योग्य तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. या मुद्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांचा दिनांक २५-०२-२००८ रोजीचा अहवाल आयुक्तांना दिनांक २६-०२-२००८ रोजी ३८११ या क्रमांकाने प्राप्त झाल्याबद्दलच्या महानगरपालिका आयुक्तांच्या आवक रजिस्टरची संबंधित प्रत, अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ मधील ठेकेदारांच्या बिलाची प्रत एवढ्याच मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. ही बिले ठेकेदारांना देण्यात आली आहेत का, या मुद्यावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय नाही, कारण अशा प्रकारची माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. अपिलार्थीने या बिलाच्या प्रतींमधील रकमेबाबत त्यांचे आक्षेप असल्याचा आयोगाकडे युक्तिवाद केला आहे. त्यांच्या मते या बिलामध्ये अनेक त्रुटी आहेत त्यामुळे ही माहिती त्यांना दिशाभूल करणारी आहे. यावर असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे. त्या स्वरुपात ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदारास देय होत असते. त्याचप्रमाणे या मुद्यावर संबंधित ठेकेदारांच्या बिलाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. या बिलावर जर अपिलार्थीची काही तक्रार असेल तर त्यांनी या तक्रारीचे निवारण औरंगाबाद महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकरणाकडून परस्पर करुन घ्यावे असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती यांचे केलेले पृथकरण पाहता जन माहिती अधिकारी यांना असे

आदेशित करण्यात येते की, वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची बाकी असलेली उर्वरित माहिती, त्यांनी संबंधित विभागाकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

प्रसंगावशात् आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना असे सुचित करण्यात येत आहे की, त्यांच्या कार्यालयातील स्वीय सहायकांनी या प्रकरणी ज्या प्रकारे अपिलार्थीशी पत्रव्यवहार केला आहे त्या अशा प्रकारच्या पत्रव्यवहाराच्या पध्दतीवर त्यांनी पुनर्विचार करुन योग्य तो निर्णय घ्यावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनिल विष्णू काळे, रा. भिमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९३२

निर्णय दिनांक ०१-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अर्जुन साहेबराव नवपुते,<br>मु. पो. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तथा सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>फुलंब्री, मुख्यालय औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम<br>मंडळ, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षातः | जन माहिती अधिकारी | : | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फुलंब्री, मुख्यालय, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी असेही नमूद केले आहे की, ते सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद या कार्यालयात ज्या ज्या कर्मचाऱ्यांना भेटले त्या कर्मचाऱ्यांनी काहीना काही बहाणा करुन त्यांना माहिती देण्याचे टाळले. तथापि या संदर्भातील कोणताही ठोस पुरावा त्यांनी या अर्जासोबत जोडलेला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील फुलंब्री उपविभागामध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या एकूण ५ रस्त्याच्या कामासंदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या पाचही रस्त्याच्या अंदाजपत्रकांच्या मोजमाप पुस्तिकांच्या व मजूर हजेरी रजिस्टरच्या प्रती, या कामाचे जाहीर प्रकटन ज्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाले त्या वृत्तपत्राची छायांकीत प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने हा अर्ज कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना उद्देशून केला असून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही उप अभियंता स्तरावर व त्यांच्या कार्यालयातील लेखापाल स्तरावर उपलब्ध असल्याने, त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जाची प्रत संबंधितांना दिनांक १८-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठवून अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यानंतरही अपिलार्थीस ही माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर अधीक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी नेहमीप्रमाणे त्यांचे सहायक अधीक्षक अभियंता यांच्यामार्फत अवैध आदेश जारी केले व अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. आयोगाने अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना यापूर्वी वेळोवेळी सूचना देऊनही अशाप्रकारच्या प्रकरणी त्यांच्याकडे दाखल झालेल्या प्रथम अपिलाच्या अर्जाचा निर्णय त्यांनी स्वतःच्या सहीने पारीत न करता सहायक अधीक्षक अभियंता या पदावरील व्यक्तिच्या स्वाक्षरीने हे आदेश पारित केले. या आदेशामध्ये कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाकडून उपविभागीय अभियंता व या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस परस्पर माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे विहित मुदतीत तयार होती. तथापि अपिलार्थी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांच्या कार्यालयामध्ये अपिलार्थी ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः कधीही उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे त्यांनी दिनांक २०-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून उपलब्ध करुन घेण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे दिनांक २२-०९-२००९ रोजी अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले असता, त्यांनी ही माहिती स्विकारण्याचे नाकारले, माहिती नाकारण्याचे कारण अपिलार्थीने त्यांना दिले नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मोठी व्याप्ती असलेली माहिती व्यक्तिशः मागितली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ही माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्व कशा प्रकारे पार पाडले आहे या संदर्भातील कोणताही सबळ पुरावा अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही अथवा यासंदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेली माहिती सकृतदर्शनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून त्यांनी मागणी केलेली माहिती कोणत्याही असद्हेतूने दडविली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. उलट अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्वीकारली नाही या जन माहिती अधिकाऱ्यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०८-२००९ व २०-११-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती पाठविल्याचे आयोगास अवगत केले आहे. सबब अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, अद्यापही त्यांना जर या प्रकरणी त्यांनी मागितलेली माहिती आवश्यक असेल तर त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून त्यांच्याकडून ती हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी यांचा कोणताही प्रतिनिधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राधिकृत करणे त्यांना अनुज्ञेय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अर्जुन साहेबराव नवपुते, मु. पो. घारदोन, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फुलंब्री, मुख्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९३३

निर्णय दिनांक ०१-१२-२००९

१ श्री. दशरथ एन. सुरडकर, : अपिलार्थी
रमानगर, नर्सरीजवळ, टिळकनगरच्या बाजूला,
जैनोद्दीन कॉलनी, सिल्लोड, तालुका सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो माहिती न दिल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सिल्लोड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या विकासात्मक कामाबाबत एकूण नऊ मुद्दयाव्दारे सन २००४ ते दिनांक ३०-०६-२००८ पर्यंतच्या कालावधीतील विस्तृत प्रमाणात माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी मागितलेली माहिती ग्रामपंचायतीशी संबंधित असल्यामुळे ती माहिती ग्रामपंचायतीकडून उपलब्ध करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना अद्यापपावेतो एक ग्रामपंचायत सोडून बाकीच्या इतर सर्व ग्रामपंचायतीनी माहिती दिली नाही असे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक ३०-०६-२००८ रोजीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक ०५-०७-२००८ रोजी अपिलार्थीस त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतीकरिता ग्रामसेवक व ग्रामविकास हे माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले असल्यामुळे अपिलार्थीस ग्रामपंचायतीकडे अर्ज करण्याचे सूचित केले होते. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिले आहे.

वरील घटनाक्रम, दोनही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ९ मुद्दयाव्दारे माहिती मागितली आहे. त्यापैकी मुददा क्रमांक १ व मुद्दा क्रमांक २ अंशतः "............ ग्रामपंचायतीने ५ वर्षामध्ये त्या त्या मागासवर्गीय वस्तीमध्ये खर्च केला काय ? ही, मुद्दा क्रमांक ७ व्दारे निवडणूका होऊन अस्तित्वात आल्या त्या ग्रामपंचायतीने गावविकासात्मक केलेल्या संपूर्ण कामाची योजनेनिहाय माहिती या विषयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही कारण ही मागितलेली माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत आहे व या मुद्दयाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मोघम स्वरुपात माहिती मागितली आहे असे दिसून येत आहे. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ अंशतः ग्रामपंचायतीने पाच वर्षामध्ये त्या त्या मागासवर्गीय वस्तीमध्ये खर्च केला काय आणि पाच वर्षापर्यंत खर्च केलेला निधी या मुद्दयावरील माहिती वगळता उर्वरित मुद्दा क्रमांक ३, ४, ५, ६, ८ व ९ ही माहिती अपिलार्थीस अंशतः देय होते. अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधित ग्रामपंचायतीकडे पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. परंतु त्यांनी अशा प्रकारची कृती न करता

अपिलार्थीशी  सरळ पत्रव्यवहार करुन अपिलार्थीस संबधित ग्रामपंचायतीकडून माहिती घेण्याचे सूचित केले ही त्यांची चुक आहे.  जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्यही केले होते त्यामुळे आता जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांनी वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संबंधित ग्रामपंचायतकडील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या विनामूल्य उपलब्ध होईल असे पहावे.  या कालावधीत संबंधित ग्रामसेवकाने माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर त्यांच्यावर आवश्यक वाटल्यास जन माहिती अधिकारी यांना प्रचलीत सेवानियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही सक्षम प्राधिकरणाकडे प्रस्तावित करण्याची मुभा राहील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली संबंधित ग्रामपंचायतींची  संपूर्ण माहिती तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दशरथ एन. सुरडकर, रमानगर, नर्सरीजवळ, टिळकनगरच्या बाजूला, जैनोद्दीन कॉलनी, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९३४

निर्णय दिनांक ०१-१२-२००९

१ श्री. दिपक बाबुराव वाघ, : अपिलार्थी

व्दारा, श्री. बी. पी. वाघ,

जिजाऊ नगर (धनगरवाडी), नवे भोकरदन,

तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सचिव / मुख्याध्यापिका,

आर्य हिंदी विद्यालय (प्राथमिक विभाग),

डॉ. राजेंद्रप्रसाद मार्ग, जालना, तालुका जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापिका, आर्य हिंदी विद्यालय (प्राथमिक विभाग), डॉ. राजेंद्रप्रसाद मार्ग, जालना, तालुका जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांच्या आदेशानंतर शिक्षण संस्थेच्या सचिवाकडे दिनांक २९-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले असता बेजबाबदार उत्तरे देऊन त्यांचे अपील संस्थेच्या सचिवांनी न स्वीकारल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे मूळ सेवापुस्तक व पाचव्या वेतन आयोगाच्या थकीत बाकीसंदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे नोंदणीकृत टपालाने काही माहिती मागितली होती. तथापि ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, आर्य हिंदी विद्यालय (प्राथमिक विभाग), जालना यांनी, अपिलार्थीने राजीनामा शुल्क भरले नसल्यामुळे नाकारली. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे दिनांक १३-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, जालना यांनी दिनांक १८-१०-२००८ रोजी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज संबंधित संस्थेकडे पाठविला. हा अपील अर्ज संस्थेचे सचिव हे अपिलीय अधिकारी असल्याने शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांच्याकडून पाठविल्याचे आयोगास आढळून येत आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याच्या जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/ २००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या पत्रकाव्दारे प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील

शिक्षणाधिकारी यांना शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे. परंतु या प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी चुकीच्या गृहीतकावर अपिलार्थीस प्रथम अपील अर्ज त्यांच्या दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे संस्थेकडे करण्याचे सूचित केले. ही जन अपिलीय अधिकारी यांच्या हातून झालेली चूक आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिपक बाबुराव वाघ, व्दारा, श्री. बी. पी. वाघ, जिजाऊ नगर (धनगरवाडी), नवे भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, आर्य हिंदी विद्यालय (प्राथमिक विभाग), डॉ. राजेंद्रप्रसाद मार्ग, जालना, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९३५

निर्णय दिनांक ०१-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेषराव गणपतराव जोगदंड,<br>व्दारा- प्रल्हादराव शिंदे, मारोती मंदिराजवळ,<br>लोकमान्यनगर, परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,<br>औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व तसेच जन अपिलीय अधिकारी

यांना त्यांचे प्रलंबीत सेवेतील वेतन व निवृत्ती वेतन मिळण्याचे आदेश द्यावेत अशी विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या वेतन आणि सेवानिवृत्ती वेतनासंदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - उर्वरित काळातील वेतन व सेवानिवृत्ती वेतन लाभ महाराष्ट्र शासनाकडून त्यांना केव्हा मिळेल ठामपणे सांगणे, उर्वरित कालावधीचे वेतन व सेवानिवृत्ती लवकर अदा करावे, प्रकरणात सद्यस्थिती काय आहे, प्रलंबीत काळातील वेतन व पेन्शन कायदेशीररित्या मंजूर कराल काय व केव्हा - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनांक २५-०८-२००८ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाला. या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, परभणी यांना उद्देशून दिनांक १०-०९-२००८ रोजी एक पत्र लिहिले व त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती शिक्षणाधिका-याकडून पुरविली व या पत्रातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३१ इतके त्यांना शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा दिनांक १६-०९-२००८ रोजी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, परभणी शाखा मध्ये केला. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-१०-२००८ रोजी माहिती दिली. परंतु या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने त्यांना मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना हवी असल्याचा युक्तिवाद आयोगा-समोर केला व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-१०-२००८ रोजी माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोनही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मे १९७४ ते त्यांनी प्रथम अर्ज केलेल्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील वेतन व सेवानिवृत्ती वेतनासंदर्भात मा. उपराष्ट्रपती भारत सरकार यांच्याकडे अर्ज करुन ते मंजूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाला आदेश जारी करण्याबाबत विनंती केली होती. यासंदर्भात अपिलार्थीने महाराष्ट्र शासनाशी पत्रव्यवहार देखील केला होता. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागातील कक्ष अधिका-याने दिनांक ०९-०५-२००८ रोजीच्या पत्राने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अपिलार्थीच्या अर्जाची तपासणी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्याचे दिनांक ०९-०८-२००८ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालकास कळविले आहे. यासंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंतर्गत त्यांचे दिनांक १५-०८-२००८ रोजीच्या अर्जाचे अवलोकन करता या अर्जाव्दारे अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण ३ मुद्दयापैकी त्यांच्या प्रथम अर्जातील मुद्दा क्रमांक 'सी' च्या उप मुद्दा मधील "त्यांच्या संदर्भीत अर्जाची सद्य:स्थिती" ही माहिती वगळता उर्वरित कोणत्याही मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. कारण मूळात अपिलार्थीने या उर्वरीत तीन मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून भविष्यकाळातील माहिती मागितली होती. ती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या

" माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णतः विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती प्रत्यक्षात उपलब्ध आहे अशी माहिती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. भविष्यकाळामध्ये जन माहिती अधिकारी हे काय कार्यवाही करणार ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मूळ अर्ज करतेवेळी, वर्तमानकाळात, उपलब्ध असणे कोणत्याही प्रकारे संभवत नाही. त्यामुळे या मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. परंतु अपिलार्थीने त्यांच्या सेवानिवृत्तीविषयक गा-हाण्यासंदर्भात त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या मा. उप राष्ट्रपती सचिवालय व शालेय शिक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिनांक १५-०८-२००८ पर्यंत केलेली कार्यवाही ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संदर्भीय विषयावर/पत्रावर त्यांच्या कार्यालयाने केलेली कार्यवाही ही माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत त्यांना उपलब्ध करुन द्यावी असे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेषराव गणपतराव जोगदंड, व्दारा- प्रल्हादराव शिंदे, मारोती मंदिराजवळ, लोकमान्यनगर, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९३६

निर्णय दिनांक ०१-१२-२००९

१ श्री. मोहंमद इसाक अन्सारी, : अपिलार्थी

तबस्सुम कॉटेज, एकबालनगर, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक,

मॉडेल उर्दू हायस्कूल, दर्गा रोड, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,

परभणी

त्रयस्थ पक्ष : श्रीमती शाहेदा सुलताना अन्सारी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये

मुख्याध्यापक, मॉडेल उर्दू हायस्कूल, परभणी यांच्याकडे त्यांच्या शाळेत झालेल्या शिक्षकांच्या नियुक्तीसंदर्भात एकूण सहा मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही शिक्षकांच्या नियुक्तीच्या पदासंदर्भात होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, परभणी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात कोणतीही कागदपत्रे आयोगास दाखविता आली नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेऊन आदेश पारीत करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, परभणी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०१-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहंमद इसाक अन्सारी, तबस्सुम कॉटेज, एकबालनगर, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मॉडेल उर्दू हायस्कूल, दर्गा रोड, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९४३
निर्णय दिनांक: ०१-१२-२००९

१. श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे, : अपिलार्थी
रा.पारगाव घुमरा, ता.पाटोदा,जि.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
बंकटस्वामी विद्यालय,खडकी (घाट),
ता.जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बीड
प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०७.२००८ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, बंकटस्वामी विद्यालय, खडकी (घाट), जि.बीड यांच्याकडे त्यांच्या

विद्यालयाशी संबंधित एकूण तीन मुद्यांवर माहिती पोस्टाने मागितली होती. तथापि मुख्याध्यापकाकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०१.०२.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.०२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित त्यांचे प्रथम अपील संस्थेच्या सचिवांकडे करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने त्याप्रमाणे कार्यवाही न करता, वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या दि. ०१.०२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेणे आयोगास आवश्यक वाटते, तथापि शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांकःसंकीर्ण /केंमाअ /२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांची आता जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे. सबब या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांनी अपिलार्थीच्या दि. ०१.०२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०१.०२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०१-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे, रा.पारगाव घुमरा, ता.पाटोदा, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,बंकटस्वामी विद्यालय,खडकी (घाट),ता.जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९५५

निर्णय दिनांक: ०२.१२.२००९

१ श्री. मो. मोईज खान पठाण, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
(परीक्षा विभाग), नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपकुलसचिव,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
(परीक्षा विभाग), नांदेड

जन अपिलीय अधिकारी : परीक्षा नियंत्रक,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
(परीक्षा विभाग), नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.११.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी कायद्याचे खोटे संदर्भ देऊन माहिती दडविली, त्यांना अपमानास्पद वागणूक दिली व परस्परविरोधी धोरण ठेवून माहिती अधिकार अधिनियमाचे उल्लंघन केले असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील शैक्षणिक वर्ष जानेवारी २००८ ते दिनांक ११.०७.२००८ या कालावधीशी संबंधित एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - गुण पडताळणी प्रक्रियेमध्ये या कालावधीत बदल झालेल्या विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिकेच्या सत्यप्रती, तपासणी व पडताळणी प्रक्रियेमधील संबंधितांची यादी व परीक्षा विभागाच्या संपूर्ण नियमावलीची सत्यप्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पाठविली. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केल्याचे कारण दर्शवून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १४.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत आवश्यक ती माहिती पुरविल्याचे अनुमान काढून, अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील दाखल केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी, यांचे वकील उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पुरविलेली आहे व जी माहिती अपिलार्थीस अधिनिमातील तरतूदीनुसार देय नाही ती त्यांनी सकारण नाकारली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे ज्या विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये, पडताळणी प्रक्रियेमध्ये बदल झाला आहे त्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती मागितल्या होत्या. या मुद्यावर आयोगाने तसेच मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी निर्णय दिले असून त्यामध्ये कोणत्याही विद्यार्थ्याला त्यांच्या तपासणी केलेल्या उत्तरपत्रिका प्राप्त करुन घेणे हा त्यांचा हक्क नसल्याच्या कारणावरुन, उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती उघड करण्याचे नाकारले आहे. राज्याच्या माहिती आयोगाच्या खंडपीठाने देखील याच भूमिकेशी सुसंगत अशी भूमिका स्वीकारुन उत्तरपत्रिकांच्या प्रती अर्जदारास देता येणार नाहीत, असे निर्णय दिलेले आहेत. हे पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे तपासणी व पडताळणी प्रक्रियेमधील संबंधितांची यादी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ८ (१) (छ) च्या तरतुदीस अनुसरुन, ही माहिती अपिलार्थीस देण्याचे नाकारले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर आहे. विद्यापीठामध्ये उत्तरपत्रिकेची तपासणी व नंतर गुणांची पडताळणी करणे हे काम गोपनीय स्वरुपाचे आहे व त्यांची स्थिती जर उघड केली तर संबंधितांच्या जीवितास हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारण्याची घेतलेली भूमिका ही आयोगाच्या दृष्टीने बरोबर आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ द्वारे परीक्षा विभागाची संपूर्ण नियमावलीची सत्यप्रत, अशी माहिती जन माहिती

अधिकारी यांच्याकडून मागितली आहे. परंतु 'संपूर्ण नियमावली' म्हणजे कोणत्या मुद्यासंदर्भात कोणत्या विषयाशी संबंधित माहिती त्यांना अपेक्षित आहे यावर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये कोणतेही भाष्य केलेले नाही. अपिलार्थीने या मुद्याद्वारे मागणी केलेली माहिती अशाप्रकारे मोघम स्वरुपाची असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, देय होत नाही. परंतु एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०९.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, त्यांनी अपिलार्थीच्या अर्जातील या मुद्यावर विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या सामुहिक परीक्षा संदर्भातील सर्व नियमावलीची प्रत अपिलार्थीस पुरविली आहे. यावरुन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी हेतूतः दडविली असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नाही. अपिलार्थीस माहिती नाकारताना जन माहिती अधिकारी यांनी जी कारणे दिली आहेत, ती अधिनियमातील तरतुदींशी व वास्तवाशी सुसंगत आहेत. त्यामुळे अपिलार्थीचा त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील, - जन माहिती अधिकारी यांनी कायद्याचे खोटे संदर्भ देऊन, माहिती दडविली,- हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीस अपमानास्पद वागणूक दिली असे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले. तथापि त्यांनी अपमानास्पद वागणूक दिल्यासंदर्भात कोणताही पुरावा आयोगास त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत सादर केलेला नाही. तसेच या मुद्यावर तोंडी भाष्य करण्यासाठी देखील अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातही असेच म्हणता येईल. आयोगास विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी विद्यापीठाने या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर कायद्याचे उल्लंघन केलेले नाही. अशाप्रकारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील त्यांनी आयोगास केलेली विनंती आणि आयोगाचे वरील

अभिप्राय लक्षात घेता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२.१२.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मो. मोईज खान पठाण, द्वारा राम संगनवार,'ओम निवास', प्र. नि. हा. शाळेजवळ, कैलासनगर, नांदेड- ४३१ ६०५.

२ जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (परीक्षा विभाग), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९५६

निर्णय दिनांक : ०२.१२.२००९

१. श्री. शेख वहाबोद्दीन शेख करिमोद्दीन, : अपिलार्थी
रा. तळेगांव, ता.उमरी, जि. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, भोकर, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, विभाग भोकर, जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१.१०.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी सहायक अभियंता तथा जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मंडळ, भोकर उपविभाग यांच्याकडे दिनांक ०१.०८.२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज केला असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६.०८.२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि ही माहिती अपूर्ण व चुकीची असल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतूदीनुसार दिनांक ०५.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील उमरी तालुक्यामध्ये सन १९९० ते दिनांक ०१.०८.२००८ या कालावधीमध्ये किती जमीनधारकांनी विहिरीवर मोटार बसविण्यासाठी व बोअरसाठी विद्युत पुरवठा जोडणीसाठी कोटेशन भरले त्या सर्व शेतकऱ्यांची नावे, शेतीचा गट क्रमांक, अर्ज केल्याची तारीख, कोटेशन मंजूरीची तारीख, एच. पी. करिता विद्युतपंप बाबतची कोटेशनाची रक्कम, कोटेशनासोबत लावलेल्या कागदपत्राच्या नकला, मौजे तळेगाव,ता.उमरी येथील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाअंतर्गत दिनांक ०१.०८.२००८ पर्यंत किती जमीनधारकांनी विद्युत मोटार बसविण्यासाठी विद्युत पुरवठा जोडण्यासाठी कोटेशन भरले त्या सर्व शेतकऱ्यांची कोटेशन सोबत लावलेल्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११६/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २६.०८.२००८ रोजी आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, भोकर, जि.नांदेड यांच्याकडे दिनांक ०५.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, त्यांनी आपला लेखी युक्तिवाद फॅक्सद्वारे आयोगास सादर केला असून,या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने त्यांना अपूर्ण व चुकीची माहिती दिलेली आहे. त्यांनी यामध्ये पुढे, त्यांच्या दिनांक ०१.०८.२००८ रोजीच्या अर्जाप्रमाणे योग्य व अचूक माहिती मिळवून देण्याची व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची विनंती त्यांनी आयोगास केली आहे व तसेच या प्रकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य नीटपणे पार न पाडल्याचे देखील आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिनांक २६.०८.२००८ रोजी सशुल्क पुरविली आहे. त्यांनी मागणी केलेल्या माहितीमधील अर्ज केलेल्या शेतकऱ्यांनी त्यांच्या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या नाहीत. कारण या कागदपत्रांच्या पृष्ठाची संख्या अंदाजे ३०,०००/- इतकी होईल. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील फक्त २००१ पासूनचीच माहिती उपलब्ध आहे. त्यापूर्वीची माहिती, सदर माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी संपुष्टात आला असल्यामुळे नष्ट करण्यात आला असण्याची शक्यता आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीचा लेखी युक्तिवाद, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सन

१९९० ते दिनांक ०१.०८.२००८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सन २००१ पासून पुढील माहिती दिलेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जर काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने ही माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी व्यपगत झाल्याने नष्ट केली असेल तर त्यांनी त्याप्रमाणे अपिलार्थीस पुराव्यासह कळवावे. तसेच अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये शेतकऱ्यांनी कोटेशनसाठी अर्ज केल्याची तारीख व शेतकऱ्यांनी किती एच.पी. करिता अर्ज केला होता याची माहिती अपिलार्थीस दिलेल्या मुद्यामध्ये समाविष्ट नाही. यावरुन असे निःसंशयपणे सिध्द होत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती दिली आहे. अपूर्ण माहिती देऊनही अपिलार्थीकडून ११६ रु. इतके माहितीपोटीचे शुल्क स्वीकारले आहे. अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरवून जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केला असल्यामुळे त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे त्यांनी स्वीकारलेले शुल्क रु. ११६/- इतके अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी अथवा वरील भागात स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती नष्ट केल्याचा पुरावा द्यावा. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत संपूर्ण माहिती न पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नांदेड यांना त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकृत केलेले शुल्क रु. ११६ /- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसाच्या आत परत करावे.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

४. जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नांदेड यांना त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२.१२.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख वहाबोद्दीन शेख करिमोद्दीन, रा. तळेगांव, ता.उमरी, जि. नांदेड-४३१ ८०७.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग भोकर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग भोकर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९५७
निर्णय दिनांकः ०२-१२-२००९

१. श्री. अशोक व्यंकटी पांपटवार, : अपिलार्थी
रा.मुखेड, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता,
उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ,उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद
त्रयस्थ पक्ष : श्री. बी.आर.मामीडवार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील अमान्य केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. बी.आर.मामीडवार यांच्या दि. ११.०९.१९९६ ते दि. २२.०७.१९९८ या कालावधीमधील गोपनीय अहवालाच्या छायाप्रतींची मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पीड पोस्टाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीचे गोपनीय अहवाल त्यांच्या कार्यालयात कसे उपलब्ध नाहीत याचे सविस्तर विवेचन अपिलार्थीस दिले.जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २०.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी त्रयस्थ पक्षासह आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास अवगत केली. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती मागविली आहे, त्या त्रयस्थ पक्षाचे गोपनीय अहवाल जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून त्यांच्या वरिष्ठांना वेळेत उपलब्ध न झाल्याने त्रयस्थ पक्षाच्या पदोन्नतीची संधी त्यांना गमवावी लागली आणि परिणामी त्यांना कमी सेवानिवृत्तीवेतन प्राप्त झाले व त्यांची मोठया प्रमाणात आर्थिक हानी सोसावी लागत आहे आणि यापुढेही होणार आहे. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाचे गोपनीय अहवाल त्यांच्या विभागातून गहाळ झाल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या गोपनीय अहवालाच्या प्रतींची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे. शासकीय यंत्रणेमध्ये प्रत्येक कर्मचाऱ्याच्या वार्षिक कामकाजाचे मूल्यमापन गोपनीय अहवालाद्वारे केले जाऊन प्रत्येक स्तरावरील अधिकारी त्यांच्या हाताखालील कर्मचाऱ्यांना कामाचे मूल्यांकन स्वतःच्या पातळीवर, स्वतः, करुन हे मूल्यांकन गोपनीय अहवालाच्या स्वरुपात त्यांच्या वरिष्ठांकडे सादर केले जाते. या मूल्यांकनाच्या आधारे सर्व कर्मचारी/अधिकाऱ्यांची पदोन्नती होत असते व त्याअनुषंगाने संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना आर्थिक लाभ वेळोवेळी प्राप्त होत असतात. त्रयस्थ पक्षाचे गोपनीय अहवाल हे त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने लिहून सक्षम प्राधिकरणाकडे एका विशिष्ट विश्वासाने पाठविलेले असतात. अशाप्रकारे दरवर्षी हाताखालील कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल वरिष्ठांना सादर करण्याच्या कृतीद्वारे गोपनीय अहवाल लिहीणारे अधिकारी आणि हे गोपनीय अहवाल ज्या पातळीवरील अधिकाऱ्याकडे उपलब्ध आहेत त्या अधिकाऱ्यामध्ये एकप्रकारचे विश्वासाश्रित संबंध प्रस्थापित होत असतात. अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे ही माहिती उघड केल्याने या विश्वासाश्रित संबंधांना निश्चितपणे बाधा पोचून अधिनियमातील कलम ८ (१)(ज) मधील तरतुदीस बाधा पोहोचत असल्याने, ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उघड करता येणार नाही. तथापि केवळ गोपनीय अहवाल उपलब्ध नसल्याने श्री. बी.आर.मामीडवार या त्रयस्थ पक्षाला जलसंपदा विभाग, उस्मानाबाद येथील कार्यालयाच्या ढिसाळ प्रशासनामुळे आर्थिक हानी सहन करावी लागणार आहे, याबाबत एक विशेष बाब म्हणून सचिव (जलसंपदा) यांनी वैयक्तिक लक्ष पुरवून या प्रकरणाशी संबंधित त्रयस्थ पक्ष श्री. बी.आर.मामीडवार यांच्या प्रकरणाचा सहानभूतीपूर्वक विचारा करावा, असे आयोगातर्फे त्यांना

सूचविण्यात येत आहे. या सूचना जलसंपदा विभागाच्या सचिवांना अधिनियमातील कलम १९(८)(क)(चार) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहेत.

अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मूळातच जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नसल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०२-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक व्यंकटी पांपटवार,मु.पो. वेताळगल्ली, मुखेड, ता.मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता,उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा), मंत्रालय,मुंबई ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९५८
निर्णय दिनांकः ०२-१२-२००९

१. श्री. विजयकुमार भगवान शिंदे : अपिलार्थी
रा.परंडा, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अधिकारी,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
उपविभाग परंडा, जि.उस्मानाबाद.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,
औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील करुनही त्यांना विहित मुदतीत जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व उपअभियंता, परंडा यांच्यावर कसलीही कारवाई न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०९.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३००/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दि. १४.०५.२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणा केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि. १३.०६.२००८ व १६.०६.२००८ रोजी अशी दोन टप्प्यात माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त माहितीवर आक्षेप घेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीची कडक कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दि. ०२.०७.२००८ रोजीच्या निर्णयाद्वारे सूचित केले. यानंतर या निर्णयाचे अनुपालन म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १५.०७.२००८ व १८.०७.२००८ रोजी माहिती देऊ केली असता, ती साक्षांकित स्वरुपात नसल्याचे कारण दर्शवून ती माहिती स्वीकारण्याचे नाकारले व तदनंतर अपिलार्थीच्या म्हणण्याप्रमाणे दि. २४.०७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस साक्षांकित माहिती देण्याचा प्रयत्न केला. तथापि ही माहिती अपिलार्थीने स्वीकारली किंवा कसे, हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून टप्प्याटप्प्याने माहिती मिळाली असून, ही माहिती त्यांना प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रु.३००/- इतके शुल्क भरावे लागले व शुल्क भरल्यानंतर देखील अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविली नसल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. १३.०६.२००८, १६.०६.२००८ रोजी सशुल्क माहिती पुरविली आहे व नंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे उर्वरित माहिती दि. १५.०७, १८.०७ व २४.०७.२००८ रोजी देऊ केली तथापि ही माहिती घेण्याचे अपिलार्थीने नाकारले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. त्याप्रमाणे अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २९.०५.२००८ रोजी उपस्थित राहूनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दि. २९.०५.२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही संपूर्ण माहिती प्राप्त झाली नाही, असे सिध्द होत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा दि. १४.०५.२००८ रोजी भरणा केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १६.०५.२००८ रोजी  अगर तत्पूर्वी माहिती प्राप्त होणे क्रमप्राप्त होते. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दि. १३.०६.२००८ रोजी म्हणजेच, अधिनियमाद्वारे सशुल्क माहिती देण्यासाठी विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर, माहिती

पुरविली. त्यामुळे अपिलार्थीकडून स्वीकारलेले शुल्क रु.३००/- इतके त्यांना अपिलार्थीस परत करावे लागेल. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम त्यांच्याकडून माहितीपोटीचे संपूर्ण शुल्क स्वीकारुनही अपूर्ण माहिती दिल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. कारण जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०२.०७.२००८ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये अपिलार्थीस उर्वरित माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे झालेल्या सुनावणीमध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता पूर्ण माहिती मिळाल्याचे कबूल केल्यामुळे, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः ०२-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजयकुमार भगवान शिंदे, व्दारा-अध्यक्ष, वकील संघ, परंडा, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),उपविभाग परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), प्रादेशिक कार्यालय, बंगला नं.१२, पुणे-०६ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९५९
निर्णय दिनांक: ०२-१२-२००९

१. श्री. संजय दत्तराव कदम, : अपिलार्थी
रा.गौळबाजार, ता.कळमनुरी
जि.हिंगोली.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद शिक्षण समिती प्राथमिक शाळा,
गौळबाजार, ता.कळमनुरी, जि.हिंगोली.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली.

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
: जिल्हा परिषद,हिंगोली.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली आहे व त्यांच्या दि. १२.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. गौळबाजार येथील शिक्षण समिती व प्राथमिक विद्यालयासंदर्भात विस्तृत स्वरुपाची माहिती मागविली होती. सदरची माहिती त्यांना शाळेच्या मुख्याध्यापकांनी दि. ०४.०८.२००८ रोजी सशुल्क उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा दि. १२.०८.२००८ चा प्रथम अपील अर्ज गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी यांना उद्देशून केला होता. प्रत्यक्षात शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण/ केंमाअ/ २००७/ ६३५२७/१५ क्र. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांची आता जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे. सबब गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी प्रथमतः अपिलार्थीच्या दि. १२.०८.२००८ रोजीच्या त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रथम अपील अर्जाची प्रत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.हिंगोली यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत पाठवावी. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली तथा या

प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. १२.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत त्यांच्याकडे प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दि.१२.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत त्यांच्या कार्यालयास प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०२-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय दत्तराव कदम,मु.पो.गौळबाजार, ता.कळमनुरी,जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शिक्षण समिती प्राथमिक

शाळा,गौळबाजार, ता.कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९६०
निर्णय दिनांकः ०२-१२-२००९

१. श्री. अली अहेमद खान पिता मुसाखान, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
उपनिबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय,
औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपनिबंधक सहकारी संस्था,
तालुका औरंगाबाद.

त्रयस्थ पक्ष : नुतन सहकारी गृहनिर्माण संस्था,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना नुतन सहकारी हाऊसिंग सोसायटी लि. या संस्थेने अपूर्ण व खोटी माहिती दिल्याने आणि माहिती दडवून माहिती अधिकाराचा भंग केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, यासंदर्भात सहकारी गृहनिर्माण संस्थेने अपूरी माहिती दिल्याबद्दल व माहिती दडवून ठेवल्याबद्दल त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करावी आणि अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय,औरंगाबाद यांच्याकडे नुतन सहकारी गृहनिर्माण संस्था, नुतन कॉलनी, औरंगाबाद यांच्या संदर्भात सन १९५८ ते १९७८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी त्यांच्या दि. २४.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस संबंधित संस्थेच्या सचिवांकडे त्यांचा अर्ज पाठविण्यात येत असल्याचे कळविले व या पत्राची प्रत अध्यक्ष व सचिव, नुतन गृहनिर्माण संस्था, औरंगाबाद यांच्याकडे पाठवून दिली. तथापि यानंतरही कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार परत उपनिबंधक सहकारी संस्था, ता.औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. उपनिबंधक सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. २५.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळाल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि प्राप्त माहिती अपूरी व खोटी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी त्रयस्थ पक्षासह आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगाने त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती

देण्याचे संबंधित संस्थेस, आयोगाने आदेशित करणे अपेक्षित आहे, असे आढळून येत आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून माहिती मिळाली आहे. तसेच यासंदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ३६४८/२००७ मध्ये श्री बालाजी सहकारी स्पिनींग मिल्स म.रिसोड,जि.वाशिम विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर या प्रकरणामध्ये दि. ०२.०३.२००९ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

**"It is the contention of the petitioner that the petitioner Co-Operative Society is not a Public Authority and, therefore, Right to Information Act, 2005 is not applicable to the petitioner and, therefore, respondent no.6 could not pass any such order. When the matter is taken up for hearing, learned counsel for the parties concede that this point is squarely covered by judgment of this Court in Writ Petition No.5666/2007; Dr.Panjabrao Deshmukh Urban Co-Operative Bank Ltd., Amravati ..vs.. The State Information Commissioner, Vidarbha Region, Nagpur and Ors., dated 13.01.2009, wherein this Court held that a Co-Operative Society, registered under the Maharashtra Co-operative Societies Act, is not a public authority within the meaning of Section 2(h) of Right to Information Act or a State within the meaning of Article 12 of the Constitution of India and, therefore, Right to Information Act is not applicable".**

वरील निर्णयाचे अवलोकन करता सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' म्हणून मानता येणार नाही, असे दिसून येत आहे. सबब या प्रकरणी देखील असाच युक्तिवाद लागू होत असल्यामुळे अपिलार्थीने ज्या सहकारी संस्थेसंदर्भात माहिती मागितली आहे त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाप्रमाणे

माहिती अधिकार अधिनियम लागू होत नसल्यामुळे अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामधील विनंती विचारात घेणे हे आयोगाच्या कार्यकक्षेबाहेरचे असल्याचे दिसून येत आहे. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः ०२-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अली अहेमद खान पिता मुसाखान,रा.प्रियदर्शनी इंदिरानगर,गारखेडा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४२
निर्णय दिनांक ०२/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रेवणसिध्द शंकरराव माळकुंजे,<br>रा. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी,<br>मांजरा प्रकल्प, प्रशासकीय इमारत, पहिला मजला,<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | | |

**निर्णय**

श्री. रेवणसिध्द शंकरराव माळकुंजे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २७.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २२.०९.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २०.११.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक २३.१२.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ३५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रेवणसिध्द शंकरराव माळकुंजे, लिंबोणी बाग, शिवाजीनगर, गणपतीमंदिराजवळ, तांब्री विभाग, उस्मानाबाद ४१३५०१.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४९
निर्णय दिनांक ०२/१२/२००९

१ श्री. दादा गुलाब देशमुख, : अपिलार्थी
रा. लोणी खुर्द, ता.राहाता, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. २, अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
रो.ह.यो. (कार्य) विभाग, अहमदनगर

**निर्णय**

श्री. दादा गुलाब देशमुख यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १७.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १०.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२७.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ५० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. दादा गुलाब देशमुख, लोणी खुर्द, ता. राहाता, जि. अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९५४
निर्णय दिनांक ०२/१२/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक / प्राचार्य,
मदिनातुल उलुम कनिष्ठ महाविद्यालय,
जगजीवनराम मार्ग, देगलुर नाका, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १७.०४.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २१.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ८२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँडरोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९४८

निर्णय दिनांक ०२-१२-२००९

१ श्री. माणिकराव बंडूजी साबळे, : अपिलार्थी
रा. जायकवाडी (उत्तर), ता. पैठण,
जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, पाटबंधारे
विभाग,
नाथनगर (उत्तर), ता. पैठण,
जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर) पैठण, जि. औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहायक अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.११.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपिलाची सुनावणी आज दिनांक ०२.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी श्री. विनायक बी. कुलकर्णी, उपविभागीय अभियंता, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग, क्रमांक १५ यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०१.१२.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध झालेल्या माहितीने समाधान झाले असल्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील रद्द करावे, अशी विनंती आयोगास केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडील विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक १९४८/०८, दिनांक २८.११.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. माणिकराव बंडूजी साबळे, रा. जायकवाडी (उत्तर), ता. पैठण, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,नाथनगर (उत्तर) पैठण, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९४९

निर्णय दिनांक ०२-१२-२००९

१ श्री. परिक्षीत सुधाकरराव कुलकर्णी (जावळे), : अपिलार्थी
व्दारा- एम. एस. तीवटणे,
भुषणनगर, प्लॉट नं. १०, " शंकरपार्वती ", गारखेडा
परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली आहे व यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या निवेदनामध्ये सविस्तर खुलासा केला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दहा मुद्दयाव्दारे सेवा अंतर्गत पदवीधर प्राथमिक शिक्षकांना वाढीव वेतन श्रेणी देण्यासंदर्भात सन १९८५ ते २००३ या कालावधीतील माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस वेगवेगळया कारणास्तव माहिती देण्याचे नाकारले त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली असल्यामुळे ती देण्याची आवश्यकता नाही मात्र, ही माहिती ज्या कागदपत्रावर उपलब्ध आहे त्या कागदपत्राच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे सूचित करुन अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णय देण्याच्या पध्दतीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये मुख्यत्वे आक्षेप घेतला असून त्यामध्ये

त्यांनी असे नमूद केले आहे की, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलाची नियमानुसार सुनावणी न करता व अपिलाचा निकाल न देता अपील निकाली काढले. त्यामुळे दिलेला निर्णय त्यांना मान्य नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी एक प्रमाणित केलेला (standardised ) निर्णय दिला असून या निर्णयामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीच्या संदर्भात मुद्देनिहाय ऊहापोह केलेला नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर परत सुनावणी घेऊन, अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या प्रथम अर्जावर अपिलार्थीचे परिच्छेदनिहाय नेमके म्हणणे काय आहे ते आणि याबाबतची वस्तुस्थिती नोंदवून अपिलार्थीच्या दिनांक ११-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०४-२००८ रोजीच्या प्रथम

अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. परिक्षीत सुधाकरराव कुलकर्णी (जावळे), व्दारा- एम. एस. तीवटणे, भुषणनगर, प्लॉट नं. १०, " शंकरपार्वती ", गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९५०

निर्णय दिनांक ०२-१२-२००९

१ सौ. सिंधू बळीराम शिंदे, : अपिलार्थी

सिडको, एन-९, एल-१९/२, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शिशू विहार प्राथमिक शाळा, औरंगपुरा, औरंगाबाद येथील रिक्त असलेल्या

मुख्याध्यापक या पदावर त्यांची नेमणूक न झाल्यामुळे त्यांनी या विषयावर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" मा. शिक्षणाधिकारी (प्रा.) जि. प. औ, बाद यांना लिहिलेले अर्ज दि. ६/११/२००६, दि. २७/११/२००६ व दि. १३/११/०७ तसेच मा. विभागीय आयुक्त औ,बाद यांचे दि. १-४/१२/२००६, दि. २३-२८/११/२००७ व दि. -५-२००८ चे मा. मु. का. अ. यांना लिहिलेले पत्र मात्र उत्तर अद्याप दिलेले नाही. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १४ इतके त्यांना भरण्याचे सूचित केले व तदनंतर माहिती व्यक्तिशः घेऊन जाण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने या शुल्काचा भरणा औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती बॅंकेमध्ये जिल्हा परिषदेच्या खात्यावर दिनांक २९-०७-२००८ रोजी चलनाव्दारे केला. तथापि विहित कालावधीत उत्तर न दिल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०९-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्याप-पावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. परंतु ही माहिती

त्यांना विभागीय आयुक्त कार्यालयाकडून दिनांक २६-०३-२००९ रोजी प्राप्त झाली आहे. त्यांना ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. त्यांच्या म्हणण्या-पृष्ठ्यर्थ अपिलार्थीने लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने आयोगास त्यांना ऑक्टोबर ते डिसेबर २००६ या कालावधीसाठी मुख्याध्यापक पदी नेमणूक न देऊन शिक्षण विभागाने व संबंधित शिक्षण संस्थेने अपिलार्थीस जाणुनबुजून मानसिक त्रास देऊन त्यांच्यावर केलेल्या अन्यायामुळे संबंधितावर योग्य ती कार्यवाही करुन अपिलार्थीस न्याय द्यावा अशी विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २९-०९-२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविली आहे. तथापि अपिलार्थीस माहिती पाठविल्यापृष्ठ्यर्थ जन माहिती अधिकारी यांच्याकडे आयोगाने पुराव्याची मागणी केली असता त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या पत्राचा दुस-याच क्रमांकाचा संदर्भ असलेली पावती आयोगास दाखविली. आयोगास सादर करण्यात आलेल्या या पावतीचा क्रमांक व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या कथित माहितीच्या पत्राचा क्रमांक हे दोनही क्रमांक भिन्न असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचा पुरावा त्यांच्याकडे नाही, असे अनुमान आयोग काढत आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद व विभागीय आयुक्तांना दिलेल्या वेगवेगळ्या दिनांकाच्या पत्रांना संबंधितांकडून अद्याप उत्तर आले नाही - असे नमूद केले आहे. याचे अवलोकन करता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे याचा कोणालाही बोध होणे शक्य नाही. परंतु अपिलार्थीने या संबंधित प्राधिकरणाकडे वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहाराचे अवलोकन केले

असता, अपिलार्थीने त्यांची मुख्याध्यापक पदी नेमणूक देण्यासंदर्भात शिक्षण विभागाकडे विनंती अर्ज केले आहेत. तथापि त्यांची नियुक्ती न झाल्यामुळे त्यासाठी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्या आयोगाकडे आल्या आहेत. आयोगाकडे दिलेल्या निवेदनामध्ये त्यांनी आयोगाने शिक्षण विभागास त्यांची मुख्याध्यापक पदी नेमणूक करण्याचे आदेश द्यावेत, अशी आयोगास विनंती केली आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अशा प्रकारच्या प्रशासकीय बाबींसंदर्भात सक्षम व वेगळी प्राधिकरणे उपलब्ध आहेत आणि याहीपेक्षा महत्वाची बाब अशी आहे की, अशा प्रकारच्या बाबीसाठी निर्णय देण्याची अधिकारिता आयोगास नाही. त्यामुळे अपिलार्थीची, आयोगाने शिक्षण विभागाला त्यांची मुख्याध्यापक पदी नेमणूक करण्याचे आदेशित करावे ही त्यांची विनंती, आयोगास मान्य करता येणार नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे व परिणामी ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत आहे. तसेच अपिलार्थीस त्यांच्या मूळ प्रश्नाची सद्यःस्थिती आयुक्तांमार्फत दिनांक २६-०३-२००९ रोजी प्राप्त झाली आहे हे पाहता अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळ्याने कोणतेही आदेश करण्याचे कारण आयोगास आढळून येत नाही. परंतु या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०७-२००८ रोजी आवश्यक त्या चलनाचा भरणा करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती पुरविली गेली नाही. जन माहिती अधिकारी यांचे त्यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०९-००८ रोजी माहिती पुरविली आहे हे म्हणणे, केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी ग्राह्य धरले तरी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद देण्यासाठी अधिनियमातील तरतुदीपेक्षा जास्त कालावधी लावल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून या प्रकरणी स्वीकारलेले शुल्क रुपये १४ इतके त्यांना परत करावे लागेल. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक),

जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये १४ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय

अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस या प्रकरणी त्यांच्याकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रुपये १४ इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. सिंधू बळीराम शिंदे, सिडको, एन-९, एल-१९/२, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९५१

निर्णय दिनांक ०२-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विठ्ठल तुळशीराम माने,<br>रा. नागराळ, पो. गुंजोटी, तालुका उमरगा,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे लोहारा,<br>तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस अधीक्षक,<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारल्यामुळे त्यांनी विचाराधीन व्दितीय अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोलीस निरीक्षक ते पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या पोलीसापर्यंतच्या सर्व कर्मचा-यांची वडिलोपार्जीत मालमत्ता व आज रोजी असलेली मालमत्ता, जमीन जुमला, इमारत, दागदागिने, रोख रक्कम, बँक ठेवी, गुंतवणूक व इतर स्थावर जंगम मालमत्तेविषयी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले व तसेच या पत्रामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असून ती माहिती उघड केल्याने कोणतेही लोकहित साध्य होणार नाही, असेही त्यांचे अभिप्राय देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी १५-११-२००८ रोजी निर्णय देऊन या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या भूमिकेशी सहमती दर्शवून अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मूळात त्यांच्याकडे संकलीत न करता ती पोलीस महासंचालक

कार्यालयाकडे संग्रहीत करुन ठेवण्यात आलेली आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही वैयक्तीक स्वरुपाची असल्याने व ही माहिती उघड केल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार नसल्याचे वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्याचे नाकारले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोलीस निरीक्षक ते पोलीस शिपाई या पदावरील त्यांच्या पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत असलेल्या सर्व कर्मचा-यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेची माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे ही माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही आणि याहीपेक्षा महत्त्वाचे असे आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड केल्याने अपिलार्थी कोणते व्यापक जनहित साध्य करु शकतील हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. आयोगास अशी खात्री पटली आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड केल्याने कोणतेही व्यापक लोकहित साध्य होऊ शकणार नाही. यासंदर्भात कोणताही लेखी युक्तिवाद अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये केलेला नाही. परंतु अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती उघड केल्याने संबंधित कर्मचा-यांच्या खाजगी बाबतीत आगंतूक हस्तक्षेप होईल व त्याव्दारे अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) चा भंग होईल अशीही आयोगाची खात्री पटल्याने, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अपिलार्थीस "उघड करता न येणा-या" स्वरुपाची असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विठ्ठल तुळशीराम माने,रा. नागराळ, पो. गुंजोटी, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे लोहारा, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९५२

निर्णय दिनांक ०२-१२-२००९

१ श्री. शेळके मन्मथ केरबा, : अपिलार्थी
रा. पाटील ऑईल मिलच्या बाजूला, डोंगरे निवास,
डॅम रोड, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सह संचालक उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, सह संचालक, उच्च शिक्षण कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अपंग अनुशेषाअंतर्गत भरलेल्या प्राध्यापकांचे शिक्षण व महाविद्यालयानुसार अपंग रिक्त जागा, ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०८-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देवून अपिलार्थीस माहितीसंदर्भात संबंधित महाविद्यालयांकडे संपर्क साधण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक २४-०९-२००८ रोजी प्राप्त झाला. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे इष्ट राहील, असे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेळके मन्मथ केरबा, रा. पाटील ऑईल मिलच्या बाजूला, डोंगरे निवास, डॅम रोड, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सह संचालक, उच्च शिक्षण कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९५३

निर्णय दिनांक ०२-१२-२००९

१ श्री. सोनटक्के काकासाहेब धनाजी, : अपिलार्थी

रा. टाकळी (बें.), तालुका जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

प्राथमिक आरोग्य केंद्र, पाडोळी (आ.), तालुका जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये प्राथमिक

आरोग्य केंद्र, पाडोळी (आ.), तालुका जिल्हा उस्मानाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००२ ते २००८ या कालावधीतील त्यांनी खरेदी केलेल्या औषधी व यंत्रसामुग्रीसंदर्भात व इतर माहिती अशा एकूण दोन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाव्दारे माहिती हवी आहे याचा उल्लेख केलेला नाही. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०८-२००८ व दिनांक १२-०९-२००८ रोजी सुनावणी ठेवल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत आहे. तथापि या सुनावणीमध्ये काय निर्णय झाला यासंदर्भातील कोणतीही कागदपत्रे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे पूर्णपणे तयार असल्याचे व ती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले. परंतु यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्याचे अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २६-०९-२००८ रोजीच्या पत्राने ती घेऊन जाण्याचे

कळविले होते. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाव्दारे (व्यक्तिशः किंवा टपालाने) माहिती हवी आहे याचा उल्लेख केला नसल्यामुळे आणि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती पाहता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस, १५ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य हस्तांतरीत करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०२-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सोनटक्के काकासाहेब धनाजी, रा. टाकळी (बें.), तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, पाडोळी (आ.), तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९७२
निर्णय दिनांकः 03-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. भास्कर महादेव वारे,<br>रा.चिंचोली, ता.भूम, जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>प्रकल्प संचालक,<br>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, उस्मानाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उस्मानाबाद तालुक्यातील इंदिरा आवास योजनेसंदर्भात २ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - भूम तालुक्यामध्ये कोणत्या गावास मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय, ओपन यांचा किती कोटा दिला व याबाबत पंचायत समितीस

दिलेल्या परिपत्रकाची प्रत, या कालावधीमध्ये इंदिरा आवास योजनेमधून वर्षनिहाय व गावनिहाय दिलेल्या घरकुलाची संख्या, गावाचे नाव,लाभार्थ्यांचे नाव, लाभार्थ्यांची जात,प्रतिक्षा यादीमधील अनुक्रमांक आणि गुण क्रमांक, ज्या प्रतिक्षा यादीप्रमाणे घरकुले वाटप केली त्या प्रतिक्षा यादीची झेरॉक्स प्रत- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१४.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस चार दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या कालावधीनंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना संपूर्ण माहिती न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दि. २९.११.२००८ रोजी प्रतीक्षा यादी वगळता उर्वरित सर्व माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस प्रतीक्षा यादी संबंधित पंचायत समिती, भूम यांनी पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. तथापि यासंदर्भात कोणताही पुरावा त्यांना आयोगासमोर सादर करता आला नाही. तसेच त्यांनी सुनावणीच्या वेळी या विषयासंदर्भात

आयोगास चुकीची कागदपत्रे दाखवून आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, असे आयोगाच्या निदर्शनास येत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या दि. ०५.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हेतर अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.११.२००८ रोजी चार दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले असतानाही दि. २९.११.२००८ रोजी अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरविली. आज देखील आयोगाकडील सुनावणीसाठी येताना संबंधित अधिकाऱ्याकडे आवश्यक ती कागदपत्रे नाहीत, उलट अनावश्यक कागदपत्रे दाखवून त्यांनी आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे आयोगाच्या दृष्टोत्पत्तीस आले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीमधील संबंधित प्रतिक्षायादीची सत्य झेरॉक्स प्रत त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने व विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतरही अपूर्ण माहिती देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य

शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (ग्राम विकास विभाग) यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीमधील संबंधित प्रतीक्षा यादीची प्रत त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने व विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (ग्राम विकास विभाग) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०३-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भास्कर महादेव वारे, रा.चिंचोली, पो.उळूप, ता.भूम, जि. उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (ग्राम विकास विभाग), मंत्रालय,मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९७३
निर्णय दिनांकः ०३-१२-२००९

१. श्री. शशिकांत धोंडीबा वाघ, रा.शिराढोण, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तुळजापूर, जि.उस्मानाबाद : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी व त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील दि.०१.०१.२००६ ते अपिलार्थीच्या प्रथम अर्जाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील तुळजापूर तालुक्यातील जन माहिती अधिकारी यांच्या विभागाच्यामार्फत पूर्ण झालेली कामे, चालू असलेली कामे, त्यांचे अंदाजपत्रक, हजेरीपत्रक,

मोजमापपुस्तिका, सी.सी. व इतर माहितीच्या झेरॉक्स प्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी सूचित केले. तथापि त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांचा द्वितीय अपील अर्ज, माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज व त्यावरील निर्णय एवढीच कागदपत्रे दाखल केली आहेत.यावरुन अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली किंवा कसे, हे आयोगास कळण्यास कोणताही मार्ग नाही.

आज रोजी आयोजित सुनावणीच्या पूर्वसूचना सर्व संबंधितांना आयोगाच्या कार्यालयातून देऊन देखील अपिलार्थीची अनुपस्थिती लक्षात घेता, एक तर ही माहिती अपिलार्थीस मिळाली असावी किंवा ही माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये त्यांना फारसे स्वारस्य राहिले नसावे, या निष्कर्षाप्रत येऊन विचाराधीन अपिलासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: ०३-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शशिकांत धोंडीबा वाघ,रा.शिराढोण, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९७४
निर्णय दिनांकः ०३-१२-२००९

१. श्री. शाह शेख रहीम पिता शाह शेख इमाम खादरी, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. ०३.१२.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये, त्यांचे विचाराधीन अपील क्र. १९७४/०८ हे ते स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद करुन त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपील आता मागे घेतले असल्याने त्यांची उपरोक्त विनंती मान्य करण्यात येऊन, अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १९७४/०८, दि.१९.११.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०३-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शाह शेख रहीम पिता शाह शेख इमाम खादरी,रा.गल्ली नंबर १, पिरबुऱ्हाननगर,नांदेड-४३१६०५.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९७५
निर्णय दिनांक: ०३-१२-२००९

१. कु.सुनिता राजेश्वर जेठेवाड, : अपिलार्थी
रा.बरबडा, ता.नायगाव (खै.), जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकित्सक नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक,
जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १४.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविण्यात आलेली माहिती त्यांना प्रत्यक्षात दि. १९.०८.२००८ रोजी प्राप्त झाली असून ती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामध्ये दि. २१.०७.२००८ रोजी एम.पी.एच.डब्ल्यू. १८

महिन्याकरिता घेतलेल्या मुलाखतीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - निवड झालेल्या सात उमेदवारांनी वैधता प्रमाणपत्राची पूर्तता केली आहे काय?, असल्यास त्या वैधता प्रमाणपत्राची छायाप्रत, वैधता प्रमाणपत्र नसताना निवड करता येते काय? लेखी उत्तर द्यावे- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०७.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात आवश्यक तो खुलासा केलेला आहे. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२९.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहितीच्या संदर्भात परत सविस्तर खुलासा केला. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आणि अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ए.एन.एम.च्या अभ्यासक्रमाकरिता प्रवेश देताना अनुसूचित जमातीच्या प्रशिक्षणार्थीना कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडून त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे पुरेसे असते. प्रशिक्षणार्थीना प्रवेश देताना वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता नसते. हे प्रमाणपत्र प्रशिक्षणासाठी त्यांची निवड झाल्यानंतर प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत असतानाच्या कालावधीमध्ये त्यांच्याकडून प्राप्त करुन घेतले जाते. या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी दि. १४.०७.२००८ व दि. १८.०९.२००८ रोजी माहिती

पुरविली आहे.जन अपिलीय अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि. २२.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या एकूण माहितीपैकी अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या वैधता प्रमाणपत्राची छायाप्रत एवढीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील वैधता प्रमाणपत्राची छायाप्रत वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती ही, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणाऱ्या स्वरुपातील अशी आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये, अर्जदाराने मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात निर्णय घेणे एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृती व निर्णयाबद्दलची कारणे विचारणे आणि अर्जदाराच्या प्रश्नांना स्पष्टीकरणे अथवा खुलासे जन माहिती अधिकारी यांनी देणे अशाप्रकारची प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वर नमूद केलेल्या उर्वरित मुद्यांद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याचे सिध्द होत आहे व परिणामी ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने ती, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. एवढे असूनही जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.१४.०७.२००८ व १८.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न केला आहे व अपिलार्थीस ज्या उमेदवारांची जात वैधता प्रमाणपत्रे उपलब्ध होती, त्या प्रमाणपत्रांच्या छायाप्रती वेळेत उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. हे पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील देय माहिती जन माहिती व अपिलीय अधिकारी

यांच्याकडून त्यांना प्राप्त झाल्याने व ती दिशाभूल करणारी कशी आहे, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नसल्यामुळे आणि या संदर्भात आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जात त्यांनी कोणताही खुलासा न केल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ०३-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. कु.सुनिता राजेश्वर जेठेवाड,रा.बरबडा, ता.नायगाव (खै), जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक,जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२१८
निर्णय दिनांक ०३/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मधुकर लोभा राठोड,<br>रा. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय कृषी सहसंचालक,<br>लातूर विभाग, लातूर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय कृषी सहसंचालक,<br>लातूर विभाग, लातूर | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. मधुकर लोभा राठोड यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २७.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १६.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२२.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३६ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१)  अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :      ०३/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मधुकर लोभा राठोड, व्दारा- अनिकेत निवास, टिळक नगर, नेहरु इंग्लीश स्कूलच्या पाठीमागे, नांदेड ४३१६०२.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२१९
निर्णय दिनांक ०३/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापले,<br>मु.पो. गडगा, ता. नायगांव (खै.), जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, नायगांव, जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी,<br>तहसील कार्यालय, नायगांव, जि. नांदेड | | |

**निर्णय**

श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापले यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ११.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०७.११.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.१५.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २७ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापले, मु.पो. गडगा, ता. नायगांव (खै.), जि. नांदेड

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२२०
निर्णय दिनांक ०३/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल,<br>रा. जाफ्राबाद, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>जाफ्राबाद, जि.जालना | | |

**निर्णय**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०३/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, ता. जाफ्राबाद, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९६६

निर्णय दिनांक ०३.१२.२००९

१ श्री. चंद्रकांत बी.के., : अपिलार्थी
रा.अंबड, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (जिल्हा परिषद), सिंचन उपविभाग, अंबड, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (जिल्हा परिषद), सिंचन विभाग, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.११.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती न मिळाल्याने आणि त्यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील दिनांक ०१.०१.२००७ ते जुलै २००८ या कालावधीमध्ये केलेल्या गाव / पाझर तलावाची माहिती, मजुरांचे हजेरीपत्रक, धान्य वाटप कूपन रजिस्टर व तसेच चालू सर्व महाराष्ट्र संपूर्ण ग्रामीण योजनेच्या कामाची सविस्तर माहिती अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली असून, ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे या अर्जामध्ये त्यांनी नमूद केले होते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतूदीनुसार दिनांक २२.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी दिनांक ०५.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस द्वितीय अपिलात जाण्याची या कार्यालयाची संमती आहे, असे विचित्र आदेश दिले. या कथित निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केलेली आहे, असे सिध्द होत असल्याचे म्हटले आहे. परंतु याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण कार्यकारी अभियंत्यांनी त्यांच्या या निर्णयामध्ये दिलेले नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयास अनुसरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरीत प्राप्त व्हावी अशी त्यांची अपेक्षा आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने सुरुवातीला माहितीसाठीचा अर्ज करताना या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन, तसे प्रमाणपत्र त्यांनी त्यांच्या मूळ आर्जासोबत जोडले नाही. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस प्रथम त्यांचे दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र सादर करण्याचे सूचित केले. त्यानुसार अपिलार्थीने दिनांक ०५.०८.२००८ रोजी दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी लागणाऱ्या खर्चाकरिता त्यांनी दिनांक १५.०८.२००८ रोजीच्या त्यांच्या कार्यालयाच्या पत्राद्वारे निधी उपलब्ध करुन देण्याचे कार्यकारी अभियंत्यांना कळविले. तथापि अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध नसल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असून, या माहितीमधील अपिलार्थीने या अर्जामध्ये उल्लेख केलेल्या कालावधीमध्ये माहिती अधिकाऱ्याच्या कार्यालयामार्फत केलेल्या गाव तलाव व पाझर तलावाच्या मजुरांचे हजेरीपत्रक, धान्य वाटप रजिस्टर एवढीच माहिती त्यांना देय होत आहे. उर्वरित माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अत्यंत मोघम स्वरुपात मागितली असल्यामुळे ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमतील तरतुदींशी विसंगत होत आहे. त्यामुळे उर्वरित मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या उर्वरित माहितीची व्याप्ती देखिल मोठ्या प्रमाणात आहे आणि ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे निधी उपलब्ध नाही, व अपिलार्थीस ही माहिती त्वरीत हवी आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या त्यांच्याकडील दिनांक ०१.०१.२००७ ते दिनांक ३१.०७.२००८

पर्यंतच्या कालावधीमधील त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये केल्या गेलेल्या गाव तलावाच्या व पाझर तलावाच्या मजुरांच्या हजेरीपत्राच्या प्रती, धान्य वाटप रजिस्टरची प्रत या अपिलार्थीस तपासण्यासाठी उपलब्ध करुन द्याव्यात आणि यातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या पृष्ठांच्या झेरॉक्स प्रती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंद्रकांत बी.के., साठेनगर, अंबड, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (जिल्हा परिषद), सिंचन उपविभाग, अंबड, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (जिल्हा परिषद),

सिंचन विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९६७

निर्णय दिनांक ०३.१२.२००९

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, : अपिलार्थी

रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

ग्रामसेवक, ग्रामपंचायत डोंगरगाव,

ता. बदनापूर, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

गट विकास अधिकारी, पंचायत समिती,

बदनापूर, जि. जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. लक्ष्मण तुकाराम मोरे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांनी विचाराधीन अपील त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्याने केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्रयस्थ पक्ष

श्री. लक्ष्मण तुकाराम मोरे रा. डोंगरगांव, ता. बदनापूर, जि. जालना यांच्या वारसांच्या संदर्भात - स्वातंत्र सैनानी श्री. लक्ष्मण तुकाराम मोरे, रा. डोंगरगांव, ता. बदनापूर, जिल्हा जालना यांना भाऊ किती त्यांचे संपूर्ण नाव, पुतणे किती त्यांचे संपूर्ण नाव, मुले, मुली किती त्यांचे संपूर्ण नाव, बहिणी किती त्यांच्या सासरचे आडनाव, गाव, तालुका, जिल्हा यासह संपूर्ण माहिती मिळणेबाबत - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालद्वारे मागितली होती. सदर दिनांक १२.०९.२००८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २३.०९.२००८ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे अपिलार्थीने दिनांक १६.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे काही माहिती दिली. ही माहिती अपिलार्थीस दिनांक १६.१०.२००८ रोजी प्राप्त झाली. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दिनांक २२.१०.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या संदर्भात आपला निर्णय दिनांक २१.११.२००८ रोजी पारित केला व अपिलार्थीचे अपील खारीज केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना त्यांच्या निर्णयाचे कोणतेही कारण अथवा समर्थन त्यामध्ये केले नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अशा प्रकारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असून त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये असे स्पष्ट केले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी विचारलेली माहिती उपलब्ध नसेल तर जन माहिती अधिकारी यांनी गावातील लोकांकडे चौकशी करुन त्यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरवावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या स्वरुपाची माहिती मागितली आहे अशा स्वरुपाची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तरीही, अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने त्यांनी गावातल्या लोकांच्याकडे चौकशी करुन अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या पत्नीचे व मुलांची नावे प्रमाणीत करुन कळविली आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, मूळात अपिलार्थीने मागितलेली माहिती ही कोणत्याही प्रकारे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अधिकृतपणे अथवा अनधिकृतपणे प्रमाणित व कार्यालयीन कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध असणे संभवत नाही. कारण ग्रामपंचायतीमध्ये देखिल प्रत्येक ग्रामवासियाची वंशावळ (फॅमिली चार्ट) ठेवण्याची पध्दत प्रचलित नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नसतांना देखिल त्यांनी गावात चौकशी करुन अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार देण्यासंदर्भात कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे.

अर्जदाराने मागणी केलेली माहिती गावातल्या इतर लोकांना विचारुन नंतर ती अर्जदारास देणे अशाप्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी गावात चौकशी करुन अपिलार्थीस माहिती पुरविण्याची त्यांची कृती चुकीची असल्याचे सिध्द होत आहे. सबब आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटी स्विकारलेले शुल्क रु ४ /- इतके त्यांना परत करावे लागेल. जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देऊन या निर्णयाप्रत त्या कशा आल्या याचा कोणताही खुलासा त्यांनी त्यांच्या निर्णयामध्ये केलेला नाही. त्यांच्या निर्णयाचे वाचन केले असता केवळ जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थीस माहिती दिली म्हणून, त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील खारीज करण्याचे आदेशित केल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या अपील अर्जावर अशाप्रकारे कोणत्याही कारणाशिवाय निर्णय देण्याची त्यांची कृती चुकीची आहे, हे त्यांच्या येथे निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे देय होत नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत. परंतु अपिलार्थीकडून या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहितीपोटी स्विकारलेले शुल्क रु. ४/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत परत करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ४/- इतके त्यांना परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने, अंबाली निवास, समतानगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत डोंगरगांव, ता. बदनापूर, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायात समिती, बदनापूर, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९६८

निर्णय दिनांक ०३-१२-२००९

१ श्री. बाळासाहेब व्दारकादास तिडके, : अपिलार्थी
रा. शिषटेकडी, माळीपुरा, जुना जालना, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, जिल्हा क्रीडा कार्यालय,
जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, औरंगाबाद
विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जास्तीचे शुल्क आकारुन अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती पुरविली असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जिल्हा क्रीडा अधिकारी, जालना यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील दिनांक ०१-०१-२००५ ते ३०-०७-२००८ या कालावधीशी संबंधित व्यापक प्रमाणातील माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी वाटप केलेल्या अनुदानाचा व संबंधित संस्थेचा तपशील आणि त्यांच्या कार्यालयातील आस्थापना विषयक बाबीशी संबंधित माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २६० इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक ०८-१२-२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, जालना शाखा येथे केला आहे व त्याच दिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती दिनांक ०८-१२-२००८ व्यक्तिशः पुरविली. तथापि प्राप्त माहितीवर आक्षेप असल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे श्री. राठोड, श्री. तांदळे, श्री. खिल्लारे, श्री. चांदवडे व श्री. निंगुळकर या अधिका-यांच्या सेवापुस्तकाच्या प्रती मागितल्या होत्या. तथापि सेवा पुस्तकाच्या प्रती, माहिती अधिकार अधिनियमातील कायद्यानुसार उघड करता येतात, किंवा कसे या संभ्रमात असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविली नाही. तथापि आता त्यांनी ही माहिती बरोबर आणली असून ती माहिती अपिलार्थीस त्या दहा दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत. अपिलार्थीस उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती त्यांनी दिनांक ०५-१२-२००८ रोजी दिलेल्या माहितीमध्ये उपलब्ध आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीची आयोगाकडे अपील करण्याची दोन कारणे असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यापैकी पहिले कारण म्हणजे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उडवाउडवीची कारणे दिलेली आहेत. यासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी ५१ पृष्ठांची माहिती दिली असल्याचे आयोगास आढळून आले आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तांतरीत केली आहे. प्रचलीत नियमानुसार ५१ पृष्ठांच्या माहितीसाठीचे शुल्क १०२ रुपये इतके होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून २६० रुपये इतक्या शुल्काचा भरणा करुन घेतला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी १५८ रुपये इतके जादाचे शुल्क

आकारल्याचे सिध्द होत आहे. ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अवाजवी शुल्क आकारल्याचा मुद्दा मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जातील पूर्ण माहिती त्यांना दिली नसल्याचे, आज सुनावणीमध्ये आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याचा मुद्दा देखील येथे सिध्द होत आहे. तथापि अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच या मुद्दयावर त्यांनी कोणताही लेखी युक्तिवाद आयोगास सादर केलेला नाही अथवा या संदर्भात कोणतेही स्पष्टीकरण आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये केलेले नाही. या परिस्थितीत पुराव्याअभावी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. अशा प्रकारे अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी जास्तीचे शुल्क आकारले व अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिली हे मुद्दे सिध्द होत आहेत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीपासून कोणत्याही असद्‌हेतूने, त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दडवून ठेवल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतेही आदेश आयोग देत नाही. परंतु येथून पुढे माहितीसाठीचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्या अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करावी, अशी सूचना त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती देण्यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्षाच्या सेवा पुस्तकाच्या प्रती देणे भाग आहे. सेवा पुस्तक ही बहुतांश सार्वजनिक माहिती असल्यामुळे या पुस्तकातील

नामनिर्देशनाशी संबंधीत  व त्रयस्थ पक्षांच्या अंगावरील खुणा ही माहिती वगळता उर्वरित सर्व माहिती त्यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.  सेवापुस्तकातील त्रयस्थ पक्ष यांच्या अंगावरील खुणा व नामनिर्देशन ही माहिती त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीशी निगडीत असल्याने व ती उघड केल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार नसल्यामुळे ही माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) नुसार अपिलार्थीस उघड करता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय

अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले जादा शुल्क रुपये १५८ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाळासाहेब व्दारकादास तिडके, रा. शिषटेकडी, माळीपुरा, जुना जालना, जिल्हा

जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रिडा अधिकारी, जिल्हा क्रिडा कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९६९

निर्णय दिनांक ०३-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दामोधर भीकाजी मदन,<br>रा. केळीगव्हान तालुका बदनापूर,<br>जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला आहे व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने मुल्यांकन अहवाल न मिळाल्याने त्यांना नुकसानीस सामोरे जावे लागले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने एकाच माहितीसाठी दिनांक १६-१२-२००६ रोजी दोन वेगवेगळे अर्ज केले असून या दोन अर्जापैकी एका अर्जावर राज्य माहिती आयोगाने दिनांक १०-११-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत केले आहेत. या आदेशाव्दारे आयोगाने अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी असलेला अपिलार्थीचा विचाराधीन अपिलाशी संबंधित प्रथम अर्ज आणि आयोगाने दिनांक १०-११-२००८ रोजी दिलेल्या निर्णयाशी संबधित प्रथम अर्ज हे एकच असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दामोधर भीकाजी मदन, रा. केळीगव्हान तालुका बदनापूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९७०

निर्णय दिनांक ०३-१२-२००९

१ श्री. सुभाष साहेबराव नाकलगांवकर, : अपिलार्थी
मु.पो. सम्राट अशोकनगर, तालुका माजलगांव,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
श्री. पंडीत गुरुपार्डीकर कला महाविद्यालय,
सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्राचार्य, श्री. पंडीत गुरुपार्डीकर कला महाविद्यालय,
सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य लिपीक, श्री. पंडीत गुरुपार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज केला असता त्यांना जन माहिती

अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे माहिती दिली नाही त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचयाकडे प्रथम अपील दाखल केले, तथापि त्यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयाशी संबंधित सन २००६ ते २००८ या कालावधीतील अधिव्याख्याता आणि शिष्यवृत्तीसंदर्भात काही माहिती एकूण नऊ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शैक्षणिक वर्ष २००६ ते २००८ मधील कायमस्वरुपी अधिव्याख्यात्यांची यादी, कंत्राटी अधिव्याख्यात्यांची यादी, अधिव्याख्यात्यांच्या पगारातील कपात केलेला प्राप्तीकर व व्यवसाय कर भरणा केल्याचा तपशील, महाविद्यालय जागेच्या मालकाचे भाडे करारपत्राची प्रत व भाडे पावत्या, शासनाकडून महाविद्यालयास प्राप्त झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम, शासन आदेश, विद्यार्थीनिहाय शिष्यवृत्तीच्या रकमेचे वाटप प्रपत्राची सत्यप्रत, समाज-कल्याण खात्याकडून महाविद्यालयास प्राप्त झालेल्या शिष्यवृत्तीच्या संदर्भात प्रत्येक वर्गनिहाय शिष्यवृत्तीच्या रकमेच्या चेकची प्रत, शिष्यवृत्तीमधील कपात केलेल्या बाबी, सन २००६ ते २००८ या वर्षातील मराठवाडा ग्रामीण बँकेस पाठविलेल्या विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या रकमेची यादी, शिष्यवृत्ती मधून कपात केलेली रक्कम शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांकडून प्रतिपूर्ती केली असेल तर त्या प्रतिपूर्ती केलेल्या रकमेची विद्यार्थ्याच्या नावासह यादी - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न

दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती दिली नसल्याचे त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले व अपिलार्थीस आता ही माहिती ते दहा दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत, असे स्पष्ट केले. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती का देण्यात आली नाही, एवढेच नव्हे तर अपिलार्थीने दिनांक २७-०८-२००८ रोजी अर्ज केला असता एक वर्षाहून जास्त कालावधी होऊनही अपिलार्थीस माहिती न देण्याची कारणे कोणती हे जन माहिती अधिका-यास आयोगासमोर स्पष्ट करता आली नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही महाविद्यालयाच्या आस्थापना, शिष्यवृत्ती व लेखा विभाग या विभागाशी संबंधित होती त्यामुळे या विभागांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जाची अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे प्रत देऊन त्यांच्याकडून माहिती घेण्यासाठी काय प्रयत्न केले याची विचारणा आयोगाने केली असता, संबंधित माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांनी स्वतः होऊन काहीही प्रयत्न केले नाहीत, असे आयोगास अवगत केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने दिनांक १५-१०-२००८ रोजी त्यांच्याकडे प्रथम अपील केले त्यावेळी ते आजारीपणाच्या रजेवर होते त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी सुनावणी घेतली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने ज्या महाविद्यालयाकडे माहितीची मागणी केली आहे त्या महाविद्यालयास शासनाकडून अनुदान प्राप्त होत असल्यामुळे ते अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीप्रमाणे 'सार्वजनिक प्राधिकरण' असल्याचे सिध्द होत आहे. या महाविद्यालयाने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका केल्या आहेत. त्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी या अर्जावर प्रथमतः प्रतिसाद देणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्या अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क देखील अपिलार्थीस कळविले नाही. यावरुन अपिलार्थीस मूळात माहिती द्यावयाची नाही अशाप्रकारची त्यांची मानसिकता असावी, असे आयोगास वाटते. आज रोजी आयोगाने प्रश्न विचारुन व जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या बचावाची पुरेपूर संधी देऊनही ते अपिलार्थीस माहिती न देण्याच्या त्यांच्या कृतीचे समर्थन करु शकले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्याकरिता अथवा त्यावर निर्णय देण्याकरिता अपिलार्थीशी काहीही पत्रव्यवहार केलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात तयार असून ते ती माहिती अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. तेव्हा जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतेही उत्तर न देऊन अथवा त्यांच्या अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले असल्यामुळे ते अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणांशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी यांनी जास्तीत जास्त २५ हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात पुढील लेखशिर्षामध्ये करावा.

**लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "**

सदर शास्तीचा संबंधित जन माहिती अधिकारी शासकीय कोषागारात नियमितपणे भरणा करतील याची खात्री प्राचार्य, श्री. पंडीत गुरुपार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांनी करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर

शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुभाष साहेबराव नाकलगांवकर, मु.पो. सम्राट अशोकनगर, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक, श्री. पंडीत गुरुपार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, श्री. पंडीत गुरुपार्डीकर कला महाविद्यालय, सिरसाळा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९७१

निर्णय दिनांक ०३-१२-२००९

१ श्री. संजय सुखदेव गायकवाड, : अपिलार्थी
मु. दहिवडी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, होनाळा,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी श्री. शटगार एस. एम. विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांच्याकडे प्रथम अपील केले असता, माहितीसंबंधी निर्णय देण्याऐवजी तुला माहिती मागण्याचा अधिकार नाही, असेल तर कार्ड दाखव असे म्हणून

ग्रामसेवकाच्या बाजूने बोलून माहिती अधिकाराचा अवमान केला असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते ऑगस्ट २००८ या कालावधीतील विस्तृत प्रमाणातील माहिती एकूण १६ मुद्याव्दारे मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे व यासंदर्भात पुरावा जोडला असल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार गट विकास अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर यांच्याकडे दिनांक १६-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि यासंदर्भात विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर हे प्रथम अपिलीय अधिकारी असल्याने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांनी अपिलार्थीचा दिनांक १६-१०-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडील दिनांक २४-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे श्री. शटगार एस. एम. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर यांच्याकडे पाठविला. त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १६-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १६-१०-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय सुखदेव गायकवाड, मु. दहिवडी, पो. काटी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, होनाळा, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९७६

निर्णय दिनांक ०३.१२.२००९

१ श्री. सत्यनारायण हरिप्रसाद तोष्णीवाल, : अपिलार्थी
रा. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, जायकवाडी
पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, जायकवाडी
पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी
पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो माहिती न दिल्यामुळे त्यांना विचाराधीन अपिलाच्या निकालापर्यंत शास्ती लावण्यात यावी व अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करावे. या अपील अर्जामध्ये त्यांनी असेही नमूद केले आहे की,

त्यांना प्रथम अपिलाच्या निकालानंतर उपविभागीय अधिकारी व शाखाधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"१) आपण चारी क्रमांक ३७ व चारी क्र. ३८ वर किती पानी सोडता.

२) पानी सोडल्यानंतर सर्व चाऱ्या चालु अथवा बंद आहेत का याची पाहणी होते का ?

३) सर्व लाभधारकांना पानी मिळते का नाही याची पाहणी व चौकशी केली जाते का ? असल्यास अवहाल देणे, माझा गट नं. १९४१ हा पानी भरणा क्षेत्रात येतो का?

४) तसेच गट नं. १९१३ ला पानी मिळते का?

५) पुर्वी शेत चारी होती का असल्यास आता का नाही व त्या द्वारे पानी मिळते का? त्या साठी काय कार्यवाही केली गट नं. १९४१ व १९१३ ला किती दिवसात पानी देणार."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विना दिनांकाच्या पत्राने प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ६४/- इतके त्यांना त्यांच्या कर्यालयात भरण्याचे सूचित केले. त्यानंतर अपिलार्थीने दिनांक १६.०८.२००८ रोजी या शुल्काचा भरणा करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४.०९.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सशुल्क माहिती पुरविल्याचे त्यांना आढळून आल्यावरुन अपिलार्थीचे

प्रथम अपिल निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाली असून, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेता अपिलार्थीच्या गैरहजेरीत सदर निर्णय दिला.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः माहितीसाठीचा अर्ज कार्यकारी अभियंता यांना उद्देशून केला होता. तथापि या प्रकरणी संबंधित उप अभियंता, हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची प्रत दिनांक ०२.०७.२००८ रोजी संबंधित उपअभियंत्याकडे पाठविली. यानंतर उप अभियंत्यास दिनांक १७.०७.२००८ रोजी स्मरणपत्र दिल्यानंतर उप अभियंत्याकडून त्यांना दिनांक २९.०७. २००८ रोजी माहिती प्राप्त झाली. ही माहिती अपिलार्थीस त्यांनी दिनांक १६.०८.२००८ रोजी आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यावर जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख त्यांच्या मूळ अर्जामध्ये केलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रत्येक दिवशी बदलणारी अशी आहे. त्यामुळे अपिलार्थीस ज्या दिवसाची माहिती आवश्यक आहे त्या दिवसाचा उल्लेख त्यांनी त्यांच्या प्रथम अर्जामध्ये करणे त्यांना

अनिवार्य होते. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणाऱ्या स्वरुपात माहिती विचारली आहे. जी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील कोणतीही माहिती मूळात देय होत नाही. एवढे असूनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहितीद्वारे खुलासा करण्याचा प्रयत्न केला आहे. हे पाहता, विशेषत: अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सत्यनारायण हरिप्रसाद तोष्णीवाल, रा. घर नं. ३-१५-६२०, विप्रनगर, एम.आय. डी.सी. कॉर्नर, बीड, ता.जि.बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/ १९७७
निर्णय दिनांक ०३-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. दिलीप वाघमारे नरसीकर,<br>रा. नरसी, ता. नायगांव, जि. नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपकार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद,<br>नांदेड दक्षिण, जि. नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, दक्षिण विभाग,<br>जिल्हा परिषद, नांदेड, जि. नांदेड | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

सुनावणीच्या उपस्थितीत जन माहिती अधिकारी श्री. एम.ए. रशिद कार्यालयीन अधीक्षक, जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीचे कार्यकारी अभियंत्यास उद्देशून दिनांक ०८.०७.२००९ रोजी लिहिलेले एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांच्या दिनांक

०९.०९.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या केलेल्या अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाली असून, यापूढे त्यांची यासंदर्भात कोणतीही तक्रार राहणार नाही, असे नमूद केले आहे. या पत्रासोबत कार्यकारी अभियंता यांनी आयोगास सादर केलेल्या दिनांक ०२.१२.२००९ रोजीच्या टिपणीची एक प्रत त्यांनी जोडली असून, या टिपणीमध्ये कार्यकारी अभियंता यांनी असे नमूद केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती घेऊन जाण्यासाठी अपिलार्थीस त्यांनी दिनांक १५.११.२००८, १५.१२.२००८, ३०.०१.२००९, २१.०३.२००९ व २५.०३.२००९ रोजी सूचविले असता अपिलार्थीने दिनांक ०८.०७.२००९ रोजी त्यांच्याकडून व्यक्तिशः माहिती हस्तगत करुन घेतली आहे. कार्यकारी अभियंता यांची ही टिपणी, अपिलार्थीचे कार्यकारी अभियंता यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ०८.०७.२००९ रोजीचे पत्र व आज रोजीच्या सुनावणीस अपिलार्थीची असलेली अनूपस्थिती पाहता, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संबंधितांकडून प्राप्त झाली असल्याचे अनुमान काढण्यात येऊन, अपिलार्थीचे विचाराधीन अपिलासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १९७७/०८, दिनांक ३०.१२.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०३.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिलीप वाघमारे नरसीकर, मु.पो. नरसी, ता. नायगांव (खै.), जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, नांदेड दक्षिण, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, दक्षिण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९८४
निर्णय दिनांक: ०४-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. रमेश मांगीलाल तिवारी,<br>रा. धर्माबाद, जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती, धर्माबाद,जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड. | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी उशिरा, असमाधानकारक व चुकीची माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१६.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी दि. २५ एप्रिल, २००८ ते ०५ मे, २००८ या कालावधीमध्ये घेतलेल्या शिक्षकांच्या प्रशिक्षणासंदर्भात एकूण दोन मुद्यांद्वारे माहिती मागविली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - प्रशिक्षणाकरता आलेली रक्कम, ती कशाप्रकारे व किती खर्च केली, ५ सप्टेंबर, २००७ साजरा करण्यात आला का? आला तर किती खर्च झाला, नाही साजरा झाला तर का साजरा करण्यात आला नाही? - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती व्यक्तिशः मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीअंतर्गत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस माहिती दिली असल्यामुळे अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि प्राप्त माहिती उशीरा मिळाल्याने व ती असमाधानकारक व चुकीची वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस त्यांनी अपिलार्थी यांना निश्चित कोणत्या तारखेस माहिती उपलब्ध करुन दिली यासंदर्भात आयोगास कोणताही खुलासा करता आला नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केली. अशाच प्रकारची माहिती अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडली आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती उपलब्ध झाल्याचे दिसून येत आहे. तथापि या पत्रावर कोणत्याही तारखेचा उल्लेख नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या दोन मुद्यांद्वारे माहितीची मागणी केली आहे, त्यातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस सारांशाच्या स्वरुपात आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात देखील अपिलार्थीस माहिती देय नसतानादेखील पुरविली आहे, असे आढळून येत आहे. ही माहिती अपिलार्थीस असमाधानकारक व चुकीची का वाटत आहे, याचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उशिरा प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कधी उपलब्ध झाली हे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेले नाही. तसेच उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे देखील अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याची निश्चित तारीख नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जर 'व्यक्तिशः' माहिती मागितली असेल तर त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व हे संबंधित अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधी व्यक्तिशः उपस्थित राहिले, यासंदर्भातील

कोणताही खुलासा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या अर्जासोबत केलेला नाही, अथवा यासंदर्भात कोणताही पुरावा अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये उपलब्ध नाही, हे पाहता व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. तसेच आज रोजी आयोगासमोर उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस विचाराधीन प्रकरणाशी संबंधित त्यांच्याकडील माहितीसंदर्भात आयोगास कोणत्याही प्रकारे समाधानकारक खुलासा करता आला नाही. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी त्यांच्याकडील अशा अकार्यक्षम अधिकाऱ्यास (श्री. आडे, शिक्षण विस्तार अधिकारी) आयोगासमोर होणाऱ्या सुनावणीसाठी इतःपर पाठवू नये, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेश मांगीलाल तिवारी, मोंढा रोड, धर्माबाद, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, धर्माबाद,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९८५
निर्णय दिनांकः ०४-१२-२००९

१. श्री. खेडकर विकास गणपतराव, : अपिलार्थी
रा.उकिर्डा (च), ता.शिरुर कासार,जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती देण्याचे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी टाळले असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी या अपील अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०२.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या सातवी पासच्या सन १९९२-९३ या कालावधीतील गुणपत्राची प्रत

मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा मूळ अर्ज संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे दि. ०२.०५.२००८ रोजी पाठवून दिला. तथापि मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३०.०३.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी यांनी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना दि. २४.०६.२००८ रोजीच्या आदेशाद्वारे, अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. परंतु हा कालावधी व्यपगत झाल्यानंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या विवेचनाशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला व आयोगास असेही अवगत केले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीची गुणपत्रिका ज्या-ज्या ठिकाणी उपलब्ध असण्याची शक्यता आहे, त्या सर्व ठिकाणी त्यांनी संपर्क साधला होता, परंतु अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना अद्यापही प्राप्त झाली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत माहिती मागितली होती. गट शिक्षणाधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे आवश्यक ती

कार्यवाही या प्रकरणी विहित मुदतीमध्ये केलेली आहे. ज्याअर्थी जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले आहे त्याअर्थी, ही माहिती संबंधित शाळेच्या अभिलेख्यांची तपासणी केल्यास प्राप्त होऊ शकेल, असे आयोगास वाटते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जतन करुन ठेवण्याचा कालावधी निश्‍चितपणे किती आहे, याचे स्पष्टीकरण आज रोजी आयोगासमोर शिक्षणाधिकारी यांना करता आले नाही. सबब अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या त्यांच्या सातवीच्या परीक्षेच्या गुणपत्रिकेची प्रत त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी व जर ही माहिती नष्ट केली असेल तर तसा पुरावा अपिलार्थीस द्यावा. या कालावधीमध्ये जर ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध झाली नाही तर, ही माहिती जतन करुन ठेवण्याकरिता जबाबदार असलेल्या कर्मचारी/अधिकारी यांच्यावर हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत प्रशासकीय स्वरुपाची कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. खेडकर विकास गणपतराव,रा.उकिर्डा (च), पो.ब्र.येळंब, ता.शिरुर कासार,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, शिरुर कासार, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९८६
निर्णय दिनांकः ०४-१२-२००९

१. श्री. मिलींद वसंतराव विटेकर, : अपिलार्थी
रा. सोनपेठ, जि.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय,सोनपेठ,
जि. परभणी
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी अधीक्षक अभियंता, नांदेड यांच्याकडे दि. २२.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांनी या प्रकरणी कोणतीही सुनावणी घेतली नसल्यामुळे व जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी या अपील अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२२.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ०१.०१.२००६ ते ३१.०१.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त झाली नसल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणातही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सोनपेठ येथील उपविभागाला सादर केला असून अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्याकडे त्यांनी या अर्जासंदर्भात दि. २२.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे गरजेचे आहे, सबब जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड यांनी अथवा या प्रकरणाच्या संदर्भात त्यांनी नेमलेल्या जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २२.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य

विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२२.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मिलींद वसंतराव विटेकर, विटेकर निवास, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय,सोनपेठ, जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९८७
निर्णय दिनांक: ०४-१२-२००९

१. श्री. शेख वहाबोद्दिन शेख करिमोद्दीन, : अपिलार्थी
रा. तळेगाव, ता.उमरी, जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी,
उमरी, जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, उमरी, जि.नांदेड

विद्यमान जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी,उमरी,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून आयोगास असे अवगत केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून जन माहिती अधिकारी यांनी वंचित ठेवल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनीही अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेळोवेळी न मिळाल्यामुळे त्यांना मानसिक त्रास देखील होत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०१.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - तुषार संच व ठिबक संच वाटपासाठी मिळणाऱ्या अनुदानाबाबतचे संपूर्ण लागू असलेले निकष आणि त्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची यादी - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार तालुका कृषि अधिकारी, उमरी यांच्याकडे दि. ०४.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगास त्यांचा लेखी युक्तिवाद सादर केला. या लेखी युक्तिवादामध्ये अपिलार्थीने त्यांनी दि. ०१.०९.२००८ रोजी केलेल्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त करुन देण्याचे व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करण्याचे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी त्यांच्याकडे कोणतेही कारण नव्हते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी आज सोबत आणली आहे काय, अशी आयोगाने त्यांना विचारणा केली असता, जन माहिती अधिकारी यांनी

नकारार्थी उत्तर दिले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते अपिलार्थीस ही माहिती एक दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपालाद्वारे मागितली होती. त्यामुळे अपिलार्थीच्या दि. ०१.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीच्या अर्जास प्रतिसाद देणे या प्रकरणी अभिप्रेत होते. परंतु संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. यानंतर अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीस माहिती पुरविण्याकरिता कोणतीही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आढळून आले नाही.मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही इतक्या साध्या स्वरुपाची होती की, ती देण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना फारसे कष्ट घ्यावे लागले असते, अशातील कोणतीही परिस्थिती उद्‌भवणे या प्रकरणी संभवत नाही. जी माहिती अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी एवढया प्रदीर्घ कालावधीमध्ये पुरविली नाही, ती आता हेच अधिकारी अपिलार्थीस एक दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत. यावरुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या सरळ स्वरुपाची कल्पना यावी.

या प्रकरणी दुसरी विशेष बाब अशी आहे की, जन माहिती व अपिलीय अधिकारी या पदावर अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज केला त्यावेळी एकच व्यक्ती म्हणजे श्री. एन.आर.देशपांडे हे कार्यरत असल्याचे आयोगास आजच्या सुनावणीमध्ये स्पष्ट झाले आहे. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली एवढी साधी माहिती देखील विहित मुदतीत मिळू नये, याचा अर्थ संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या मनात अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात, माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासंदर्भात असलेली अनास्था हे होय. श्री. देशपांडे यांना आज आयोगाने त्यांच्या बचावाची पुरेपूर संधी दिली असताना देखील श्री. देशपांडे यांना, त्यांच्या अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्याच्या कृतीचे कोणतेही समर्थन करता आले नाही. या प्रकरणी अपिलार्थीस एक वर्षभर कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय साधी माहिती न देऊन संबंधित अधिकारी श्री. एन.आर.देशपांडे यांनी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस स्वतःला निःसंशपणे पात्र ठरविले आहे. सबब तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एन.आर.देशपांडे, मंडळ कृषि अधिकारी, उमरी, जि.नांदेड यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल एकूण रु. २५,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा श्री. देशपांडे एन.आर. यांनी शासकीय कोषागारात जास्तीत जास्त दहा हप्त्यात पुढील लेखाशीर्षाखाली करावा.

**"००७० इतर प्रशासनिक सेवा,६० इतर सेवा, ८०० इतर जमा रक्कम १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१ "**

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, जिल्हा नांदेड यांना संबंधित अधिकारी श्री. देशपांडे हे या शास्तीचा भरणा माहे फेब्रुवारी,२०१० पासून शासकीय कोषागारात नियमितपणे करतील, याची खात्री करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी श्री.एन.आर.देशपांडे यांना या प्रकरणी एकूण रु. २५,०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी फेब्रुवारी २०१० पासून नियमितपणे जास्तीत जास्त दहा हफ्त्यात शासकीय कोषागारात वरील निर्णयामध्ये नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख वहाबोद्दिन शेख करिमोद्दीन,रा. तळेगाव, ता.उमरी, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, उमरी,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९८८
निर्णय दिनांक: ०४-१२-२००९

१. श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर,
जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. एम.एन.डांगे,श्री. ए.जी.करपे, श्री. पी.डी. जोशी, श्री. जे.बी.कुलकर्णी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३,४,५ व ७ च्या संदर्भात अपूर्ण आणि चुकीची माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित व कार्यालयातील कर्मचारी श्री.डांगे, श्री.करपे, श्री.जोशी व श्री. कुलकर्णी या त्रयस्थ पक्षाशी संबंधित एकूण ७ मुद्यांद्वारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १३.०८.२००८ रोजीच्या मूळ पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने ही माहिती संकलीत करण्यासाठी कार्यालयीन साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याचे अपिलार्थीच्या निदर्शनास आणले व अपिलार्थीस विशिष्ट माहिती मागविण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.१०.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या नंतर प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण व चुकीची वाटल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी (आयोगाच्या कार्यालयातून सुमारे एक महिना आधी नोटीस पाठवूनही) कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.३,४,५ व ७ च्यासंदर्भातील माहिती अपूर्ण व चुकीची का वाटत आहे, याचे समर्थन अपिलार्थीने

त्यांच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेले नाही. तसेच यासंदर्भातील त्यांचा तोंडी युक्तिवाद करण्यासाठी देखील अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजील, घर क्र.९-६-२२०, उमर कॉलनी, मस्जीदसमोर, देगलूर रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९८९
निर्णय दिनांकः ०४-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. सुरेश दामोधर गवळी,<br>रा.बोरगाव (बु.) पो. जानेफळ (पं.),<br>ता.जाफ्राबाद, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा,<br>कृषि अधिकारी, भोकरदन,<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा,<br>उपविभागीय कृषि अधिकारी, जालना | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, भोकरदन,जि.जालना
जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, भोकरदन,जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने या अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने माहितीसाठीच्या एकाच मूळ अर्जावर दोन स्वतंत्र द्वितीय अपील अर्ज अनुक्रमे दि. १२.०९.२००८ व दि. १५.०९.२००८ रोजी आयोगास सादर केले आहेत. या पैकी अपिलार्थीने आयोगाकडे दि. १२.०९.२००८ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जावर आयोगाने दि. २५.०६.२००९ रोजी (अपील क्र. ७१७/०८) निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुन, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस कृषि आयुक्तांना केली असल्यामुळे, अपिलार्थीच्या आज रोजीच्या विचाराधीन अपील अर्जावर आता वेगळयाने निर्णय देण्याची आवश्यकता नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. १९८९/०८, दि.१५.०९.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश दामोधर गवळी,रा.बोरगाव (बु.), पो. जानेफळ (पं.),ता.जाफ्राबाद, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, भोकरदन,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,भोकरदन,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२२१
निर्णय दिनांक ०४/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल,<br>रा. जाफ्राबाद, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>जाफ्राबाद, जि. जालना | | |

**निर्णय**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, ता.जाफ्राबाद, जि.जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२२२
निर्णय दिनांक ०४/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल,<br>रा. जाफ्राबाद, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>जाफ्राबाद, जि. जालना | | |

**निर्णय**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री.  निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, ता.जाफ्राबाद, जि.जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२२३
निर्णय दिनांक ०४/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल,<br>रा. जाफ्राबाद, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>जाफ्राबाद, जि. जालना | | |

**निर्णय**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०४/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, ता.जाफ्राबाद, जि.जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९८०

निर्णय दिनांक ०४-१२-२००९

१ श्री. डी. एन. खवले, : अपिलार्थी

मु. पो. हातोला, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग,

उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकरी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,

उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात | : जन माहिती अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद लघुपाटबधारे विभाग, उस्मानाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | | अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्यामुळे आणि अपिलीय अधिका-याने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर चुकीचा निर्णय दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जो जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनांक १८-०७-२०८ रोजी प्राप्त झाला त्याअन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील अपर मांजरा प्रकल्पाच्या उजव्या कालव्याचे खोदकाम सुरु झाल्यापासून ते दिनांक ०७-०७-२००८ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - पूर्ण कालव्याची एकूण लांबी, खोदाकाम सुरु झाल्याचे वर्ष, सन २००६ पर्यंत किती काम झाले, किलोमिटरसह व ज्या किलोमिटरमध्ये काम अडवल्यामुळे करावयाचे राहिले त्याची लांबी किलोमिटर व गावाचे नांव आणि सन २००२-०७ नंतर राहिलेल्या करावयाच्या कामाचे अंदाजपत्रक केले आहे काय ? त्याच्या निविदा काढल्या आहेत काय ? तुकडे केले असल्यास त्यासंबंधीचा जी. आर. - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४ व टपालखर्च रुपये २५ असे एकूण २९ रुपये त्यांच्या कार्यालयात भरण्याचे जन माहिती अधिकारी यांनी सूचित केले. याप्रमाणे अपिलार्थीने सदरचे शुल्क मनीऑर्डरव्दारे जन माहिती अधिकारी यांना पाठविले. हे शुल्क जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०८-०९-२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०९-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व ती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन

अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-११-२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत केले व अपिलार्थीचे प्रथम अपील अमान्य केले. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर होते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक १०-०९-२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडील दिनांक १०-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ मधील काही भाग वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. मात्र अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ४ मधील " तुकडे केले असल्यास त्या संबंधीचा जी. आर. " हा भाग वगळता उर्वरित भागावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे मत व अभिप्राय अपेक्षित असलेली माहिती विचारल्याचे आढळून येत आहे. अशा प्रकारची माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे ती अपिलार्थीस देय नाही.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तुकडे संदर्भातील जी. आर. वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती दिल्याचे आयोगास आढळून यत आहे. अपिलार्थीस दिलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या दोन इतकी असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये चार इतके व टपाल खर्च रु. २५ असे एकत्रित २९ रुपये इतके बरोबर असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस त्यांच्याकडून कामाचे तुकडे संदर्भातील जी. आर. हा त्यांच्या मूळ अर्जातील भाग वगळता उर्वरित सर्व भागांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त झाली आहे. आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देणे असलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, कालव्याच्या कामाचे तुकडे करण्यासंदर्भात त्यांच्या विभागाने पारीत केलेल्या शासन निर्णयाची प्रत त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. डी. एन. खवले, मु. पो. हातोला, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद लघुपाटबंधारे विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९८१

निर्णय दिनांक ०४-१२-२००९

१ श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, : अपिलार्थी
द्वारा गोविंदराज प्रेस, रेल्वेस्टेशनजवळ, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती,
उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वाढवणा (बु.),
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाकडील दिनांक ०१-०४-२००५ ते ३१-०३-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण तीन मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - एप्रिल २००५ पासून वाढवणा ग्रामपंचायतीच्या किती मासिक बैठका झाल्या व या बैठकीमध्ये नामांतर मंजूर झालेल्या अर्जदारांची संख्या, बैठक दिनांक व मंजूर झालेले ठराव, अर्जदाराकडून भरणा करुन घेतलेल्या रक्कमेचा पावती क्रमांक दिनाकांसह, किर्द क्रमांक, ग्रामपचांयतीच्या मालकीची इमारत टेलीफोन व पोस्ट कार्यालयास केव्हा देण्यात आली व त्याच्या भाड्यापोटी किती रक्कम प्राप्त झाली त्याचा पावती क्रमांक दिनांकासह, ग्रामसचिवालयाचे दुकान गाळे बांधल्यापासून कोणाकोणास भाड्याने देण्यात आले, त्यांच्याकडून किती रक्कम भाड्यापोटी वसूल करण्यात आली त्याचा तपशील, पावती क्रमांक, दिनांक, सन २००५ सालापासून शासनाचा विकास निधी वेगवेगळ्या योजनातून किती आला व त्या निधीतून कोणकोणती कामे घेण्यात आली त्या कामांची मोजमाप पुस्तिकेप्रमाणे रक्कम - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने सदरचा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना उद्देशून केला होता. तथापि या माहितीशी संबंधित जन माहिती अधिकारी वाढवणा (बु. ) गावचे ग्रामसेवक असल्यामुळे त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीच्या अर्जाची मूळ प्रत संबंधित ग्रामसेवकास पाठविली. परंतु अपिलार्थीस अपूर्ण माहिती मिळाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे दिनांक १४-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती यांनी दिनांक ०२-०६-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस एका महिन्याच्या आत माहिती देण्याचे ग्रामविकास अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले होते. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने

व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती अपेक्षित आहे. त्यांच्या माहितीप्रमाणे टेलीफोन व पोस्ट खात्याकडून त्यांना देण्यात आलेल्या जागेचे भाडे सरपंचांना मनीऑर्डरव्दारे प्राप्त होत असते. मनीऑर्डरव्दारे प्राप्त झालेल्या रकमेचा भरणा संबंधित सरपंच हे जिल्हा परिषदेच्या कोषागारात न करता ती रक्कम त्यांच्याकडे ठेवत आहेत त्यामुळे त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे असणे शक्य नाही, असे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी ते या पदावर नव्हते. या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन ग्रामसेवक श्री. कांबळे (सध्या शिरुर अनंतपाळ येथे कार्यरत) व श्री. राठोड (सध्या नागलगांव ग्रामपंचायत येथे कार्यरत ) हे अधिकारी कार्यरत होते. या दोनही अधिका-यांनी त्यांना या संदर्भातील कोणतेही अभिलेखे दिले नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

आज रोजी उपस्थित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांना वाढवणा (बु.) सरपंच हे शासकीय निधीचा अपहार करत आहेत हे खरे आहे काय असे आयोगाने विचारले असता, त्यांनी आयोगास असे उतर दिले की, पंचायत समिती कार्यालयातर्फे त्यांनी संबंधित सरपंचांना त्यांनी ग्राम सचिवालयाच्या इमारतीच्या भाड्यापोटी प्राप्त झालेल्या रकमेचा भरणा करण्याचे वेळोवेळी सूचित केले होते. तथापि त्यांनी हा भरणा जिल्हा परिषदेस केला नाही. ही बाब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, लातूर यांच्या निदर्शनास आणली होती का, असे त्यांना असे विचारले असता, त्यांनी आयोगास नकारार्थी उत्तर दिले आहे.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीस तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. कांबळे यांनी काही माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिका-याकडून अद्यापपावेतो त्यांना प्राप्त झाली नसल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी कथित अपहाराशी संबंधीत असली तरी संबंधित गट विकास अधिकारी व ग्रामसेवक यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही व परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणशिवाय वंचित राहिल्याचे आयोगाच्या निदर्शनास येत आहे. आज रोजी सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती दहा दिवसाच्या आत देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, ही माहिती पंचायत समितीच्या कार्यालयामध्ये देखील उपलब्ध असावयास हवी. सबब गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन ती जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रतिसाद न देण्यासाठी जबाबदार असल्याने तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. कांबळे (सध्या ग्रामसेवक, शिरुर अनंतपाळ या पदावर कार्यरत) व श्री. राठोड, ग्रामसेवक ( सध्या ग्रामपंचायत नागलगाव येथे कार्यरत) यांच्यावर

प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे मौ. वाढवणी येथील ग्रामपंचायतीमध्ये जिल्हापरिषदेच्या रकमेचा अपहार ब-याच काळापासून चालू असावा, असे आयोगाचे अनुमान आहे. तेव्हा या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी, आवश्यकता वाटल्यास, पोलीस यंत्रणेचे सहाय्य घेऊन या प्रकरणाची सखोल चौकशी करावी व वाढवणा (बु.) गावाच्या सरपंचावर त्यांनी प्रचलीत नियमाप्रमाणे यथायोग्य कारवाई करावी, अशी त्यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती उदगीर यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती मुद्दा क्रमांक २ व ३ त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी मार्फत, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना संबंधीत जन माहिती अधिकारी श्री. कांबळे व श्री. राठोड यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, द्वारा- गोविंदराज प्रेस, रेल्वेस्टेशनजवळ, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वाढवणा (बु.), तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ गट विकास अधिकारी, पंचायत समिती उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९८२

निर्णय दिनांक ०४-१२-२००९

१ श्री. राजकुमार गणपतराव क-हाळे, : अपिलार्थी
मु. पो. गिरगांव, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग
वसमत, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, उपविभाग वसमत, जिल्हा हिंगोली

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग वसमत, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न देता त्यांनी केलेला भ्रष्टाचार दडपण्यासाठी त्यांनी ही माहिती जाणीवपूर्वक अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली नाही. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जो जन माहिती अधिकारी यांना दिनांक २६-०६-२००८ रोजी प्राप्त झाला त्याव्दारे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे व्यक्तिशः मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती न पुरविण्यात आल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही दखल घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. अशा प्रकारे आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, ते या पदावर दिनांक ०५-११-२००९ रोजी रुजू झाले असून अपिलार्थीने ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती मागितली आहे त्या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे त्यांना अद्यापपावेतो आढळून आली नसल्याचे त्यांनी आयोगासमोर स्पष्ट केले.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २९-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, हिंगोली यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, हिंगोली यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच वीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, हिंगोली यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २९-०७-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच वीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजकुमार गणपतराव क-हाळे, मु. पो. गिरगांव, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९८३

निर्णय दिनांक ०४-१२-२००९

१ श्री. जयराम सिध्देश्वर कंचलीवार, : अपिलार्थी
कृष्णा गारमेंटस, मेन रोड, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट शिक्षणाधिकारी कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : केंद्र प्रमुख, केंद्रीय प्राथमिक शाळा, तोटंबा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. अंकुश भुतापल्ले

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती न दिल्यामुळे व टाळाटाळ करुन विलंब केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा त्रयस्थ पक्ष व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच त्रयस्थ श्री. अंकुश भुतापल्ले जे या प्रकरणी माहिती अधिकारी आहेत त्यांनी, या प्रकरणी अपिलार्थीच्या जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट यांना उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दिनांक २५-११-२००९ रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना दिनांक २५-११-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या-कडून त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्या विरुध्द केलेले अपील मागे घेतले आहे.

यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेले प्रथम अपील दिनांक २५-११-२००९ रोजी मागे घेतले आहे. अपिलार्थीने त्यांचे प्रथम अपील मागे घेतले असल्यामुळे व अपिलार्थीची आज रोजी सुनावणीच्या वेळी असलेली अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास उरले नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक १९८३/२००८, दिनांक ०१-१२-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जयराम सिध्देश्वर कंचलीवार, कृष्णा गारमेंटस, मेन रोड, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा केंद्र प्रमुख, केंद्रीय प्राथमिक शाळा, तोटंबा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९७८

निर्णय दिनांक ०४.१२.२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महेश कृष्णाजी जोशी,<br>रा. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता (सिंचन), लघुपाटबंधारे<br>उपविभाग, जिल्हा परिषद, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (सिंचन), लघुपाटबंधारे<br>विभाग, जिल्हा परिषद, जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २५२० /- इतके दिनांक १२.०९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जमा केले असताना देखिल त्यांना कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही. म्हणून अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक ३०.११.२००८ पर्यंत माहिती देण्याचे

सूचित केले.  तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आयोगास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उर्वरित माहिती विनामूल्य देण्याचे व जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे जास्तीत जास्त शासन करुन शिस्तभंगाची कारवाई करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०१.०४.२००७ ते दिनांक ३१.०३.२००८ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती.  अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या पतमर्यादांचे आदेश आणि जन माहिती अधिकारी यांनी तहसीलदार कार्यालयात पाठविलेले मजूर उपस्थिती अहवाल, मजुराचे वेतन कोणत्या सक्षम महसूल अधिकाऱ्यासमोर वाटले त्यांची नावे पदनाम सहीत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांना दिनांक १४.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २५२०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.  अपिलार्थीने माहितीपोटीचे सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीकाला दिले. त्या लिपीकास अपिलार्थीकडून शुल्क मिळाल्याची संबंधित पोच आायोगास सादर केली आहे. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतूदीनुसार दिनांक ०८.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.११.२००८ रोजी उप अभियंत्यास पत्र लिहून अपिलार्थीस दिनांक ३०.११.२००८ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले व त्यांना ताकीद

दिली. तथापि यानंतरही विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी प्रथमतः अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २५२०/- इतके दिनांक १२.०९.२००८ रोजी स्विकारुन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातर्फे कच्ची पावती दिली. तदनंतर अपिलार्थीच्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा त्यांनी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद येथे डिसेंबर २००८ मध्ये केला. बँकेच्या शिक्यावरुन तारखेचा बोध होऊ शकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे शुल्क रु. २५२०/- इतके प्राप्त करुन घेऊन प्रत्यक्षात स्टेट बँक ऑफ हैद्राबाद येथे २२२६/- इतक्या रकमेचा भरणा केला आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या दिनांक २६.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली. तदनंतर दिनांक ०३.१०.२००९ रोजी अपिलार्थीस उर्वरित माहिती देऊ केली असता, ती अपिलार्थीने स्विकारली नाही. अपिलार्थीस पाठविलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०३.१०.२००९ रोजीच्या पत्राची तामिली झाली किंवा कसे अशी आयोगाने विचारणा केली असता, या संदर्भातील कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी यांना आयोगास दाखविता आला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकार यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १४.०८.२००८ रोजीच्या अर्जास उद्देशून लिहिलेल्या

पत्राचे अवलोकन केले असता, या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना अधिनियमातील कलम ७ (३)(क) प्रमाणे आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील त्यांनी अपलिार्थीस कळविला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे हे पत्र अवैध होत आहे. यापेक्षा महत्त्वाचे असे की, यानंतर अपिलार्थीने दिनांक १२.०९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात २५२०/- रु. इतक्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी दिनांक २९.११.२००८ रोजी अपूर्ण माहिती पुरविली. व त्यानंतर दिनांक ०३.१०.२००९ रोजी अपिलार्थीस उर्वरित माहिती देऊ केली. तथापि अपिलार्थीस ही माहिती उपयोगी पडू शकली नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी नेमकी कोणती माहिती दिली याचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये पतमर्यादेसंबंधी व अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात माहिती त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. या उर्वरित माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली, असे म्हणण्याव्यतिरिक्त अपिलार्थीस ही माहिती दिल्याचा कोणताही सबळ पुरावा आयोगास सादर करता आलेला नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती दिली नसावी, असे अनुमान काढण्यात हरकत नाही. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना या कालावधीतील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. परंतु याच बरोबर ही माहिती सांक्षांकित नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सांक्षांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सांक्षांकीत स्वरुपात माहिती दिलेली नाही. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात मजुरांचे वेतन कोणत्या सक्षम अधिकाऱ्यासमोर अदा केले त्यांचे नाव, पदनाम अशीही माहिती

त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे आयोगास आढळून येत नाही अथवा ही माहिती दिल्याचा सबळ पुरावा जन माहिती अधिकारी आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. त्यामुळे आवश्यक त्या सबळ पुराव्याअभावी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली, हा त्यांचा युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती सांक्षांकित करुन अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या संपूर्ण शुल्काचा भरणा करुन प्रत्यक्षात स्टेट बँक ऑफ हैद्राबाद मध्ये कमी रकमेचे चलन भरुन जन माहिती अधिकारी यांनी व त्यांच्या संबंधित सहायकांनी या प्रकरणी त्यांच्या कार्यशैलीमधील नितांत सचोटीचा अभाव स्पष्ट केला असल्याचे दिसून येत आहे. शासकीय कार्यालयामध्ये नागरिकांनी रकमेचा रोखीच्या स्वरुपात भरणा केल्यानंतर शासकीय पावती देण्याची पध्दत शासन यंत्रणेत प्रचलित आहे. शासकीय कार्यालयामध्ये अशाप्रकारे नागरिकांनी प्रथम त्यांनी भरलेल्या रकमेची कच्ची पावती त्यांना देणे व नंतर त्या रकमेचा कोषागारात भरणा करणे अशाप्रकारची पध्दत अवलंबिली जात नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीकडून स्वीकृत केलेल्या शुल्काची रक्कम व प्रत्यक्षात बँकेत भरलेल्या शुल्काची रक्कम व शुल्क प्राप्तीचा दिनांक आणि शासकीय कोषागारात हे शुल्क भरण्याच्या दिनांकामधील तफावतीबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्या स्तरावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील या प्रकरणाशी सर्व संबंधितांवर हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याच्या आत प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

एकदा अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क स्विकारल्यानंतर या प्रकरणी अपिलार्थीस शुल्क कळविल्याची तारीख व अपिलार्थीने प्रत्यक्षात शुल्काचा भरणा

केल्याची तारीख यातील फरक लक्षात घेता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७.०९.२००८ रोजी अगर तत्पूर्वी अपिलार्थीस संपूर्ण माहिती देणे त्यांना आवश्यक होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मूळात प्रथमतः दिनांक २६.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, म्हणजे ही मुदत संपल्यानंतर माहिती देऊ केली आहे. ती देखिल अपूर्ण स्वरुपात दिली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे स्विकारलेले शुल्क रु. २५२०/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करुन घेऊन अपलिार्थीस कोणतीही माहिती पूर्णपणे न देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतूदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांच्या कार्यालयातील संबंधित सहायक देखिल जबाबदार असल्याने व त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद असल्याने संबंधित उपअभियंता श्री. मोहम्मद फैयाज व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित इतर सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (जलसंपदा) व जिल्हा परिषदेच्या अस्थापनेवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, सांक्षाकित करुन हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. २५२०/- इतके त्यांना वरील क्रमांक २ मध्ये निर्देशित केलेल्या कालावधीमध्ये परत करावे.

४. सचिव (जलसंपदा) यांना, या प्रकरणाशी संबंधित उप अभियंता श्री. मोहम्मद फैय्याज यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना, लघुपाटबंधारे उपविभाग, जिल्हा परिषद, जालना येथे कार्यरत असलेल्या या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या सर्व सहायकांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे त्यांच्या कार्यशैलीतील नितांत सचोटीच्या अभावाबद्दल यथायोग्य शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महेश कृष्णाजी जोशी, द्वारा, श्री. डी. आर. कुलकर्णी, प्लॉट नं. ४३, वृंदावन कॉलनी, जुना जालना, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा

परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (जलसंपदा विभाग), मंत्रालय मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९७९

निर्णय दिनांक ०४.१२.२००९

१ सौ. रेखा शिवदास शहाणे, : अपिलार्थी
रा. अंबड, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
घनसावंगी, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी,
जि. जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, घनसावंगी, जि. जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ३०.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामार्फत जानेवारी ते मार्च या कालावधीमध्ये झालेल्या कामासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - झालेल्या कामाच्या मजुरांच्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत, मस्टर व एस्टीमेट्ची झेरॉक्स प्रत, कोणत्या गावात किती लाखाचे सिमेंट बंधाऱ्याचे काम झाले त्या कामाच्या चेकच्या झेरॉक्स प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये विशिष्ट वर्षाचा उल्लेख केला नसल्यामुळे अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा त्यांना बोध होऊ शकत नाही असे नमूद करुन अपिलार्थीचा मूळ अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतूदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज अपिलार्थीने तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांना उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचा युक्तिवाद केला. जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीच्या दिनांक ३०.०५.२००८ रोजीच्या अर्जासंबंधी दिनांक २५.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी आपला निर्णय कळविला, असा युक्तिवाद त्यांनी आयोगासमोर केला. तथापि अपिलार्थीस दिनांक २५.०६.२००८ रोजीचे पत्र त्यांच्या कार्यालयामार्फत पाठविल्याचा कोणताही पुरावा त्यांना आयोगासमोर सादर करता आला नाही. आयोगाने या संदर्भात आज रोजीच्या सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या नोटीसीमध्ये अशाप्रकारचा पुरावा त्यांनी सुनावणीसाठी बरोबर आणणे हे अनिवार्य असल्याचा उल्लेख केला आहे. तरीही जन माहिती अधिकारी यांनी असा कोणताही पुरावा सोबत आणलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५.०६.२००८ रोजी मूळात पत्र पाठविले नसावे असे ग्राह्य धरण्यात येत आहे.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या दिनांक ३०.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधीच्या वर्षाचा उल्लेख केलेला नाही. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना फक्त जानेवारी ते मार्च अशा महिन्याचा उल्लेख केला आहे. परंतु त्यांना कोणत्या वर्षाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे, त्या वर्षाचा उल्लेख त्यांनी मूळ अर्जामध्ये केला नसल्याने अपिलार्थीचा दिनांक ३०.०५.२००८ रोजीचा मूळ अर्ज या प्रकरणी अवैध असल्याचे सिध्द होत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५.०६.२००८ रोजी दिलेल्या पत्राचा सबळ पुरावा जन माहिती अधिकारी हे आज आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे अनुमान काढण्यात येऊन आयोगातर्फे तत्कालीन व आज रोजी कार्यरत असलेले संबंधित जन माहिती अधिकारी श्री. सय्यद वाय. एम. यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सहसंचालक, कृषि औरंगाबाद यांना

करण्यात येत आहे. अपिलार्थीने माहितीसाठीच्या मूळ अर्जात जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपूर्ण माहिती सादर केली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. सह संचालक कृषी यांना, तालुका कृषी अधिकारी, घनसावंगी यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले संबंधित जन माहिती अधिकारी श्री. सय्यद वाय.एम. यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. रेखा शिवदास शहाणे, नूतन वसाहत, अंबड, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, घनसावंगी, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सहसंचालक, कृषि औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९९५
निर्णय दिनांकः ०५-१२-२००९

१. सौ. एस.पी. नैण, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
तालुका कृषि कार्यालय,अर्धापूर
जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर,
जि.नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,अर्धापूर,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार कायद्यातील तरतुदींना अनुसरुन जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय अर्धापूर यांच्याकडे रितसर अर्ज दि. २८.०७.२००८ रोजी पोस्टाने पाठवून दिला असता, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.

०८.१०.२००८ रोजी सुनावणी घेऊन नियमबाहय निर्णय पारित केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत आर्थिक वर्ष २००२ ते मार्च, २००८ या कालावधीमध्ये घेण्यात आलेल्या शेती शाळा व रो.ह.यो.अंतर्गत घेतलेल्या कामांविषयी विस्तृत प्रमाणात सत्यप्रतींच्या स्वरुपात काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्याकडील दि. ११.०८.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती काढण्याचे काम चालू असल्याचे अपिलार्थीस कळविले व तदनंतर दि. २०.०८.२००८ रोजी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ६६८०/-चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०९.२००८ असा दिनांकाचा उल्लेख केलेला प्रथम अपील अर्ज दि. १५.०९.२००८ रोजी पाठवून दिला. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळले व अपिलार्थीस माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे अपिलार्थीस सूचित केले. तथापि त्यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनाप्रमाणे कोणतीही कार्यवाही न करता वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.०७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत दि. २०.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अधिनियमातील कलम ७(३)(क) मधील तरतुदीप्रमाणे योग्य त्या तपशीलासह कळविले आहे.अपिलार्थीस हे पत्र दि. २२.०८.२००८ रोजी प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी यांनी रजिस्टर्ड पोस्टाची पावती आयोगाच्या अवलोकनास्तव सादर केली आहे. परंतु अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता जन अपिलीय यांच्याकडे दि. १५.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जावर निर्णय देताना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती आवश्यक असल्यास त्यांनी आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे करावा असे त्यांच्या दि. १३.१०.२००८ रोजीच्या निर्णयामध्ये कळवून अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय अपिलार्थीस दि. १८.१०.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून आले आहे. तथापि हा निर्णय नियमबाहय असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. या संपूर्ण प्रक्रियेचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर विहित मुदतीत निर्णय दिला आहे. या दोनही टप्प्यावर अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी

अथवा जन अपिलीय अधिकारी यांनी नाकारलेले नाही परंतु अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसूनही, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा त्यांनी या प्रकरणी केलेला नाही अथवा या शुल्काचा भरणा करण्यासाठी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर तयारी दर्शविलेली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्याप्रमाणे अर्जदाराने मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात कार्यवाही करणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य असते त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरणा करण्याचे अर्जदाराचे देखील तितकेच कर्तव्य असते, असे अधिनियमातील कलम ७ (५) मधील तरतुदीवरुन दिसून येते. या प्रकरणी अपिलार्थीने आपले कर्तव्य अधिनियमातील कलम ७(५) च्या तरतुदीप्रमाणे पार न पाडल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती  प्राप्त होऊ शकली नाही. अशाप्रकारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त न होण्यासाठी त्या स्वतःच जबाबदार असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी.नैण, द्वारा मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे,सहयोगनगर, नांदेड, ता.जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय,अर्धापूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर, जि.नांदेड  यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९९६
निर्णय दिनांकः ०५-१२-२००९

१. सौ. एस.पी. नैण, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
तालुका कृषि कार्यालय,लोहा
जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, लोहा,
जि.नांदेड
प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, लोहा,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा दि. २८.०७.२००८ रोजीचा प्रथम अर्ज पोस्टाने पाठवून दिला असता, त्यांनी विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने प्रथम अपिलेट अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे शपथपत्र दाखल केले असून, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे या शपथपत्रामध्ये म्हटले आहे. या मुद्यावर अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की त्यांनी, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत नव्याने अर्ज करावा व त्याची नोंद जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी. अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही केली जाईल याची दक्षता घ्यावी, असे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी.नैण, द्वारा, मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे,सहयोगनगर, नांदेड, ता.जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, लोहा,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १९९८/०८ व २००१/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९९८ व २००१
निर्णय दिनांक: ०५-१२-२००९

१. सौ. एस.पी. नैण, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१. **अपील क्र.१९९८/०८:**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय,बिलोली<br>जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, बिलोली<br>जि.नांदेड | :प्रतिवादी |

२. **अपील क्र. २००१/०८:**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय,हिमायतनगर<br>जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, हिमायतनगर<br>जि.नांदेड | |
| प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : | कृषि अधिकारी, तालुका कृषि<br>अधिकारी कार्यालय, हिमायतनगर,<br>जि.नांदेड | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००८ रोजी नोंदविलेली अपील क्र. १९९८/०८ व २००१/०८ ही दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

अपिलार्थीने विचाराधीन अपील क्र. १९९८/०८ हे तालुका कृषि अधिकारी, बिलोली व अपील क्र.२००१/०८ हे तालुका कृषि अधिकारी, हिमायतनगर यांच्या कार्यालयाकडे त्यांनी दि.

२६.०७.२००८ रोजी मागणी केलेल्या माहितीसाठीचा अर्जाच्या संबंधाने केलेले आहे. आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या दोनही प्रकरणी त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दोनही जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. २६.०७.२००८ रोजी माहिती मागविली असता, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली यांनी त्यांच्या अपील अर्जाची सुनावणी घेऊन निर्णय प्रलंबित ठेवला आणि तालुका कृषि कार्यालय,हिमायतनगर यांच्याकडे दि. २०.१०.२००८ रोजी लेखी अर्ज केला असतानाही सुनावणीची तारीख वाढवून न देता प्रकरण प्रलंबित ठेवले, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित आर्थिक वर्ष २००२ ते मार्च, २००८ या कालावधीतील विस्तृत प्रमाणात माहिती मागविली होती. तथापि दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अपेक्षित माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी अपील क्र. २००१/०८ च्या संदर्भात तालुका कृषि अधिकारी,हिमायतनगर यांच्याकडे दि. ०२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदरचा अपील अर्ज तालुका कृषि अधिकारी, हिमायतनगर यांना प्रत्यक्षात दि.१६.०९.२००८ रोजी प्राप्त झाला. अपील क्र. १९९८/०८ च्या संदर्भात तालुका कृषि अधिकारी, बिलोली हे गैरहजर असल्यामुळे त्यांना अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे केव्हा प्राप्त झाला किंवा तो प्राप्त झालाच नाही हे आयोगास संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. तथापि या दोनही प्रकरणी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने विचाराधीन द्वितीय अपिले आयोगाकडे केली असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व अपील क्र. १९९८/०८ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, बिलोली हे अनुपस्थित आहेत व अपील क्र. २००१/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, हिमायतनगर आयोगासमोर उपस्थित आहेत.

कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, हिमायतनगर यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. २६.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जास दि. ०८.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३९०२/- इतके त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर प्रथमतः दि. २१.१०.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि ही तारीख अपिलार्थीस गैरसोयीची असल्यामुळे अपिलार्थीच्या दि. २०.१०.२००८ रोजीच्या विनंती अर्जानुसार त्यांनी दि. १२.११.२००८ रोजी परत सुनावणी ठेवली होती. परंतु याही वेळी अपिलार्थी अनुपस्थित राहिल्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय घेतला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस केव्हाही सशुल्क पुरविण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, हिमायतनगर यांनी अपिलार्थीच्या दि. २६.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३९०२/- इतके

त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले होते. परंतु या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.१०.२००८ रोजी सुनावणी ठेवली असता, अपिलार्थीने ही तारीख बदलण्याची जन अपिलीय अधिकारी यांना त्यांच्या दि. २०.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे विनंती केली. त्याप्रमाणे त्यांनी या सुनावणीची तारीख दि. १२.११.२००८ अशी ठेवली. परंतु या सुनावणीस देखील अपिलार्थी या गैरहजर राहिल्या आणि त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. या एकूण प्रकारावरुन अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे त्यांचे कर्तव्य न बजावून अधिनियमातील कलम ७(५) चा भंग केला आहे व त्याच बरोबर जन अपिलीय अधिकारी आणि आयोगाकडे अपिलांच्या सुनावणीस गैरहजर राहिल्या आहेत. याचा अर्थ त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती विनामूल्य हवी आहे, असे आयोगास वाटते. या प्रकरणी अपिलार्थी या दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसल्यामुळे, त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनच प्राप्त करुन घ्यावी लागेल. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कृषि अधिकारी, हिमायतनगर यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे कोठेही नाकारलेले नाही. हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी त्या स्वतःच जबाबदार असल्याचे आढळून आले असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्र.२००१/०८ हे फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

अपील क्र. १९९८/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, बिलोली, जि.नांदेड यांच्याकडे मूळात अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज दाखल झाला आहे किंवा कसे, यासंदर्भात अपिलार्थीने कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही तसेच बिलोली कार्यालयाकडे केलेल्या अपिलाशी संबंधित प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज यांच्या झेरॉक्स प्रतीवर बिलोली कार्यालयाचा कोणताही शिक्का अथवा त्यांच्या कार्यालयातील कोणत्याही लिपीकाची सही असल्याचे आढळून येत नाही, त्यामुळे अपिलार्थीने मूळात बिलोली

कार्यालयाकडे अर्ज केला होता किंवा कसे, हे आयोगास संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. सबब आवश्यक त्या कागदपत्रांच्या अभावी व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या विचाराधीन दोनही अपिलांसंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. १९९८/०८ व २००१/०८ फेटाळण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी.नैण, द्वारा मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे,सहयोगनगर, नांदेड, ता.जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, बिलोली, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,हिमायतनगर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, हिमायतनगर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९९९
निर्णय दिनांकः ०५-१२-२००९

१. सौ. एस.पी. नैण, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
तालुका कृषि कार्यालय,किनवट
जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, किनवट,
जि.नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,किनवट,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २६.०७.२००८ रोजी पोस्टाने अर्ज पाठवून दिला असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीच्या आत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.१०.२००८ रोजी सुनावणी घेऊन निर्णय प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती.अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दि. १३.०८.२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १९,९२४/- इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे त्यांच्या दि. १२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा हा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.०९.२००८ रोजी प्राप्त झाला असून या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.१०.२००८ रोजी आपले आदेश पारित केले आहेत. या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर होते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दाखविली तथापि एवढया माहितीची आवश्यकता नसल्याचे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये सांगितले आणि या कागदपत्रातील एकूण २० पृष्ठांची माहिती त्यांना आवश्यक असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांना सांगितले. त्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु त्याच दिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविली. ही माहिती मिळाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १३.१०.२००८ रोजी पोचसही दिली आहे. तथापि त्यांच्या प्रथम अपिलावरील निर्णय प्रलंबित ठेवल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे दि. २२.१२.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आणि तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या वस्तुस्थितीशी सुसंगत युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार त्यांनी अपिलार्थीस सुनावणीच्या दिवशीच त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य व व्यक्तिशः हस्तांतरित केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य दि. १३.१०.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून येत आहे. उर्वरित माहितीपोटीचे शुल्क भरण्याची तयारी अपिलार्थीने या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर दाखविलेली नाही. या बाबी लक्षात घेता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी.नैण, द्वारा मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे,सहयोगनगर, नांदेड, ता.जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०००
निर्णय दिनांकः ०५-१२-२००९

१. सौ. एस.पी. नैण, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, :प्रतिवादी
तालुका कृषि कार्यालय,माहूर
जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, माहूर,
जि.नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, माहूर,जि.नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २६.०७.२००८ रोजी पोस्टाने अर्ज पाठवून दिला असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीच्या आत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०९.२००८ रोजी सुनावणीसाठी अपिलार्थीस बोलाविले असता जन अपिलीय अधिकारी गैरहजर राहिले व त्यांनी अपिलार्थीची दिशाभूल केली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ०१.०४.२००२ ते ३१.०३.२००८ या कालावधीशी संबंधित विस्तृत प्रमाणातील माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२६.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आठ पृष्ठांची माहिती विनामूल्य पुरविली व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या उर्वरित माहितीच्या प्रतींकरिता एकूण रु. ४५,०००/- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार त्यांचा दि. ०२.०९.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०९.२००८ रोजी सादर केला. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०९.२००८ रोजी सुनावणी ठेवली असता, या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत आणि जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील त्यांना देता येण्यासारखी माहिती त्यांनी दि. २६.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. तसेच अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीसंदर्भात दि. २५.०९.२००८ रोजी सुनावणी ठेवली असता अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत, त्यामुळे अपिलार्थीचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन जन

अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.१०.२००८ रोजी अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. अपील निकाली काढल्यानंतर अपिलार्थीने परत दि. ३०.१०.२००८ रोजी विनामूल्य माहिती देण्यासाठी अर्ज दाखल केला. या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती दिशाभूल करणारी असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीस आता द्यावयाच्या माहितीकरिता अपिलार्थीस आता बाकी असलेल्या माहितीपृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी लागेल. तथापि अपिलार्थी या, या शुल्काचा भरणा करण्यासाठी तयार नसून त्यांना ही माहिती विनामूल्य हवी आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस केलेल्या पत्रव्यवहाराच्या पृष्ठयर्थ आवश्यक तो पुरावा आयोगास दाखविला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यांचे अवलोकन करता असे आढळून येत आहे की जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २६.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक तो प्रतिसाद विहित मुदतीत देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४,५०००/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या संपूर्ण घटनाक्रमात या शुल्काचा भरणा करण्याची कोणत्याही टप्प्यावर तयारी दर्शविली नाही.अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जानुसार अपिलार्थी या दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती प्राप्त करुन घ्यावी लागेल, असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. अशाप्रकारे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(५) च्या तरतुदींचे पालन स्वतः न केल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त होऊ शकत नाही. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०५-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. एस.पी.नैण, द्वारा मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे,सहयोगनगर, नांदेड, ता.जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, माहूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२२४
निर्णय दिनांक ०५/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल,<br>रा. जाफ्राबाद, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>जाफ्राबाद, जि. जालना | | |

**<u>निर्णय</u>**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, ता.जाफ्राबाद, जि.जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२२५
निर्णय दिनांक ०५/१२/२००९

१ श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, : अपिलार्थी
रा. जाफ्राबाद, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषी अधिकारी,
तालुका कृषी कार्यालय, जाफ्राबाद, जि. जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
जाफ्राबाद, जि. जालना

**निर्णय**

श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ७२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. निलेश शांतीलाल खंडेलवाल, बाजार गल्ली, मेनरोड, जाफ्राबाद, ता.जाफ्राबाद, जि.जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १९९०/२००८, १९९३/२००८, १९९४/२००८ व २००२/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९९०, १९९३, १९९४ व २००२

निर्णय दिनांक ०५-१२-२००९

१ सौ. एस. पी. नैण, अपिलार्थी

व्दारा- मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व
विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे,
सहयोगनगर, नांदेड

**विरुध्द**

१ अपील क्रमांक १९९०/२००८

जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर,
जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, देगलूर, तालुका देगलूर,
जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड

२ अपील क्रमांक १९९३/२००८

जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि कार्यालय, उमरी, तालुका उमरी,

जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, तालुका उमरी,

जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड

३ अपील क्रमांक १९९४/२००८

जन माहिती अधिकारी

तथा तालुका कृषि कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद,

जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, धर्माबाद, तालुका धर्माबाद,

जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी (तंत्र), तालुका कृषि अधिकारी कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

४ अपील क्रमांक २००२/२००८

जन माहिती अधिकारी

तथा तालुका कृषि कार्यालय, भोकर, तालुका भोकर,

जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, भोकर, तालुका भोकर,

जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी

कार्यालय, भोकर, तालुका भोकर,

जिल्हा नांदेड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१२-२००८ रोजी नोंदविलेली वरील चारही स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक ०५-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सर्व संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीच अपिलार्थीने या चारही अपील अर्जावर त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही असे त्यांच्याकडील दिनांक ०२-१२-२००९ व दिनांक ०५-१२-२००९ रोजीच्या आयोगास उद्देशून लिहिलेल्या चार स्वतंत्र अर्जामध्ये नमूद करुन सदर अर्ज आयोगास सादर केले आहेत. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी आयोगाकडे केलेली विचाराधीन अपिले क्रमांक १९९०/२००८, १९९३/२००८ व २००२/२००८ ही ते स्व:खुषीने मागे घेत असल्याचे नमूद करुन ती रद्द करण्याची व अपील क्रमांक १९९४/२००८ च्या संदर्भात त्यांचे प्रकरण निकाली काढण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलर्थीनेच त्यांची विचाराधीन चारही अपिले रद्द करण्याची व निकाली काढण्याची आयोगास विनंती केली असल्यामुळे अपिलार्थीची विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

# <u>आदेश</u>

१. अपील क्रमांक १९९०/२००८, दिनांक २२-०५-२००८ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १९९३/२००८, दिनांक २२-०५-२००८ खारीज करण्यात येत आहे.

३. अपील क्रमांक १९९४/२००८, दिनांक २२-०५-२००८ खारीज करण्यात येत आहे.

४. अपील क्रमांक २००२/२००८, दिनांक २२-०५-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, व्दारा- मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, तालुका उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी (तंत्र), तालुका कृषि अधिकारी कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १९९१/२००८, १९९२/२००८ व १९९७/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९९१,१९९२ व १९९७

निर्णय दिनांक ०५.१२.२००९

१ सौ. एस.पी.नैण, रा. नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

**<u>अपील क्रमांक १९९१/२००८</u>**

१ जन माहिती अधिकारी,
तालुका कृषी कार्यालय,मुखेड, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषी अधिकारी, मुखेड,
जि. नांदेड

**<u>अपील क्रमांक १९९२/२००८</u>**

१ जन माहिती अधिकारी,
तालुका कृषी कार्यालय,नायगांव, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका कृषी अधिकारी, नायगांव,
जि. नांदेड

**<u>अपील क्रमांक १९९७/२००८</u>**

१ जन माहिती अधिकारी,

तालुका कृषी कार्यालय,हदगांव, जि. नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषी अधिकारी, हदगांव, जि. नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी, हदगांव,
जि. नांदेड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.१२.२००८ रोजी नोंदविलेली ३ स्वतंत्र अपिले क्रमांक १९९१/०८, १९९२/०८ व १९९७/२००८ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या ३ अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार तालुका कृषी कार्यालय, मुखेड, नायगांव यांच्याकडे दिनांक २८.०७.२००८ रोजी व हदगांव कार्यालयात दिनांक २६.०७.२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज केला असता, त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी तालुका कृषी अधिकारी, मुखेड, नायगांव व हदगांव यांच्याकडे दिनांक ०२.०९.२००८ रोजी ३ स्वतंत्र द्वितीय अपिले दाखल केली होती. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे व जन महिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहे.

या ३ प्रकरणी अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१.०४.२००२ ते दिनांक ३१.०३.२००८ या कालावधीतील विस्तृत प्रमाणात माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन

आपले निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, मुखेड, नायगांव व हदगांव यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०२.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच झालेला संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन, आपले आदेश पारित करावे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) अन्वये सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती अयोगाकडे द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची विचाराधीन तीनही अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील १९९१/०८, १९९२/०८ व १९९७/०८ निकाली काढण्यात येत आहेत.

२. संबंधित तीनही जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या त्यांच्याशी संबंधित प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस.पी.नैण, द्वारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिरच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी कार्यालय,मुखेड, जि. नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी कार्यालय,नायगांव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, नायगांव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी, हदगांव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, हदगांव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९३
निर्णय दिनांक ०७/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संजय क्षीरसागर,<br>सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट,<br>वेदांत नगर, सावेडी,<br>अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>अहमदनगर विभाग, अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी श्री. अशोक गोविंद धारिया, पुणे यांनी दि. २९.०१.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री. धारिया यांनी सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी २२.०८.२००८ रोजी निर्णय देऊन श्री. धारिया यांचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती सात दिवसाच्या आत उपलब्ध

करुन देण्याचे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील आणि सहायक धर्मादाय आयुक्त यांचे प्रतिनिधी सर्वजण उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, श्री. धारिया यांनी प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या मार्फत नोंदणीकृत झालेल्या एका खाजगी संस्थेकडे मागितली आहे. अशाप्रकारच्या खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुधद मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

“........... It is, therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for

any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act.”

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी श्री. धारीया यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून येते. तसेच या प्रकरणी असेही स्पष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी श्री. धारिया यांनी ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था व सहायक धर्मादाय आयुक्त हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत. त्यामुळे श्री. धारिया यांनी जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी या प्रकरणी आदेश देणे त्यांना अनुज्ञेय झाले असते. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश अशाप्रकारे अवैध होत आहेत. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग, अहमदनगर यांचे दि. २२.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**अहमदनगर**
**दिनांक : ०७/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक गोविंद धारिया, ‘परवीन अपार्टमेंट’, फ्लॅट नं. १०४, ३/८, एरंडवणे, पुणे ४११ ००४.
२. श्री. संजय क्षीरसागर, सचिव, श्री.दत्त देवस्थान ट्रस्ट, वेदांत नगर, सावेडी, अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९४
निर्णय दिनांक ०७/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. संजय क्षीरसागर,<br>सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट,<br>वेदांत नगर, सावेडी,<br>अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>अहमदनगर विभाग, अहमदनगर | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी सौ. स्वाती विवेक इनामदार, पुणे यांनी दि. २९.०१.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने सौ. इनामदार यांनी सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी २२.०८.२००८ रोजी निर्णय देऊन सौ. इनामदार यांचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांना आदेशित केले. जन अपिलीय

अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील आणि सहायक धर्मादाय आयुक्त यांचे प्रतिनिधी सर्वजण उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, सौ. इनामदार यांनी प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या मार्फत नोंदणीकृत झालेल्या एका खाजगी संस्थेकडे मागितली आहे. अशाप्रकारच्या खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुधद मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

“........... It is, therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for

any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act.”

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी सौ. इनामदार यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून येते. तसेच या प्रकरणी असेही स्पष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी सौ. इनामदार यांनी ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था व सहायक धर्मादाय आयुक्त हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत. त्यामुळे सौ. इनामदार यांनी जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी या प्रकरणी आदेश देणे त्यांना अनुज्ञेय झाले असते. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश अशाप्रकारे अवैध होत आहेत. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग अहमदनगर यांचे दि. २२.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**अहमदनगर**
**दिनांक : ०७/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. स्वाती विवेक इनामदार, सी-२०, पिनाक मेमरीज, कोथरुड, पुणे ४११ ०३८.
२. श्री. संजय क्षीरसागर, सचिव, श्री.दत्त देवस्थान ट्रस्ट, वेदांत नगर, सावेडी, अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९५
निर्णय दिनांक ०७/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. संजय क्षीरसागर,<br>सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट,<br>वेदांत नगर, सावेडी,<br>अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>अहमदनगर विभाग, अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी श्री. प्रदीप कासट, पुणे यांनी दि. ३१.०१.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री. कासट यांनी सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी २२.०८.२००८ रोजी निर्णय देऊन श्री. कासट यांचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे सचिव,

श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील आणि सहायक धर्मादाय आयुक्त यांचे प्रतिनिधी  सर्वजण उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, श्री. कासट यांनी प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या मार्फत नोंदणीकृत झालेल्या एका खाजगी संस्थेकडे मागितली आहे. अशाप्रकारच्या खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुधद मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

"........... It is, therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for

any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी श्री. कासट यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून येते. तसेच या प्रकरणी असेही स्पष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी श्री. कासट यांनी ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था व सहायक धर्मादाय आयुक्त हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत. त्यामुळे श्री. कासट यांनी जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी या प्रकरणी आदेश देणे त्यांना अनुज्ञेय झाले असते. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश अशाप्रकारे अवैध होत आहेत. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग, अहमदनगर यांचे दि. २२.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**अहमदनगर**
**दिनांक : ०७/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रदीप कासट, सावली बिल्डींग, ८८/२८, संगिता हॉटेलच्या समोर, गुजराथी कॉलनी, कोथरुड, पुणे ४११ ०३८.
२. श्री. संजय क्षीरसागर, सचिव, श्री.दत्त देवस्थान ट्रस्ट, वेदांत नगर, सावेडी, अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९६
निर्णय दिनांक ०७/१२/२००९

१ श्री. संजय क्षीरसागर, : अपिलार्थी
सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट,
वेदांत नगर, सावेडी,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अहमदनगर विभाग, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी श्री. श्रीपाद श्रीधर ढेरे, पुणे यांनी दि. २१.०१.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.ढेरे यांनी सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी २२.०८.२००८ रोजी निर्णय देऊन श्री. ढेरे यांचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या

निर्णयाविरुध्द सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील आणि सहायक धर्मादाय आयुक्त यांचे प्रतिनिधी  सर्वजण उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, श्री. ढेरे यांनी प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या मार्फत नोंदणीकृत झालेल्या एका खाजगी संस्थेकडे मागितली आहे. अशाप्रकारच्या खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुधद मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

“........... It is, therefore, clear <u>from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust</u>. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority.  ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for

any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act.”

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी श्री. ढेरे यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून येते. तसेच या प्रकरणी असेही स्पष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी श्री. ढेरे यांनी ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था व सहायक धर्मादाय आयुक्त हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत. त्यामुळे श्री. ढेरे यांनी जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी या प्रकरणी आदेश देणे त्यांना अनुज्ञेय झाले असते. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश अशाप्रकारे अवैध होत आहेत. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग, अहमदनगर यांचे दि. २२.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**अहमदनगर**
**दिनांक : ०७/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीपाद श्रीधर ढेरे (गुरुजी), १६, सिध्दार्थ अपार्टमेंट, भारतीनगर, पूजा पार्क जवळ, पौड रोड, पुणे ४११ ०३८.
२. श्री. संजय क्षीरसागर, सचिव, श्री.दत्त देवस्थान ट्रस्ट, वेदांत नगर, सावेडी, अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९७
निर्णय दिनांक ०७/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संजय क्षीरसागर,<br>सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट,<br>वेदांत नगर, सावेडी,<br>अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>अहमदनगर विभाग, अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी श्री. दत्तात्रय अनंत खानापूरकर, पुणे यांनी दि. १३.१०.२००७ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री.ढेरे यांनी सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२९.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी २२.०८.२००८ रोजी निर्णय देऊन श्री. खानापूरकर यांचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती सात दिवसाच्या आत

उपलब्ध करुन देण्याचे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील आणि सहायक धर्मादाय आयुक्त यांचे प्रतिनिधी सर्वजण उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, श्री. खानापूरकर यांनी प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या मार्फत नोंदणीकृत झालेल्या एका खाजगी संस्थेकडे मागितली आहे. अशाप्रकारच्या खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुधद मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

“........... It is, therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for

any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी श्री. खानापूरकर यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून येते. तसेच या प्रकरणी असेही स्पष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी श्री. खानापूरकर यांनी ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था व सहायक धर्मादाय आयुक्त हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत. त्यामुळे श्री. खानापूरकर यांनी जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी या प्रकरणी आदेश देणे त्यांना अनुज्ञेय झाले असते. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश अशाप्रकारे अवैध होत आहेत. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग, अहमदनगर यांचे दि. २२.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**अहमदनगर**
**दिनांक : ०७/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्तात्रय अनंत खानापूरकर, ११, बांदल विहार, उजवी भुसारी कॉलनी, पौड रोड, पुणे ४११ ०३८.
२. श्री. संजय क्षीरसागर, सचिव, श्री.दत्त देवस्थान ट्रस्ट, वेदांत नगर, सावेडी, अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९८
निर्णय दिनांक ०७/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संजय क्षीरसागर,<br>सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट,<br>वेदांत नगर, सावेडी,<br>अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>अहमदनगर विभाग, अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी श्री. सुरेश सदाशिव आहेर, पुणे यांनी दि. ३१.०१.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री. आहेर यांनी सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी २२.०८.२००८ रोजी निर्णय देऊन श्री. आहेर यांचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांना आदेशित केले. जन अपिलीय

अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील आणि सहायक धर्मादाय आयुक्त यांचे प्रतिनिधी  सर्वजण उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, श्री. आहेर यांनी प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या मार्फत नोंदणीकृत झालेल्या एका खाजगी संस्थेकडे मागितली आहे. अशाप्रकारच्या खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुधद मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

“........... It is, therefore, clear <u>from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust</u>. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority.  ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for

any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी श्री. आहेर यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून येते. तसेच या प्रकरणी असेही स्पष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी श्री. आहेर यांनी ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था व सहायक धर्मादाय आयुक्त हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत. त्यामुळे श्री. आहेर यांनी जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी या प्रकरणी आदेश देणे त्यांना अनुज्ञेय झाले असते. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश अशाप्रकारे अवैध होत आहेत. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग, अहमदनगर यांचे दि. २२.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**अहमदनगर**
**दिनांक : ०७/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश सदाशिव आहेर, स.नं. ७९/१, फ्लॅट नं. ७, श्रीगणेश अपार्टमेंट, मोकाटेनगर, डावी भुसारी कॉलनी, कोथरुड, पुणे ३८.
२. श्री. संजय क्षीरसागर, सचिव, श्री.दत्त देवस्थान ट्रस्ट, वेदांत नगर, सावेडी, अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०९९
निर्णय दिनांक ०७/१२/२००९

१ श्री. संजय क्षीरसागर, : अपिलार्थी
सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट,
वेदांत नगर, सावेडी,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अहमदनगर विभाग, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी श्री. मणियार कचरु सी., पुणे यांनी दि. ०१.०२.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री. मणियार यांनी सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी २२.०८.२००८ रोजी निर्णय देऊन श्री. मणियार यांचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांना आदेशित केले. जन अपिलीय

अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील आणि सहायक धर्मादाय आयुक्त यांचे प्रतिनिधी  सर्वजण उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, श्री. मणियार यांनी प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या मार्फत नोंदणीकृत झालेल्या एका खाजगी संस्थेकडे मागितली आहे. अशाप्रकारच्या खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुधद मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

“........... It is, therefore, clear <u>from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust</u>. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority.  ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for

any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी श्री. मणियार यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून येते. तसेच या प्रकरणी असेही स्पष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी श्री. मणियार यांनी ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था व सहायक धर्मादाय आयुक्त हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत. त्यामुळे श्री. मणियार यांनी जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी या प्रकरणी आदेश देणे त्यांना अनुज्ञेय झाले असते. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश अशाप्रकारे अवैध होत आहेत. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग, अहमदनगर यांचे दि. २२.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**अहमदनगर**
**दिनांक : ०७/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मणियार कचरु सी., १३४/५/२/४, चिनार अपार्टमेंट, २ रा मजला, आपटे सोसायटी, वारजे माळवाडी, पुणे ४११ ०५२.
२. श्री. संजय क्षीरसागर, सचिव, श्री.दत्त देवस्थान ट्रस्ट, वेदांत नगर, सावेडी, अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१००
निर्णय दिनांक ०७/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संजय क्षीरसागर,<br>सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट,<br>वेदांत नगर, सावेडी,<br>अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>अहमदनगर विभाग, अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी श्री. अभय ब्रम्हे, पुणे यांनी दि. ०४.०२.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्री. ब्रम्हे यांनी सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी २२.०८.२००८ रोजी निर्णय देऊन श्री. ब्रम्हे यांचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द

सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील आणि सहायक धर्मादाय आयुक्त यांचे प्रतिनिधी सर्वजण उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, श्री. ब्रम्हे यांनी प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या मार्फत नोंदणीकृत झालेल्या एका खाजगी संस्थेकडे मागितली आहे. अशाप्रकारच्या खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुधद मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

"........... It is, therefore, clear <u>from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust</u>. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for

any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी श्री. ब्रम्हे यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून येते. तसेच या प्रकरणी असेही स्पष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी श्री. ब्रम्हे यांनी ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था व सहायक धर्मादाय आयुक्त हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत. त्यामुळे श्री. ब्रम्हे यांनी जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी या प्रकरणी आदेश देणे त्यांना अनुज्ञेय झाले असते. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश अशाप्रकारे अवैध होत आहेत. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग, अहमदनगर यांचे दि. २२.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**अहमदनगर**
**दिनांक : ०७/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अभय ब्रम्हे, २, घरोंदा अपार्टमेंट, स.नं. ७८/४-५, फ्लॅट नं. ६३, भुसारी कॉलनी (डावी), पौड रोड, पुणे ४११ ०३८.
२. श्री. संजय क्षीरसागर, सचिव, श्री.दत्त देवस्थान ट्रस्ट, वेदांत नगर, सावेडी, अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१०१
निर्णय दिनांक ०७/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संजय क्षीरसागर,<br>सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट,<br>वेदांत नगर, सावेडी,<br>अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>अहमदनगर विभाग, अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधिन आहे.

या प्रकरणी श्रीमती अश्विनी राजीव जोशी, पुणे यांनी दि. ०६.०२.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर संस्थेने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने श्रीमती जोशी यांनी सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१३.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी २२.०८.२००८ रोजी निर्णय देऊन श्रीमती जोशी यांचे अपील मान्य केले व त्यांनी मागणी केलेली माहिती सात दिवसाच्या आत

उपलब्ध करुन देण्याचे सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द सचिव, श्री. दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे वकील आणि सहायक धर्मादाय आयुक्त यांचे प्रतिनिधी सर्वजण उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, श्रीमती जोशी यांनी प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या मार्फत नोंदणीकृत झालेल्या एका खाजगी संस्थेकडे मागितली आहे. अशाप्रकारच्या खाजगी संस्थेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्रमांक ५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुधद मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय दिला आहे. तो या प्रकरणी विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

“........... It is, therefore, clear <u>from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust</u>. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. ........ If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the public Trust Act to have such information, which the Charity commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for

any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी श्रीमती जोशी यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून येते. तसेच या प्रकरणी असेही स्पष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी श्रीमती जोशी यांनी ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे ती संस्था व सहायक धर्मादाय आयुक्त हे एकाच प्राधिकरणाचे भाग नाहीत. त्यामुळे श्रीमती जोशी यांनी जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी या प्रकरणी आदेश देणे त्यांना अनुज्ञेय झाले असते. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश अशाप्रकारे अवैध होत आहेत. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता खालीलप्रमाणे ओदश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर विभाग, अहमदनगर यांचे दि. २२.०८.२००८ रोजीचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**अहमदनगर**
**दिनांक : ०७/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती अश्विनी राजीव जोशी, बी २/७, शिवतारा गार्डन, गणंजय सोसायटी, कोथरुड, पुणे ४११ ०३८
२. श्री. संजय क्षीरसागर, सचिव, श्री.दत्त देवस्थान ट्रस्ट, वेदांत नगर, सावेडी, अहमदनगर.
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर विभाग, अहमदनगर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १९०/२००९ व १९१/२००९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१९० व १९१

निर्णय दिनांक ०७-१२-२००९

१ श्री. राहुल सदानंद शिंदे, : अपिलार्थी

मु. पो. मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

२ श्री. जालींदर रघुनाथ घोडके,

मु. पो. मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ अपील क्रमांक १९०/२००९ व १९१/२००९

जन माहिती अधिकारी,

पंचायत समिती, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा,

जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

तथा पंचायत समिती, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा,

जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी श्री. राहुल सदानंद शिंदे व श्री. जालींदर रघुनाथ घोडके या दोन अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००९ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांशी संबंधित अपिलार्थींनी एकाच दिवशी वेगवेगळ्या माहितीसाठीचे दोन प्रथम अर्ज माहिती अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा यांच्याकडे सादर केले असून या संदर्भातील प्रथम अपिले एकाच दिवशी पंचायत समितीकडे सादर केली असल्यामुळे व या दोनही अपील प्रकरणांशी संबंधित एकच ग्रामसेवक असल्यामुळे या दोनही अपील अर्जांची एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थी श्री. राहुल सदानंद शिंदे व श्री. जालींदर रघुनाथ घोडके यांनी त्यांच्या दिनांक १६-०७-२००९ रोजीच्या दोन स्वतंत्र अर्जाव्दारे पंचायत समिती, श्रीगोंदा यांच्याकडे संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेविषयी व मागासवर्गीयांच्या वैयक्तीक लाभाच्या योजनेविषयी दिनांक ०१-०४-२००४ ते ३१-०३-२००९ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राशी संबधित काही माहिती मागितली होती. या दोनही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मौजे मांडवगण या गावात संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कामाविषयी कोणत्या प्रकारची कामे झाली, कामासाठी मंजूर रक्कम, खर्च झालेली रक्कम, कामावरील कामगारांची नांवे, त्यांना मिळालेला मोबदला, कामांचा उद्देश, कामाविषयीच्या संबंधित अभियंत्याचे शेरे व मागासवर्गीयांच्या वैयक्तीक लाभाच्या योजनेअंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांची नांवे, त्यांना कोणते लाभ दिले, एकूण जमा अर्जदारांची नावे, निवडीचे निकष व निवडीचा उद्देश - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थींनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून " समक्ष " या स्वरुपात मागितली आहे.

अपिलार्थींनी त्यांचे मूळ अर्ज हे पंचायत समिती, श्रीगोंदा यांना उद्देशून केले होते. तथापि अपिलार्थींनी मागणी केलेल्या या दोनही मूळ अर्जाच्या संबंधात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मांडवगण हे जन माहिती अधिकारी असल्याने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचे मूळ अर्ज त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००९ रोजीच्या पत्रान्वये ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मांडवगण यांच्याकडे पाठविले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून या दोनही अपिलार्थीस त्यांच्या अर्जासंदर्भात कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार पंचायत समिती, श्रीगोंदा यांच्याकडे दिनांक २०-०८-२००९ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली. तथापि या दोनही अपील अर्जांवर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांचा कोणताही निर्णय दिला नाही व सदर अपील अर्ज विना कार्यवाही त्यांच्याकडे ठेऊन दिले. परिणामी अपिलार्थींना अपेक्षित माहिती संबधितांकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थींनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०७-१२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक १९०/२००९ शी संबंधित जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत. अपील क्रमांक १९१/२००९ शी संबंधित अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. जालींदर रघुनाथ घोडके यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी श्री. आर. के. खामकर यांनी त्यांना आजतागायत कोणतीही माहिती दिली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहिती मागितली असल्यामुळे या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जासंदर्भातील पुढील घडामोडी ज्ञात करुन घेण्यासाठी जन माहिती

अधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याची जबाबदारी अपिलार्थी यांच्यावर येते. यादृष्टीने आयोगाने अपिलार्थीस ते ग्रामसेवकाकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किती वेळा गेले या संदर्भातील कोणता पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध आहे का, असे विचारले असता, त्यांनी ते दिनांक ०७-०९-२००९ रोजी सुनावणीस उपस्थित राहिल्याचे सांगितले. यावरुन श्री. घोडके हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी दिनांक ०७-०९-२००९ रोजी उपस्थित राहिल्याचे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर गेल्या पाच वर्षापासून काम करत आहेत. अपिलार्थींच्या या दोनही प्रकरणी माहिती न देण्याची कारणे आयोगाने विचारली असता, या प्रकरणी त्यांनी श्री. घोडके यांना माहिती का दिली नाही याची कारणे त्यांना आता सांगता येणार नाहीत व तसेच त्यांना आयोगाने सहानुभूती दाखवून त्यांची चूक क्षमापित करावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली व आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणाशी संबंधित दोनही अपिलार्थींना ते १५ दिवसाच्या आत त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन देतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी श्री. राहुल सदानंद शिंदे अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीतील " कामाचा उद्देश " हा भाग वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १७-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्राप्त झालेल्या दोनही अपिलार्थींच्या प्रथम अर्जावर आजतागायत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे व परिणामी अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवले असल्याचे दिसून येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांचा युक्तिवाद आयोगासमोर केला आहे. तथापि त्यांचा हा युक्तिवाद आयोगास कोणत्याही कारणास्तव स्वीकृत करता येणार नाही. अपिलार्थींच्या माहितीसाठीच्या केलेल्या अर्जास माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ मधील कालावधीमध्ये प्रतिसाद देणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दोनही अपिलासंदर्भात अपिलार्थींनी त्यांच्या मूळ अर्जांव्दारे मागणी केलेली माहिती उपलब्ध आहे व ते ही माहिती दोनही अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी त्यांच्या बचावाची पूर्ण संधी देऊनही अपिलार्थींना माहिती न देण्याच्या त्यांच्या कृतीचे कोणतेही समर्थन त्यांना आयोगास करता आले नाही. या प्रकरणी (अपील क्रमांक १९१/२००९) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतेही उत्तर न देऊन अथवा त्यांच्या अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले असल्यामुळे ते अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणांशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा जन माहिती अधिकारी यांनी जास्तीत जास्त दहा हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात पुढील लेखशिर्षामध्ये करावा.

लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

सदर शास्तीचा भरणा संबंधित जन माहिती अधिकारी हे फेब्रुवारी २०१० पासून दहा समान हप्त्यात नियमितपणे शासकीय कोषागारात करतील याची खात्री गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा यांनी करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपील क्रमांक १९०/२००९ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील क्रमांक १९०/२००९ अंशतः मान्य व अपील क्रमांक १९१/२००९ मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १९०/२००९ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १९१/२००९ मान्य करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी, या दोनही अपील प्रकरणातील अपिलार्थींनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. जन माहिती अधिकारी यांना अपील क्रमांक १९१/२००९ च्या संदर्भात एकूण रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

५. संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राहुल सदानंद शिंदे, मु. पो. मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर.

२ श्री. जालींदर रघुनाथ घोडके, मु. पो. मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर.

३ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मांडवगण, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाव्दारे)

४ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१९२

निर्णय दिनांक ०७-१२-२००९

१ श्री. अशोक दादा देवखिळे, : अपिलार्थी

मु. पो. वडाळी, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,

मर्यादित, उप विभाग बेलवंडी,

तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण

कंपनी मर्यादित, उपविभाग कर्जत, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक १२-०५-२००९ व नंतर दिनांक २९-०६-२००९ रोजी दिलेली माहिती ही अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी अशी दिली आहे. यासंदर्भात त्यांनी स्थानिक महाराष्ट्र राज्य

विद्युत वितरण कंपनीचे कर्मचारी श्री. बैतुल व श्री. शिर्के यांच्यावर शेती पंपधारकांना अनधिकृत-रित्या वीज पुरवठा केल्याचे गंभीर आरोप केले आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०३-२००९ रोजी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे वडाळी गट नंबर २७८ चंदु बामकर यांच्या घराजवळील डी. पी. च्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - आज रोजी डी. पी. वर असणारे कोटेशनधारकांची नावे, कोटेशन भरल्याची तारीख, डी. पी. वर वीज बील चालू नाही अशा कोटेशन धारकांची नांवे, वीज कोणत्या कारणामुळे चालू नाही याबाबतची माहिती, डी. पी. वर जादा कोटेशन झाले असल्यास नवीन डी. पी. मंजूर झाली आहे काय व ती किती काळाने बसविणार यासंबंधीची माहिती, सदर डी. पी. च्या ग्राहकांना सध्या दिवसामधून किती तास वीज पुरवठा वीज कंपनी करते याची माहिती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहिती-पोटीचे शुल्क रुपये २७ इतके त्यांच्याकडे भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीस दिनांक ३०-०४-२००९ रोजी माहिती प्राप्त झाली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर अपिलार्थीस माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०६-२००९ रोजी पुनःश्च काही माहिती पुरविली. तथापि ही माहिती अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. तथापि यासंदर्भात त्यांनी कोणताही सबळ पुरावा त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत दिलेला नाही. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे केलेल्या प्रथम अपील अर्जानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची नावे प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे. तथापि त्यांना कोणती माहिती अथवा प्राप्त माहितीतील कोणता भाग त्यांना चूकीचा वाटतो कोणती माहिती अद्याप अप्राप्त आहे या संदर्भात कोणतेही स्पष्टीकरण अथवा कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. आज रोजी त्यांचे म्हणणे तोंडी स्वरुपात स्पष्ट करण्यासाठी देखील अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर वेगळयाने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब आवश्यक त्या सबळ पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक दादा देवखिळे, मु. पो. वडाळी, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित, उप विभाग बेलवंडी, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१९३

निर्णय दिनांक ०७-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. पटेकर रविंद्र भिवाजी,<br>रा. शितल कॉलनी, शिवाजीनगर,<br>नगर - कल्याण रोड, अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद,<br>अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद,<br>अहमदनगर | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व त्रोटक माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अहमदनगर जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक वर्ष ०७-०८ ते ३० जून २००९ अखेर कार्यरत असलेल्या प्रभारी मुख्याध्यापकांची नांवे, संबंधित संस्थेला सहायक आयुक्त, मागास कक्ष, नाशिक यांनी दिलेल्या अनुशेष तपासणीच्या तक्त्याच्या सत्यप्रती, प्रभारी मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या संस्था व संबंधित विद्यालयांची माहिती, नियमाप्रमाणे कायमस्वरुपी मुख्याध्यापक पद न भरण्याची कारणे व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी संबंधित संस्थांनी कायमस्वरुपी मुख्याध्यापक पदे भरण्याबाबत केलेली कार्यवाही, या मुद्दयांची माहिती मागितली होती.

तथापि अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००९ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपील अर्ज करतांना त्यांनी परत माहितीसाठीच्या अर्जाच्या नमुन्यात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु या प्रकरणी अपिलार्थीचा दिनांक ०८-०६-२००९ रोजीचा अर्ज व दिनांक ०९-०७-२००९ रोजीचा अपील अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे प्रथमतः माहिती अधिकारी या नात्याने व नंतर पुनःश्च अपिलीय अधिकारी या नात्याने केल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती आणि अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात अधिनियातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार या प्रकरणी अपील न करता त्यांनी सरळ आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे. तसेच त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये, त्यांना दिलेली माहिती अपूर्ण व त्रोटक का वाटते यासंदर्भात कोणतेही स्पष्टीकरण त्यांनी आयोगाकडील या अर्जामध्ये दिलेले नाही. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीची प्रत देखील त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेली नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेच्या व सबळ पुराव्या अभावी फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पटेकर रविंद्र भिवाजी, रा. शितल कॉलनी, शिवाजीनगर, नगर - कल्याण रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१९४

निर्णय दिनांक ०७-१२-२००९

१ श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, : अपिलार्थी
घर नं. १०/८, गजानन हौसिंग सोसायटी (जुना मुकूंदनगर),
औरंगाबाद रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हा शासकीय रुग्णालय, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा शासकीय रुग्णालय, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वैद्यकीय अधिकारी, जिल्हा शासकीय रुग्णालय, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा शासकीय रुग्णालय, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्री. संजय ठोंबरे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला आदेश प्राप्त झाला नाही व या अर्जाव्दारे अपिलार्थीने आल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. ठोंबरे, श्री. बहिरवाल व श्री. व्ही. डी. बनसोडे यांच्या संदर्भात जानेवारी २००० ते दिनांक ०९-०६-२००९ या कालावधीशी संबधित काही माहिती एकूण ११ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०७-२००९ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस प्रथमतः माहिती पाठविली. परंतु यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक दिनांक ०७-०७-२००९ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक २३-०७-२००९ व तदनंतर दिनांक ०४-१२-२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या दोनही तारखांस अपिलार्थी हे गैरहजर राहिले. त्यामुळे या प्रकरणासंदर्भात अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही आदेश पारीत केले गेले नाही. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयातून अपिलार्थीस त्यांच्या भ्रमणध्वनीव्दारे दिनांक ०४-१२-२००९ रोजी दहा वाजून पन्नास मिनीटांनी त्यांनी अपिलार्थीस अवगत केले होते. तथापि अपिलार्थीने त्यांचा इन्कार केला.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता आज रोजी सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमक्ष या प्रकरणी दिनांक २४-१२-२००९ रोजी अपिलार्थी-च्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी ठेवल्याचे सांगितले. अपिलार्थीने याची नोंद घेतली व आयोगाकडे संबधितांविरुध्द काही तरी कार्यवाही करा अन्यथा ते विष प्राशन करतील असे आयोगास अवगत केले. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी होऊन निर्णय होणे गरजेचे आहे असे आयोगास घटनाक्रमाच्या या टप्प्यावर वाटत आहे.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा शासकीय रुग्णालय, अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच दिनांक २४-१२-२००९ रोजी दुपारी ०४-०० वाजता सुनावणी घेऊन, त्यांनी आपले आदेश त्वरित पारीत करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०७-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच दिनांक २४-१२-२००९ रोजी दुपारी ०४-०० वाजता सुनावणी घेऊन या सुनावणीमध्ये लगेच आपले आदेश पारीत करावेत.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, घर नं. १०/८, गजानन हौसिंग सोसायटी (जुना मुकूंदनगर), औरंगाबाद रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, जिल्हा शासकीय रुग्णालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा शासकीय रुग्णालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१९५

निर्णय दिनांक ०७-१२-२००९

१ सौ. शुभांगी प्रमोद पावसे, : अपिलार्थी
रा. शिंपी गल्ली, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,
अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी : | कनिष्ठ सहायक, कार्यालय, तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर |
| | जन अपिलीय अधिकारी : | तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ०३-०८-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्या अपिलावर सुनावणी न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना माहिती मिळाली  परंतु विनामूल्य माहिती देऊन शासनाचे नुकसान केले, विनामूल्य माहिती देण्यासाठी लावण्यात आलेल्या निकषाची माहिती मिळावी अशी माहिती त्यांना आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" प्रतिनियुक्तीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांच्या आदेशाची सांक्षाकीत प्रत व ज्यांना प्रतिनियुक्ती करण्याचा अधिकार दिलेला आहे अशा आदेशाची साक्षांकीत प्रत."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून समक्ष अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०६-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती दिनांक ०२-०६-२००९ रोजी व्यक्तिशः व विनामूल्य हस्तांतरीत केली.  अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२-०६-२००९ रोजी व्यक्तिशः माहिती हस्तांतरीत केल्याचा आवश्यक तो पुरावा त्यांनी आयोगास सादर केलेला आहे.  तथापि  माहिती प्राप्त होऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती का दिली याबाबत अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०८-२००९ रोजी प्रथम अपील केले.

परंतु  या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील अर्ज संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे पाठविला  नाही  त्यामुळे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय होऊ शकला नाही.  यानंतर अपिलार्थीने थेट वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन  व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीस त्यांना या संदर्भात कोणती माहिती हवी आहे असे आयोगाने विचारले असता, सदर अर्ज त्यांच्या पत्नीने केला असून या प्रश्नावर ते काहीही भाष्य करु शकत नाहीत, असे त्यांनी  आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी सर्व माहिती अपिलार्थीस विनामूल्य दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळल्याचे कबूल करीत आहेत.  परंतु त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती देऊन शासनाचे नुकसान केले आहे असे त्यांचे यासंदर्भात  म्हणणे असल्याचे दिसून येत अहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, जर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत आणि विनामूल्य माहिती दिली असेल व जन माहिती अधिकारी यांनी शासनाचे नुकसान केल्याचे अपिलार्थीस वाटत आहे  तर  त्यांनी  या मुद्दयावर  जन  माहिती  अधिकारी यांच्या वरिष्ठांकडे जाऊन आपल्या गा-हाण्याची तड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून लावून घ्यावी. आयोगाकडे प्राप्त होणा-या व्दितीय अपील अर्जावर निर्णय देतांना आयोगाचे निर्णय अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जात मागणी केलेल्या माहितीशी संबंधित असतात. त्यामुळे

अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपिलावरुन त्यांना विनामूल्य माहिती मिळाल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी शासनाचे नुकसान केल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द अपिलार्थीस कोणती कार्यवाही अपेक्षित आहे, ती कार्यवाही स्पष्ट होत नसल्यामुळे, आयोगास जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द कोणताही निर्णय देता येणार नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्राणे आदेश देण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संबंधित माहितीचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागितली आहे ती माहिती पूर्णतः संदर्भहीन व मोघम स्वरुपाची आहे. अपिलार्थीने या माहितीमध्ये प्रतिनियुक्तीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांच्या आदेशाची सांक्षाकीत प्रत व ज्यांना प्रतिनियुक्ती करण्याचा अधिकार दिलेला आहे अशा आदेशाची साक्षांकीत प्रत मागितली आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधी यासंदर्भात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये कोणतेही अभिप्राय व्यक्त केलेले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या पदाशी संबंधित व कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती हवी आहे याचा आयोगास बोध होत नसल्याने, अशा प्रकारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे संदर्भहीन व मोघम स्वरुपाची माहिती मागितली असल्यामुळे, अपिलार्थीस मूळात त्यांच्या मूळ अर्जाव्दारे संदर्भित केलेली माहिती देय होत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या गृहीतकावर काही माहिती पुरविली आहे. हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. शुभांगी प्रमोद पावसे, रा. शिंपी गल्ली, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ सहायक, कार्यालय, तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१९६

निर्णय दिनांक ०७-१२-२००९

१ श्री. संभाजी शंकर वाघ, : अपिलार्थी
मु. सातवड, पो. देवराई, तालुका पाथर्डी,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, पाथर्डी, तालुका पाथर्डी,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथर्डी,
तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कक्ष अधिकारी, पंचायत समिती, पाथर्डी, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे आणि माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८

(त्र) अन्वये त्यांना माहिती देणे आवश्यक नसल्याचे कळविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगास सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी पंचायत समिती, पाथर्डी यांच्याकडे त्यांच्याकडील बाराव्या वित्त आयोग, जवाहर योजनेच्या विहिरी व इंदिरा आवास योजनेअंतर्गत दिनांक ०१ फेब्रुवारी २००९ ते ११ मे २००९ व दिनांक ०१ फेब्रुवारी २००५ ते ११ मे २००९ दोन कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दिनांक ०१ फेब्रुवारी २००९ ते ११ मे २००९ या कालावधीमध्ये बाराव्या वित्त आयोगाच्या संबंधात माहिती, अंदाजपत्रके, यादी व झालेला खर्च, जवाहर योजना विहिरीच्या लाभार्थ्यांची यादी व उत्पन्नाचे दाखले, एकत्रित कुटूंबात नोकरीस नसलेबाबतचे दाखले व शेतजमीन बागायती नसल्याबाबतचे दाखले व दिनांक १-२-०५ ते ११-५-०९ या कालावधीमध्ये इंदिरा आवास योजनेत घरकुल मिळालेल्या लाभार्थ्यांची यादी व दारिद्र्यरेषेखालील कार्डाचे नंबर - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी काही इतर प्राधिकरणाशी संबंधित होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १३-०५-०९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या अर्जाची प्रत उप अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाथर्डी, उप अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग, पाथर्डी, विस्तार अधिकारी (शेती), पंचायत समिती, पाथर्डी, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पाथर्डी व सहायक लेखाधिकारी, पंचायत समिती, पाथर्डी यांच्याकडे पाठविली व अर्जदारास आवश्यक ती माहिती आठ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास सादर करण्याची सूचना केली. तथापि संबंधितांकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या

तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०६-०९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०७-०९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीस अपिलार्थी हे वेळेवर हजर न राहिल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्याप-पावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून जवाहर विहिरीच्या संदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही (लाभार्थ्यांची यादी वगळता). त्यांनी मागितलेल्या मुद्दयावरील माहितीच्या संबंधात लाभार्थ्यांचे उत्पन्नाचे दाखले, एकत्रित कुटूंबात नोकरीस नसल्याबाबतचे दाखले, शेतजमीन बागायत नसल्याबाबतचे दाखले, ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ च्या तरतुदीनुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्याप प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक दिनांक १०-०८-२००९ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग पाथरी, विस्तार अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस देता आली नाही. आता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अपिलार्थीस द्यावयाची राहिलेली उर्वरित माहिती ते अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०५-२००९ रोजीच्या अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे विहित केलेल्या कालावधीमध्ये या प्रकरणी संबंधितांना पाठविली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी ज्या अधिका-यांना अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठविली त्या अधिका-यांनी अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे त्यांना अनिवार्य होते. परंतु उप अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाथर्डी, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पाथर्डी यांनी माहिती न पुरविल्याने उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभाग, अहमदनगर यांनी त्यांच्या दि. ०२-०७-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस जवाहर विहिर योजनेच्या लाभार्थ्यांची यादी वगळता उत्पन्नाच्या दाखल्यासंदर्भात तदअनुषंगिक उर्वरित माहिती पुरविली नाही. अपिलार्थीस माहिती न पुरविण्यासाठी उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभाग, अहमदनगर यांनी अधिनियमातील कलम ८ (ञ) च्या तरतुदीचे दिलेले कारण या प्रकरणी आयोगास संयुक्तीक वाटत नाही. कारण लाभार्थ्यांनी त्यांच्याकडे जे उत्पन्नाचे दाखले सादर केले आहेत त्या दाखल्याच्या आधारावरुन संबंधित लाभार्थ्यांस शासनाकडून विहिरीचे अनुदान उपलब्ध होत असते. ही माहिती उघड केल्याने संबंधित लाभार्थ्यांच्या खाजगी बाबीत कोणताही हस्तक्षेप होईल, असे आयोगास वाटत नाही. कारण ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची आहे व त्यामुळे उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभाग, अहमदनगर यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित लाभार्थ्यांची यादी वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती ही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत देणे त्यांना अनिवार्य आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सर्वजनिक स्वरुपाची आहे त्यामुळे ती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) च्या कोणत्याही तरतुदीचा भंग होईल असे आयोगास वाटत नाही. सबब जन माहिती

अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली वरील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरवावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, उप अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाथर्डी व विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती यांनी अपिलार्थीच्या या अर्जास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व संबंधित सहायक कर्मचारी/अधिकारी यांना देखील जन माहिती अधिकारी समजावे, अशी तरतूद आहे, हे पाहता अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरविल्याबद्दल उप अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाथर्डी व विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पाथर्डी हे आणि अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या प्रकरणी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे संबंधित सर्व कर्मचारी हे जबाबदार असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन व माहिती न पुरवून संबंधीत जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाथर्डी श्री. काकडे व संबंधित विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पाथर्डी श्री. साळवे यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन व माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे

प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस आता उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे विभाग, अहमदनगर यांनी १५ दिवसाच्या आत उर्वरित संपूर्ण माहिती विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस उर्वरित माहिती आयोगाने आदेशित केलेल्या कालावधीमध्ये त्यांना प्राप्त होईल, याची त्यांनी दक्षता घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित संपूर्ण माहिती, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाथर्डी श्री. काकडे व संबंधित विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पाथर्डी श्री. साळवे यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संभाजी शंकर वाघ, मु. सातवड, पो. देवराई, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, पाथर्डी, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. काकडे, उप अभियंता, जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाथर्डी, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

५ श्री. साळवे, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पाथर्डी, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

६ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाथर्डी, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१९७

निर्णय दिनांक ०७-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सलीम बाबुभाई पठाण,<br>रा. डावखर रोड, व्यापारी मंगल कार्यालयाशेजारी,<br>श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक,<br>पुणे मध्यवर्ती इमारत, पुणे | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>कार्यकारी अभियंता, एकात्मिक घटक, पुणे | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या मूळ अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही दखल न घेतल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मार्च २००८ ते मार्च २००९ या कालावधीतील संबंधित शासकीय अस्थापना विषयक बाबीशी संबंधित, पूर्ण झालेल्या व सुरु असलेल्या कामाची माहिती आणि इतर अनुषंगीक मुद्दयाव्दारे व्यापक प्रमाणातील माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०६-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून विहीत मुदतीत कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३०-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३०-०६-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सलीम बाबुभाई पठाण, रा. डावखर रोड, व्यापारी मंगल कार्यालय शेजारी, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी, कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक, पुणे मध्यवर्ती इमारत, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक, पुणे मध्यवर्ती इमारत, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१९८

निर्णय दिनांक ०७-१२-२००९

१ श्री. बाळासाहेब पोपटराव कोळपे, : अपिलार्थी
मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगांव,
तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोपरगांव,
तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत कोळपेवाडी हद्दीतील शौचालये, चावडी व घरकुले यांच्या बांधकामासंदर्भात सन २००७ ते २००९ या कालावधीतील काही माहिती एकूण तीन मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०८-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०९-२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानुसार माहिती अधिका-याने अपिलार्थीस दिनांक १४-०९-२००९ रोजी माहिती व्यक्तिशः देऊ केली. तथापि अपिलार्थीने या माहितीचा स्वीकार न केल्याने त्यांनी दिनांक ३०-१०-२००९ रोजी ही माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे पुरविली आहे. या टप्प्यावर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकार हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दिनांक ३०-१०-२००९ रोजी व दिनांक ०३-०८-२००९ रोजी आवश्यक ती माहिती अपिलार्थीस पुरविली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने एका बंद पाकिटामध्ये त्यांचा युक्तिवाद सादर केला असून त्यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही वस्तुस्थितीदर्शक नाही आणि ती दिशाभूल करणारी आहे. या मुद्दयावर अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ३ संबंधात वस्तुस्थिती दडवून ठेवली आहे. या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने पुढे असेही नमूद केले आहे की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मध्ये खोटी माहिती पुरवली आहे. या प्रकरणातील सुनावणीचे वेळी आज रोजी प्राप्त झालेली ही कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडील ज्या अभिलेख्यावर उपलब्ध आहे ते सर्व अभिलेखे त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत जेणेकरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळू शकेल. तसेच आवश्यक असल्यास कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बाळासाहेब पोपटराव कोळपे, मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१९९

निर्णय दिनांक ०७-१२-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. केशव लक्ष्मण बरकते,<br>रा. कांताबाई फुल सैंदरचाळ, भोसले आखाडा,<br>बुरुंडगांव रोड, अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,<br>उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहमदनगर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,<br>उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०९-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०६-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जानेवारी १९८० ते २३ जुलै २००९ या २९ वर्षाच्या कालावधीमधील, मोटार वाहन कायद्यातील नियम क्रमांक ४७ (a) व (b) संदर्भात माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वाहनाची नोंदणी करण्याकरिता आले असता इतर फॉर्मबरोबर वरील फॉर्म जोडलेला असतो, वरील फॉर्म कोण भरुन देतात, वाहन तयार करणारी कंपनी की वाहन विक्री करणारे दुकानदार, हा फॉर्म भरल्यानंतर त्यावर खाडाखोड करण्यात येते ती खाडाखोड, बदल शासनाच्या कोणत्या नियमानुसार/आदेशानुसार त्यावर बदल करण्यात येतात, याची साक्षांकीत स्वरुपात माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस फॉर्म नंबर २१ हा फॉर्म अधिकृत विक्रेता भरुन देतात व त्यासोबत लागणारे इतर फॉर्म हे त्यांचे अधिकृत प्रतिनिधी भरुन देतात, उपरोक्त फॉर्ममध्ये खाडाखोड करण्यात येत नाही (अपेक्षित नाही) व या कार्यालयात फॉर्म नंबर २१ वर खाडाखोड केल्याची माहिती ठेवण्यात आलेली नसल्यामुळे त्यांच्या छायांकीत प्रती अपिलार्थीस देता येत नाहीत असे कळविले. तथापि या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०८-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०७-२००९ रोजी दिलेली माहिती त्यांना अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी का वाटते याच्या समर्थनार्थ कोणताही पुरावा त्यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही अथवा या मुद्दयावर स्पष्टीकरण करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. केशव लक्ष्मण बरकते, रा. कांताबाई फुल सैंदरचाळ, भोसले आखाडा, बुरुंडगांव रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२००

निर्णय दिनांक ०७-१२-२००९

१ श्री. शेख सलमान अहमद उर्फ सलमान आर्मेचरवाला, : अपिलार्थी
फलटण पोलीस चौकीमागे, आहेर गवळीवाडा,
कोठला रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जकात अधीक्षक,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपायुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून माहिती देण्याचे टाळले आणि जन अपिलीय अधिकारी माहिती अधिका-यास जाणुनबुजून पाठीशी घालत असल्यामुळे त्यांच्यावरही योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी यासाठी अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे जकात अभिकर्ता आणि मनपा यांच्याकडील जकात वसुली अशा दोन मुद्दयावर त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-१०-२००५ ते १५-०१-२००९ या कालावधीतील माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३८२२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व शुल्काचा भरणा प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस माहिती पुरविण्यात येईल असे कळविले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०५-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-०६-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून माहिती दडविली म्हणून त्यांच्यावर कारवाई व्हावी आणि जन अपिलीय अधिकारी हे माहिती अधिका-यास पाठीशी घालत असल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्यावरही कार्यवाही व्हावी म्हणून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-१२-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकार यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १६-०१-२००९ रोजीच्या मूळ

अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३८२२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्याचे आयोगास आढळून येत आहे. या संपूर्ण घटनाक्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी हेतूतः अपिलार्थीपासून माहिती दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. अपिलार्थीने या संपूर्ण घटनाक्रमामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्याची तयारी कोणत्याही टप्प्यावर दर्शविली नाही. **आयोगाचा मूळ उद्देश हा अर्जदारास सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिका-याकडून त्यांच्या दैनंदिन कारभाराची माहिती उपलब्ध करुन देण्याचा आहे. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे.** हे पाहता, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्यासाठी ते निःसंशयपणे पात्र होत नाहीत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्याचे अधिकार माहिती अधिकार अधिनियमामध्ये राज्य माहिती आयोगास नसल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कोणतीही कार्यवाही आयोग करत नाही. हे पाहता अपिलार्थीची आयोगाकडे संबंधितांवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची केलेली विनंती आयोगास मान्य करता येणार नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख सलमान अहमद उर्फ सलमान आर्मेचरवाला, फलटण पोलीस चौकीमागे, आहेर गवळीवाडा, कोठला रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा जकात अधीक्षक, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२०१
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नारायण आत्माराम टाक,<br>रा. सेलू, जि. परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ अवसायक,<br>दि. परभणी पिपल्स को-ऑप बँक लि.,<br>परभणी | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, परभणी | | |
| प्रत्यक्षात जन अपिलीय अधिकारी | : | विभागीय सहनिबंधक,<br>सहकारी संस्था, औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १०.१०.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे अवसायक, दि. परभणी पिपल्स को-ऑप बँक लि., परभणी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर अर्जास अवसायक, दि परभणी पिपल्स को-ऑप बँक लि., परभणी यांनी त्यांच्या दि. १४.१०.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ हा त्यांच्या बँकेस लागू होत नसल्याने त्यांनी मागणी केलेला माहितीसाठीचा अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. बँकेकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्याकडे माहिती अधिकार

अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांनी त्यांच्या दि. १५.११.२००८ रोजीच्या पत्रान्वये सदर बँकेचे कार्यक्षेत्र विभाग स्तरावर असल्यामुळे प्रथम अपील विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे वर्ग केले. सदर अपिलावर विभागीय सहनिबंधक यांनी सुनावणीसाठी चार वेळा संधी देऊनही अपिलार्थी गैरहजर असल्यामुळे अपिल चालविण्यामध्ये अपिलार्थीस स्वारस्य नाही, असे अनुमान दि.३०.१२.२००८ रोजी काढून अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. परंतु हवी असलेली माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, बँकेचे व सहकार विभागाचे संबंधित अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित अपिलार्थी, बँक व सहकार विभागाचे अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.

अशाप्रकारे मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ संबंधित बँकेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०१ /०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नारायण आत्माराम टाक, रामचंद्र मेडिकल स्टोअर्स, क्रांती चौक, सेलू, ता. सेलू, जि. परभणी

२. अवसायक, दि परभणी पिपल्स को-ऑप बँक लि., मुख्य कार्यालय, नेहरु रोड, परभणी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२०२
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

१ श्री. मारोतराव बाबाराव रोडगे, : अपिलार्थी
रा. ताडकळस, ता.पूर्णा, जि. परभणी

**विरुध्द**

१ शाखाधिकारी, : प्रतिवादी
दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि.,
शाखा पानगेश्वर (पानगांव), ता. रेणापूर,
जि. लातूर

२ मुख्य कार्यकारी अधिकारी,
दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि.,
मुख्य कार्यालय, परळी वैजनाथ, ता. परळी - वैजनाथ, जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २६.०७.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे शाखाधिकारी, दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि., शाखा पानगेश्वर, ता. रेणापूर, जि. लातूर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर अर्जास संबंधित बँकेच्या उप व्यवथापकांनी त्यांच्या दि. ०७.०८.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ हा त्यांच्या बँकेस लागू होत नसल्याने त्यांनी मागणी केलेली माहिती देता येत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. बँकेकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि., मुख्य कार्यालय, परळी वैजनाथ

यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २०.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यानंतरही बँकेकडून माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व बँकेचे संबंधित अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित बँक अधिकाऱ्यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.

अशाप्रकारे मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ संबंधित बँकेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०२ /०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मारोतराव बाबाराव रोडगे, पूर्णा रोड, शिवाजीनगर, ताडकळस, ता. पुर्णा, जि. परभणी

२. शाखाधिकारी, दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि., शाखा पानगेश्वर (पानगांव), ता. रेणापूर, जि. लातूर

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि., मुख्य कार्यालय, परळी वैजनाथ, ता. परळी वै., जि. बीड

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२०३
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

१ सौ. लक्ष्मीबाई मारोतराव रोडगे, : अपिलार्थी
रा. ताडकळस, ता.पूर्णा, जि. परभणी

**विरुध्द**

१ शाखाधिकारी, : प्रतिवादी
दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि.,
शाखा पानगेश्वर (पानगांव), ता. रेणापूर,
जि. लातूर

२ मुख्य कार्यकारी अधिकारी,
दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि.,
मुख्य कार्यालय, परळी वैजनाथ, ता. परळी - वैजनाथ, जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.०१.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २६.०७.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे शाखाधिकारी, दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि., शाखा पानगेश्वर, ता. रेणापूर, जि. लातूर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर अर्जास संबंधित बँकेच्या उप व्यवथापकांनी त्यांच्या दि. ०७.०८.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ हा त्यांच्या बँकेस लागू होत नसल्याने त्यांनी मागणी केलेली माहिती देता येत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. बँकेकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि., मुख्य कार्यालय, परळी वैजनाथ

यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २०.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यानंतरही बँकेकडून माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व बँकेचे संबंधित अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित बँक अधिकाऱ्यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.

अशाप्रकारे मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ संबंधित बँकेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०३ /०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. लक्ष्मीबाई मारोतराव रोडगे, पूर्णा रोड, शिवाजीनगर, ताडकळस, ता. पूर्णा, जि. परभणी

२. शाखाधिकारी, दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि., शाखा पानगेश्वर (पानगांव), ता. रेणापूर, जि. लातूर

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप बँक लि., मुख्य कार्यालय, परळी वैजनाथ, ता. परळी वै., जि. बीड

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२०४
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गजानन बळीराम चौधरी,<br>रा. बोदवड, जि. जळगांव | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक,<br>जळगांव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी<br>मर्यादित, जळगांव | : | प्रतिवादी |
| १ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जळगांव | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.०७.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ०५.०१.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे व्यवस्थापक, जळगांव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी मर्यादित, जळगांव यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतपेढीने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०९.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांनी

कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व पेतपेढीचे संबंधित अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी, पतपेढीचे अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०४ /०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०९-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गजानन बळीराम चौधरी, साकला कॉलनी, ता. बोदवड, जि. जळगांव

२. व्यवस्थापक, जळगांव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी मर्यादित, बळीराम पेठ, जळगांव

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२०५
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

१ श्री. गोविंद पर्वतराव मोरे, : अपिलार्थी
रा. सोयगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
चेअरमन / सेक्रेटरी,
राजमाता अहिल्यादेवी नागरी सहकारी पतसंस्था
मर्यादित, जळगांव (निं.), ता. मालेगांव, जि.
नाशिक

१ जन अपिलीय अधिकारी तथा :
उपनिबंधक,
सहकारी संस्था, मालेगांव, जि. नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.०३.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १०.१२.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे चेअरमन / सेक्रेटरी, राजमाता अहिल्यादेवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जळगांव (निं.), ता. मालेगांव, जि. नाशिक यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेच्या सचिवांनी त्यांच्या दि. १३.०१.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७०००/- इतके त्यांच्या पतसंस्थेकडे भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. सचिवांच्या या सूचनेप्रमाणे शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी

संस्था, मालेगांव, जि. नाशिक यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक १४.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, मालेगांव यांनी दि. २१.०२.२००९ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना सशुल्क उपलब्ध करुन देण्याचे सचिव, राजमाता अहिल्यादेवी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. यांना आदेशित केले. तथापि तदनंतरही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित व पतसंस्थेचे अधिकारी, उपनिबंधक,सहकारी संस्था, मालेगांव उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित पतसंस्थेचे अधिकारी व उपनिबंधक, सहकारी संस्था, मालेगांव यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. परंतु अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था

अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

त्यामुळे तालुका उपनिबंधक सहकारी संस्था यांचे या प्रकरणाशी संबंधित आदेश क्र. १४७९/विकास-१/माहिती अधि/अपील/०९, दि. २१.०२.२००९ अधिक्रमित करण्यात येत आहेत व माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०५ /०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोविंद पर्वतराव मोरे, रेश-पर्व, आनंद नगर, सोयगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक

२. चेअरमन / सेक्रेटरी, राजमाता अहिल्यादेवी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., जळगांव (निं.), ता. मालेगांव, जि. नाशिक

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, मालेगांव, जि. नाशिक

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२०६
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

१ श्री. अन्सारी मो. गुफरान मो. युसूफ, : अपिलार्थी
रा. मालेगांव, जि. नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अध्यक्ष / कार्यवाह,
नाशिक डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नाशिक
१ जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०३.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २४.०९.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे अध्यक्ष / कार्यवाह, नाशिक डिस्ट्रिक्ट सेंकडरी टीचर्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नाशिक यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेच्या अध्यक्षांनी त्यांच्या दि. २४.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १०००/- इतके त्यांच्या संस्थेच्या मुख्य कार्यालयात रोख किंवा मनीऑडरव्दारे भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि यानंतर अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक

१५.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दि. १५.०१.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्याचे व्यवस्थापक, नाशिक डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., नाशिक यांना आदेशित केले. उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व पतसंस्थेचे अधिकारी आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी पतसंस्था, नाशिक उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित पतसंस्थेचे अधिकारी व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. त्यामुळे या प्रकरणी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचे आदेश क्र. १५४ जा.क्र .वि.-२ /मा.अ.अ.२००५/अपील/अन्सारी/०९, दि. १५.०१.२००९ रद्द करण्यात येत आहेत. तथापि अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी

संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०६ /०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**
अपील क्र. २०६/०९

प्रत,

१. श्री. अन्सारी मो. गुफरान मो. युसूफ, मुख्याध्यापक- टी. एम. हायस्कूल, सर्वे नं. ५७, मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक.

२. अध्यक्ष / कार्यवाह, नाशिक डिस्ट्रिक्ट सेंकडरी टीचर्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., भाग्यश्री, वर्टी कॉलनी, नाशिक ४२२ ००१.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२०७
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अन्सारी मो. गुफरान मो. युसूफ,<br>रा. मालेगांव, जि. नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>अध्यक्ष / कार्यवाह,<br>नाशिक डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स को-ऑप. क्रेडिट<br>सोसायटी लि., नाशिक | : | प्रतिवादी |
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, नाशिक | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.०४.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ११.०८.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे अध्यक्ष / कार्यवाह, नाशिक डिस्ट्रिक्ट सेंकडरी टीचर्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नाशिक यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेच्या अध्यक्षांनी त्यांच्या दि. १०.०९.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २५०/- इतके त्यांच्या संस्थेच्या मुख्य कार्यालयात रोख किंवा मनीऑडरव्दारे भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि शुल्काचा भरणा करुनही अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्याकडे माहिती अधिकार

अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०७.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दि. १२.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्याचे व्यवस्थापक, नाशिक डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स को-ऑप क्रेडिट सोसायटी लि., नाशिक यांना आदेशित केले. उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित व पतसंस्थेचे अधिकारी आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित पतसंस्थेचे अधिकारी व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. त्यामुळे या प्रकरणी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचे आदेश क्र. ५०६९/वि-२/मा.अ.अ.२००५/अपील/अन्सारी/०८, दि. १२.११.२००८ रद्द

करण्यात येत आहेत. तथापि अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

सबब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०७ /०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**
अपील क्र. २०७/०९

प्रत,

१. श्री. अन्सारी मो. गुफरान मो. युसूफ, मुख्याध्यापक- टी.एम. हायस्कूल, सर्वे नं. ५७, मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक.

२. अध्यक्ष / कार्यवाह, नाशिक डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., भाग्यश्री, वर्टी कॉलनी, नाशिक ४२२ ००१.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८३

निर्णय दिनांक ०९/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती अखीला बानो मो. मुसा,<br>रा. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासक,<br>तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था<br>मर्यादित, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| १ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ०४.१२.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे प्रशासक, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमात विहीत केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०७.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी दि. १७.०१.२००९ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस हवी

असलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देणे बाबत प्रशासक, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., औरंगाबाद यांना आदेशित केले. यानंतरही हवी असलेली माहिती उपलब्ध न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, पतसंस्थेचे अधिकारी व तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद हे सर्वजण उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी, पतसंस्थेचे अधिकारी व तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. त्यामुळे तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांचे आदेश क्र. ताउनि/प्रशा-१/मा.अ.अ./६२४/२००९, दि.१७.०१.२००९ हे रद्द करण्यात येत आहेत. तथापि अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २८३ /०९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती अखीला बानो मो. मुसा, घर नं. ०१-१७-९८, नूर कॉलनी, हेड पोस्ट ऑफिससमोर, जुना बाजार, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद

२. प्रशासक, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, कबाडीपुरा, औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८४
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती खान बसीरा अलीम खान,<br>रा. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासक,<br>तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था<br>मर्यादित, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| १ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद | : | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.०२.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ०४.१२.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे प्रशासक, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमात विहीत केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०७.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद यांनी दि. १७.०१.२००९ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस हवी

असलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देणे बाबत प्रशासक, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या., औरंगाबाद यांना आदेशित केले. यानंतरही हवी असलेली माहिती उपलब्ध न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, पतसंस्थेचे अधिकारी व तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद हे सर्वजण उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी, पतसंस्थेचे अधिकारी व तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. त्यामुळे तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांचे आदेश क्र. ताउनि/प्रशा-१/मा.अ.अ./६२३/२००९, दि. १७.०१.२००९ हे रद्द करण्यात येत आहेत. तथापि अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे  व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१)  अपील क्र. २८४ /०९ खारीज  करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :      ०९-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती खान बसीरा अलीम खान, ब्लॉक क्रं. ११/अ, कोहेनुर कॉलनी, पानचक्कीजवळ, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद

२. प्रशासक, तलत शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, कबाडीपुरा, औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८५
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

१ श्री. प्रितमसिंग तुलजासिंग पवार, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, बिलोली, जि. नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
तहसील कार्यालय, बिलोली, जि. नांदेड

**निर्णय**

श्री. प्रितमसिंग तुलजासिंग पवार यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १०.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २५.०२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.३१.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३७५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९/१२/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रितमसिंग तुलजासिंग पवार, उप-संपादक, साप्ताहिक भ्रष्टाचार निर्मूलन, डॉ. आंबेडकर नगर, महाविर नगर पोलिस चौकी समोर, नांदेड

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८६
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०१.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२४.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ५८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९/१२/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८७
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल,<br>रा. परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, औरंगाबाद | | |

**निर्णय**

श्री. हिरासिंह गुलाबसिंह चंदेल यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १७.०२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०९.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.३०.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०९/१२/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हिरासिंग गुलाबसिंह चंदेल, 'निशांत',वैभव नगर, जिंतूर रोड, परभणी

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८८
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. सुखवंत कौर रविंद्रसिंग बुंगई,<br>रा. सेलू, जि. परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, सेलू, जि. परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी,<br>उपजिल्हाधिकारी कार्यालय, सेलू, जि. परभणी | | |

**निर्णय**

सौ. सुखवंत कौर रविंद्रसिंग बुंगई यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०९.०२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०२.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.११.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक ०७.१०.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ३२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) सौ. सुखवंत कौर रविंद्रसिंग बुंगई, १/५७६, शास्त्रीनगर, सेलू, ता.सेलू, जि. परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८९
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मिलिंद वसंतराव विटेकर,<br>रा. सोनपेठ, जि. परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, सोनपेठ, जि. परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,<br>परभणी | | |

**निर्णय**

श्री. मिलिंद वसंतराव विटेकर यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०९.०२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १५.०७.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०१.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर दिनांक १९.०९.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत अथवा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश

प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपील आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसापेक्षा ४८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०९/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मिलिंद वसंतराव विटेकर, दत्त कृपा, ब्राम्हण गल्ली, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२९०
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

१ श्री. बिरादार विजयकुमार गुणवंतराव, : अपिलार्थी
रा. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्रा.),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

श्री. बिरादार विजयकुमार गुणवंतराव यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १३.०८.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.१२.१२.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ३२५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१)  अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :  ०९/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री.  बिरादार विजयकुमार गुणवंतराव, साई मंगल कार्यालयाजवळ, अनुसया सोसायटी, प्लॉट नं. ५५, हडको, नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१०२
निर्णय दिनांक ०९/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दामोधर भिकाजी मदन,<br>रा. केळीगव्हाण, ता. बदनापूर, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे विभाग, जालना | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधिक्षक अभियंता,<br>पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद | | |

**निर्णय**

श्री. दामोधर भिकाजी मदन यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २४.०१.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२१.०२.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४८१ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१)  अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :    ०९/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१)  श्री.  दामोधर भिकाजी मदन, मु.पो. केळीगव्हाण, ता. बदनापूर, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७१८
निर्णय दिनांक: १०-१२-२००९

१. श्री. जाधव भागवत दगडू, : अपिलार्थी
रा. अहमदपूर, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय,
अहमदपूर,जि.लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय,
अहमदपूर,जि. लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक कार्यालय निरीक्षक,
नगरपरिषद कार्यालय,अहमदपूर,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी : मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय,
अहमदपूर,जि. लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील आस्थापना विभागाविषयी काही माहिती एकूण ७ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०४.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०८.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४,५ व ६ शी संबंधित खुलासेवार माहिती मागवून ती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस ज्या व्यक्तींच्या संदर्भात माहिती हवी आहे, त्या व्यक्तींच्या नावांची विचारणा केली. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४,५ व ६ बाबत सविस्तर दुरुस्तीअर्ज कर्मचाऱ्यांच्या नावांसह त्यांच्याकडे देण्याचे सूचित केले. तथापि अशाप्रकारचा कोणताही अर्ज अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व  जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४,५ व ६ शी संबंधित त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षेप्रमाणे माहिती प्राप्त झालेली नाही. यासंदर्भात अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, या अर्जामध्ये मुद्दा क्र.४ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, 'शासनाच्या

अध्यादेशानुसार नगरपरिषदेच्या कार्यालयातील जास्तीत जास्त कालावधीपासून काम करणाऱ्या व्यक्तींना किती प्रमोशन दिले आहे अशा प्रमोशन दिलेल्या व्यक्तींची नावे व ते काम करीत असल्यापासूनचा कालावधी द्यावा', अशी माहिती मागितली आहे. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की,कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये केवळ जास्त कालावधीपासून काम केले आहे, या कारणास्तव कर्मचाऱ्यांना बढती दिली जात नाही. परंतु वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे अशा कर्मचाऱ्यांना १२ वर्षानंतर नियमितपणे वाढीव वेतनश्रेणी शासनाच्या संबंधित आदेशाच्या अटींच्या अधीन राहून दिली जाते. त्यामुळे अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुद्दा क्र. ४ द्वारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ द्वारे, 'जर एखादी व्यक्ती जन माहिती अधिकारी कार्यालयाचा कर्मचारी आहे व त्यांनी दहा वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून त्यांच्या कार्यालयात काम केले असेल तर त्या व्यक्तीस किती वेळा व कोणती बढती देण्यात येते', अशा प्रकारची काल्पनिक व अमूर्त स्वरुपातील माहिती मागितली आहे. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित केल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे स्वरुप पाहता, यामध्ये अशाप्रकारच्या काल्पनिक स्वरुपाच्या माहितीच्या व्याप्तीचा समावेश नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय असणार नाही. याच अर्जातील मुद्दा क्र. ६ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'त्यांच्या कार्यालयात दहा वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून काम करणाऱ्या किती व्यक्तींना बढती देण्यात आली नाही अशा व्यक्तींची नावे व त्यांना बढती देण्यात आली नाही, याचे कारण', अशी खुलासेवजा माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिली आहे. अशाप्रकारची माहिती वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या

व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट नाही, त्यामुळे या मुद्यावरील माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. याही पेक्षा दुसरे असे महत्त्वाचे आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४,५ व ६ च्या संदर्भातील माहिती मोघम स्वरुपात विचारली आहे. एवढेच नव्हे तर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये, 'माहितीशी संबंधित कालावधी' या मुद्यासमोर 'वरीलप्रमाणे' असे आपले अभिप्राय दिले आहेत. "वरीलप्रमाणे" या शब्दाद्वारे अपिलार्थीस काय सूचवावयाचे आहे, याचा कोणाही जन माहिती अधिकाऱ्यास अर्थबोध होणार नाही. अशाप्रकारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४,५ व ६ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहितीच मूळात अवैध असल्यामुळे ती, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. उर्वरित मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. या मुद्यावर अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अथवा आजच्या सुनावणीमध्ये कोणतेही भाष्य केले नाही, हे पाहता अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी देय असलेली संपूर्ण माहिती विहित मुदतीत प्राप्त झाली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः १०-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जाधव भागवत दगडू,रा. भाग्यनगर, घोडकेचा वाडा,अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यालय निरीक्षक, नगरपरिषद कार्यालय, अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय,अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०१५

निर्णय दिनांक १०.१२.२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. महंमद गौस गुलाम मुंशी ,<br>छावणी, औरंगाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>तंत्र अधिकारी, विभागीय कृषी<br>सहसंचालक कार्यालय, औरंगाबाद | : प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,<br>कार्यालय, विभागीय कृषि सहसंचालक,<br>औरंगाबाद | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०३.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मराठवाडा पाणलोट विकास मिशन अंतर्गत औरंगाबाद तालुक्यात झालेल्या कामांच्या तपासणीबाबत व निलंबित केलेल्या कर्मचाऱ्यांसंबंधी, दिनांक ०१.०४.२००७ ते २०.०९.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम

प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २४/- इतके शासकीय कोषागारात भरणा करुन चलनाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१.११.२००८ रोजी केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०३.११.२००८ रोजी त्यांना देय असलेली माहिती प्राप्त झाली व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील जी माहिती अपिलार्थीस देय नाही ती माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८ (१)(ज) व (छ) नुसार देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व ही माहिती अपूर्ण असल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८.११.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी घेतलेल्या भूमिकेशी सहमती दर्शविली व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या चौकशीच्या संदर्भात आहे ती चौकशी पूर्ण झाल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३.११.२००८ रोजी दिली असून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ ते ६ व ८ शी संबंधित माहिती उघड केल्यास त्यांच्या

खात्यातील उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या जीविताला धोका उत्पन्न होऊ शकतो. तसेच यामुळे ही चौकशी पूर्ण करण्यासाठी व अपचारी कर्मचाऱ्यांवर खटला दाखल करण्यामध्ये त्यांना अडचण संभवत आहे, त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्याचे नाकारले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेल्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्रमांक २ ते ६ आणि ८ च्या संदर्भातील माहिती ही, या संदर्भित चौकशी प्रकरणाचा गाभा होऊ शकतो. ही माहिती उघड केल्याने जन अपिलीय अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे या चौकशीच्या पुढील प्रक्रीयेमध्ये अडथळे उत्पन्न होणे शक्य आहे. त्यामुळे या टप्प्यावर अपिलार्थीस माहिती उघड न करुन देण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती बरोबर आहे. तसेच अपिलार्थी त्यांच्या या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेऊन कोणते व्यापक जनहित साध्य करणार आहेत, हे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. परंतु त्याचबरोबर आज सुनावणीसाठी देखील ते आयोगासमोर अनुपस्थित आहेत. अशा परिस्थितीत जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८.११.२००८ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीस देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत व योग्य ती पध्दत अवलंबून दिली आहे आणि जी माहिती देय नाही ती अधिनियमातील कलम ७ (८) च्या तरतुदीचे पालन करुन अपिलार्थीस, योग्य ते समर्थन देऊन नाकारली आहे. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महंमद गौस गुलाम मुंशी, घर नं. ६५०, पेन्शनपुरा, छावणी, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कार्यालय, विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०१६

निर्णय दिनांक १०.१२.२००९

१ श्री. विजय बन्सी पगारे, : अपिलार्थी
मु.पो. सोयगांव, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तालुका कृषी अधिकारी कार्यालय,
सोयगांव,ता. सोयगांव, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय,
सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय सोयगांव,
जि. औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषी अधिकारी,
सोयगांव, जि. औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेळेत माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामांची सन २००५ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सर्व मातीनाला बंधारे, सिमेंट बंधारे, लुज बोल्डर, गली प्लगींग या सर्व कामांच्या मस्टरच्या छायांकित साक्षांकित सही शिक्यासह प्रती, या कालावधीत एकूण १६ गावामध्ये झालेल्या मृदसंधारण कामांसंदर्भात व या व्यतिरिक्त ९ गावांमध्ये करण्यात आलेल्या सिमेंट बंधाऱ्याच्या कामांना प्राप्त झालेल्या कामांचे मंजूर अंदाजपत्रक व कार्यारंभ आदेशाच्या साक्षांकित छायाप्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १०.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ९५६८/- इतके त्यांना शासकीय कोषागारात चलनाद्वारे भरणा करण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा संपूर्ण तपशील दिला आहे. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०.१०.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२.१२.२००८ रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आवश्यक असलेल्या रकमेपैकी सोयगाव तालुका कृषि कार्यालयातील माहिती अधिकारी व अपिलार्थी यांनी प्रत्येकी ५० टक्के रक्कम त्यांच्या कार्यालयात पूर्णपणे भरण्याचे सूचित केले व या शुल्काची रक्कम प्राप्त झाल्यावर अपिलार्थीस विनाविलंब माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी त्यांच्या दिनांक १०.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या कळविलेल्या शुल्काचा भरणा अपिलार्थीने अद्यापपावेतो त्यांच्या कार्यालयात केलेला नाही. अपिलार्थीने या शुल्काचा भरणा केल्यास ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क योग्य त्या तपशीलासह दिनांक १०.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविलेले आहे. अपिलार्थीस हे पत्र दिनांक ११.०९.२००८ रोजी प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या पोचसहीची पावती आयोगास सादर केली आहे. परंतु या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा अपिलार्थीने या संपूर्ण घटनाक्रमामध्ये करण्याची अपिलार्थीने कोणत्याही टप्प्यावर तयारी दर्शविले नाही, असे आढळून येत आहे. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर त्यांच्या अर्जाच्या संदर्भात पुढील संपूर्ण घडामोडी ज्ञात होण्याच्या दृष्टीने अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याशी व्यक्तिशः संपर्क साधणे, ही त्यांची पूर्णतः जबाबदारी असते. ही जबाबदारी अपिलार्थीने मूळात या प्रकरणी पार पाडल्याचा कोणताही पुरावा आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या

कागदपत्रावरुन आढळून येत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही. आजही ते अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती सशुल्क देण्यासाठी तयार आहेत. मात्र या शुल्काचा भरणा करण्याची अधिनियमातील कलम ७(५) मध्ये विहित केलेली जबाबदारी मात्र अपिलार्थी पार पाडत नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १०.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजय बन्सी पगारे, मु.पो. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सोयगांव, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, सोयगांव, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०१७
निर्णय दिनांक: १०-१२-२००९

१. श्रीमती जिजाबाई पंडित जाधव, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,खुलताबाद
औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : बाल विकास प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
खुलताबाद, जि. औरंगाबाद.

जन अपिलीय अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी (एकात्मिक बाल विकास सेवा योजना),जिल्हा परिषद,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व या अर्जाद्वारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "जिजाबाई पंडीत जाधव,भांडेगाव ता.खुलताबाद अंगणवाडी भांडेगाव येथे मदतनीस म्हणून जिल्हा परिषद आदेशाप्रमाणे रुजू का केले नाही" अशी सन २००४-०८ या कालावधीशी संबंधित माहिती व्यक्तिशः मागितली होती. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्या दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा उल्लेख केला आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३४/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही व अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १०.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.१२.२००८ रोजीच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने दिलेल्या पत्त्यावर दि. ०५.१२.२००८ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली असता, हे पत्र विनातामिली जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०१.२००९ रोजी परत प्राप्त झाले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांचा पत्रव्यवहाराचा पत्ता दिला नव्हता. तरीही मागितलेल्या माहितीच्या वर्णनावरुन त्यांनी अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्याचे सूचित केले. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी त्यांना अपिलार्थीचा पत्रव्यवहाराचा पत्ता समजल्यानंतर त्यांनी दि. ०५.१२.२००८ रोजी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पत्राने पाठविली, परंतु हे पत्र देखील अपिलार्थीने न स्वीकारल्यामुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने स्वतःच्या नेमणूकीविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना भांडेगाव येथे अंगणवाडी मदतनीस म्हणून का रुजू करुन घेतले नाही, अशा स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली ही माहिती अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णपणे विसंगत व व्याप्ती बाहेरची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाची कारणे अथवा स्पष्टीकरणे त्यांनी अर्जदारास देणे, अशाप्रकारची प्रक्रिया या अधिनियमामध्ये मूळात अभिप्रेत नाही. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १७ पृष्ठांची माहिती

दिली. या माहितीमध्ये इतर ग्रामपंचायतीने अंगणवाडी मदतनीस म्हणून रुजू करुन घेण्यासाठी दिलेल्या असहमतीच्या पत्राचा प्रामुख्याने समावेश आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या त्यांच्या प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळी दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती पोस्टाने पाठविली असता, ते पत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे विनातामिली परत प्राप्त झाले. आयोगाच्या कार्यालयातून पाठविले गेलेले आजच्या सुनावणीचे पत्र देखील आयोगाच्या कार्यालयात विनातामिली परत प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. यावरुन अपिलार्थीस कोणतेच पत्र स्वीकारण्याची ईच्छा नसावी, असे अनुमान काढण्यात येत आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे असे आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी पूर्णपणे विसंगत असणारी माहिती मागितली आहे. एवढे असूनही माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस माहिती देऊ केली असता त्यांनी ती स्वीकारली नाही, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः १०-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती जिजाबाई पंडित जाधव,रा.पोस्ट हर्सूल, गायकवाड सोसायटी, श्री.राठोड यांचे घर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, खुलताबाद, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (आय.सी.डी.एस.)जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०१८
निर्णय दिनांक: १०-१२-२००९

१. श्री. कय्युम अहमद खान, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपअभियंता,
महानगरपालिका,औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक, नगररचना,
महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी सहायक संचालक, नगररचना,
: महानगरपालिका, औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०९.२००८ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सीटीएस नं.१९२६७ मधील घ.नं. ५-९-६४ बाबतची, घर नं.५-९-८६

हमालवाडी/हॉलीडे कॅम्पच्या शेजारी,लतीफ मटन शॉप/रेल्वेस्टेशन रोड औरंगाबाद येथील सन १९७२ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ८ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीकडे, त्यांना ज्या मिळकतीसंदर्भात माहिती हवी आहे त्या मिळकतीचा बांधकाम परवानगी क्रमांक व दिनांक, संचिका क्रमांक व दिनांक,भोगवटा प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक व परवानाधारकाचे नाव इत्यादी माहितीचा तपशील अपिलार्थीस विचारला. प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २६.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर निर्णय झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. २६.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन -(स्पष्ट)- आदेश पारित करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २६.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२६.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः १०-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कय्युम अहमद खान,घ.नं.५-८-६६ मोहल्ला हमालवाडी,हॉलीडे कॅम्पशेजारी, रेल्वेस्टेशनरोड,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगररचना विभाग,महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,नगर रचना, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०१९
निर्णय दिनांकः १०-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. किशोर भिकनसिंग राजपूत,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी,<br>जवाहरलाल नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा,<br>सहसंचालक,तंत्रशिक्षण<br>विभागीय कार्यालय, औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, जवाहरलाल अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयाच्या संदर्भात एकूण १६ विविध मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, सन १९८४ ते २००८ या कालावधीशी संबंधित असून अपिलार्थीने ही माहिती संबंधित जन माहिती

अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली होती. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, तंत्रशिक्षण विभाग, औरंगाबाद यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २३.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जवाहरलाल नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालयास अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि हा निर्णय पारित होऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.११.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जवाहरलाल नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबादचे प्रतिनिधी श्री. ए.एल.टिकले वकील व सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

जवाहरलाल नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांचे महाविद्यालय हे पूर्णतः त्यांनी उभारलेल्या निधीतूनच चालविले जात आहे. त्यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे भरीव अर्थसहाय्य मिळत नाही व तसे शपथपत्र त्यांनी आयोगासमोर सादर केले आहे.

यासंदर्भात सर्व उपस्थितांना आयोगातर्फे असे स्पष्ट करण्यात आले की, अशाप्रकारच्या प्रकरणांसंदर्भात मा. उच्च न्यायालय,मुंबईच्या नागपूर खंडपीठाने दि. २०.०८.२००९ रोजी दिलेला निर्णय विचारात घेणे योग्य राहील. नागपूर खंडपीठाने त्यांच्याकडील रिट पिटीशन क्र.५१३२/२००८, नगर युवक शिक्षण संस्था आणि यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यासंदर्भात दि. २०.०८.२००९ रोजी अशाप्रकारच्या खाजगी संस्थांची महाविद्यालये माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज)

प्रमाणे 'सार्वजनिक प्राधिकरणा'च्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाहीत, असा निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने, अधिनियमातील "नियंत्रण" व "मोठया प्रमाणात वित्त पुरवठा" या मुद्यावरही पुरेसे भाष्य केले असून खाजगी संस्थांच्या महाविद्यालयांवर माहिती अधिकार अधिनियमाद्वारे अभिप्रेत असलेले "नियंत्रण"व "वित्त सहाय्य" शासनाकडून केले जात नसल्याचा निर्णय दिला आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ज) मध्ये विहित केलेल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अशाप्रकारची खाजगी महाविद्यालये येत नसल्यामुळे सदर अपील फेटाळून राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाचे अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आदेश रद्द ठरविले आहेत. विचाराधीन प्रकरण देखील मा. उच्च न्यायालयाच्या वर संदर्भित केलेल्या प्रकरणाप्रमाणेच असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १०-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, सिडको,एन-६,ई-२३/१०,संभाजी कॉलनी,नविन औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, जवाहरलाल नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय, एन-६, सिडको,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०२०
निर्णय दिनांक: १०-१२-२००९

१. श्री. रुपेश दौलतराव पाडमुख, नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, माहूर,जि.नांदेड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जं.का.स.सं.),किनवट, जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०३.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित माहे जानेवारी २००७ ते जून २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत आणि इतर विविध योजनेअंतर्गत जानेवारी ते जून २००७ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या परिक्षेत्रामध्ये झालेल्या एल.बी., सी.सी.टी,

एन.बी.अंतर्गत केलेल्या कामांच्या नावासहीत रक्कम, अंतीम खर्च व या सर्व कामाचे हजेरीपत्रकांच्या आणि प्रदान केलेल्या देयकांच्या साक्षांकित प्रती" - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०८.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २५००/- इतके त्यांना कोषागारात भरण्याचे सूचित केले. या प्रकरणी अपिलार्थीने दि. १३.०५.२००८ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या नांदेड येथील शाखेमध्ये केला. परंतु यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०६.२००८ रोजी निर्णय देऊन वनक्षेत्रपाल, माहूर यांच्याकडून हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या नंतरही माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांनी स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या नांदेड येथील शाखेत केलेला आहे. तथापि चलनाची मूळ प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर न केल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे चलनाची मूळ प्रत सादर करुन माहिती अधिकाऱ्याकडून माहिती हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले

असता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागितली होती. अर्जदाराने ज्या माध्यमाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षिली आहे, केवळ त्याच माध्यमाद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती देणे हे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०६.२००८ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस टपालाद्वारे माहिती पुरविण्याचे सूचित करण्याऐवजी अपिलार्थीस उलट जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेण्याचे आदेशित केले आहे. अशाप्रकारचे आदेश हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहेत. या प्रकरणी असेही आढळून येत आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही व अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना दि. २९.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे या वस्तुस्थितीची कल्पना देखील दिली आहे. यावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही त्यांना देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अद्यापही त्यांनी जर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली नसेल तर त्यांनी ती आता अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पाठवावी व या प्रकरणी अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु. २५००/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पाठवावी व या प्रकरणी अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु. २५००/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १०-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रुपेश दौलतराव पाडमुख, संपादक, दै. समीक्षा, समीक्षा वृत्तसेवा, हॉटेल ओमच्या शेजारी, कै.कुसुमताई चव्हाण मार्ग, शिवाजीनगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी,माहूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जं.का.स.सं.),किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०२१

निर्णय दिनांक १०.१२.२००९

१ श्री. आसाराम ग्यानबा कांदे, : अपिलार्थी
मु. चोपनवाडी, पो. दिंद्रुड,
ता. माजलगांव, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
पंचायत समिती कार्यालय,
माजलगांव, जि. बीड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड
प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक,
पंचायत समिती, माजलगांव, जि. बीड
जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, माजलगांव, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कर्तव्य पालनात कसूर केल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माजलगांव पंचायत समिती मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना अनुदान स्वरुपात दिलेल्या जवाहर विहिरींशी संबंधित सन १९९० ते मार्च २००८ या कालावधीतील काही माहिती एकूण ७ मुद्यांद्वारे नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

सदर अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०९.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्याकडे सादर केलेले दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र हे कालबाह्य झाले असल्याचे अपिलार्थीच्या निदर्शनास आणले. तथापि सदर पत्र अपिलार्थीस अधिनियमाद्वारे माहिती देण्यासाठी कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने मिळाले. परंतु अपिलार्थीने यापूर्वीच अधिनियमातील कलम १९ (१) च्या तदतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९.०९.२००८ रोजी या अपील अर्जावर आपला निर्णय देऊन ४ दिवसांच्या आत अपिलार्थीने दारिद्र्यरेषेखालचे प्रमाणपत्र सादर केले तर मोफत माहिती देण्याचे अन्यथा सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे, असा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयास अनुसरुन त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १०.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी

अपिलार्थीस ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा वैध पुरावा त्यांच्याकडे सादर करण्याचे अथवा त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४२७२/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे केल्यानंतर अपिलार्थीस ते माहिती पुरवू शकतील व तसेच ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा वैध पुरावा सादर न केल्यामुळे ते माहिती पुरवू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही स्पष्ट केले की, २००२ च्या यादीनुसार अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नाहीत, असे त्यांना आढळून आले आहे.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या दिनांक ०४.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या कालावधीपेक्षा विलंबाने दिला असल्यामुळे, अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार, अपिलार्थी हे आता दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असोत किंवा नसोत त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आता विनामूल्य माहिती पुरविणे त्यांना अनिवार्य आहे. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ७ मुद्याद्वारे माहिती मागविली होती. त्यातील मुद्दा क्रमांक १ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली, "............ माजलगांव, पंचायत समिती अंतर्गत कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना जवाहर विहिरी अनुदान स्वरुपात दिल्या होत्या हे खरे आहे काय?" या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या

माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर रु. १०/- इतक्या किमतीचे कोर्ट स्टँम्प डकवले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस आता प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे या कोर्ट - फी - स्टॅम्पकरिता रु.१० /- इतके शुल्क भरावे लागेल व या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, प्रथमतः त्यांच्याकडून कोर्ट - फी - स्टॅम्पकरिता लागणारे शुल्क रु १०/- इतके शासकीय कोषागारात चलनाद्वारे भरुन घेऊन नंतर अपिलार्थीस ही माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून त्यांना आवश्यक असलेली माहिती हेतूपुरस्सरपणे दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्यामुळे, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील विनंतीप्रमाणे, जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची अथवा शास्तीची कारवाई करण्याचे आदेश आयोग देत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती वगळून, उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत प्रथमतः अपिलार्थीकडून कोर्ट फी स्टॅम्प चे शुल्क रु १०/- इतके स्वीकारुन, विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १०.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. आसाराम ग्यानबा कांदे, मु. चोपनवाडी, पो. दिंद्रुड, ता. माजलगांव, जि. बीड - ४३१ १२८ .

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, पंचायत समिती, माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०२२

निर्णय दिनांक १०.१२.२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महालिंगप्पा विश्वनाथप्पा महाजन,<br>उदगीर, जि. लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, उदगीर,<br>जि. लातूर | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक, नगरपालिका प्रशासन<br>संचालनालय,मुंबई. | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : लिपीक, नगर परिषद, उदगीर, जि. लातूर
जन अपिलीय अधिकारी : मुख्याधिकारी,
नगरपरिषद, उदगीर, जि. लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची माहिती प्राप्त झाली असल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील फेटाळले असल्याकारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या सेवाकाळातील रजा व अनुपस्थिती संदर्भात जून व जुलै १९८५ या कालावधीशी संबंधित काही माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"माझ्या सेवाकाळातील जून व जुलै १९८५ या दोन महिन्यात मला कोणत्या वेतन श्रेणीत किती दिवसाचे सेवा वेतन, किती दिवसांचे कोणत्या व किती रजेचे वेतन, देण्यात आले आहे. तसेच या काळात माझी गैरहजेरी असेल तर तो काळ किती दिवसाचा आहे, याची मला माहिती हवी आहे. तरी ती नियमाप्रमाणे मला देण्यात यावी."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस दिली. तथापि ही माहिती अपिलार्थीस मान्य नसल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९.१२.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील अमान्य केले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आणि जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ११.०६.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन

माहिती अधिकारी यांनी दिनांक १०.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठविलेली माहिती चुकीची असल्याचे वाटत आहे. त्यापृष्ठ्यर्थ त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांचे सेवानिवृत्ती वेतन निश्चित करताता, त्यांच्या सेवाकालावधीला जोडून घेतलेली अर्जित रजा व त्यानंतर त्यांची गैरहजेरी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ च्या नियम ४८ (१) प्रमाणे नियमित करावयास हवी होती, म्हणजे हा नमूद केलेला कालावधी महाराष्ट्र नागरी (सेवानिवृत्ती) वेतन नियम १९८२ च्या नियम ३५ प्रमाणे सेवानिवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरता आला असता व त्यामुळे त्यांना सुधारित सेवानिवृत्ती वेतन मिळू शकले असते. अपिलार्थीने आयोगास केलेल्या द्वितीय अपील अर्जातील विनंती पाहता, अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, अशाप्रकारच्या त्यांच्या विनंतीसंदर्भात, प्रशासकीय स्वरुपाचे आदेश निर्गमित होणे अपेक्षित असल्याचे दिसून येते. तथापि अशा प्रकारच्या प्रशासकीय बाबींमध्ये हस्तक्षेप करण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगास नसल्यामुळे, अपिलार्थीस ज्या पध्दतीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून निर्णय प्राप्त होणे अपेक्षित आहे, त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना निर्णय देण्याचे आयोग आदेशित करीत नाही. अशा प्रकारच्या प्रकरणी निर्णय देण्यासाठी वेगळे सक्षम प्राधिकरण अस्तित्वात आहे. त्यामुळे अपिलार्थीने अशा प्रकारच्या प्रशासकीय प्राधिकरणाकडे स्वतंत्र अपील करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १०.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती त्यांना चुकीची का वाटत आहे, याचे स्पष्टीकरण करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्याकडील उपलब्ध कागदपत्रावरुन दिलेली माहिती ही योग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे, अशा प्रकारच्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १०.१२.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महालिंगप्पा विश्वनाथप्पा महाजन, "वरदान", रेल्वे स्टेशन रोड (डाक बंगला मार्ग), उदगीर, जि. लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद, उदगीर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०२३
निर्णय दिनांकः १०-१२-२००९

१. श्री. संभाजी दिगांबर चेरकेवाड, : अपिलार्थी
रा. रायखोड,पो.हाळदा, ता.भोकर, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपसंचालक,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक (संशोधन),
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी
समिती,औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१२.२००७ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ११.०४.२००७ ते ०१.०५.२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "१९९५ पासून 'कोळी महादेव' जमातीचे वैधता प्रमाणपत्र दिलेल्या प्रमाणपत्र धारकाच्या प्रत्येक पोलीस व्ही.सी. रिपोर्टची नक्कल, दक्षता पथकाचे ज्या नियमाप्रमाणे काम केले जाते त्या नियमाची छायाप्रत, कु.आशाताई संभाजी चेरकेवाड दि. १४.०९.२००६ रोजी निर्णयातील अधिकाऱ्यांच्या शेऱ्यांची प्रत व अर्ज प्राप्त झाल्यापासून कमीत-कमी किती दिवसात प्रमाणपत्र दिले जाते व जास्तीत जास्त कालावधी किती ?" - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.०५.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती यांच्याकडे दि. ०५.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने केलेला हा अपील अर्ज या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला नाही. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.१२.२००९ रोजी, म्हणजेच आजच्या आयोगाकडील सुनावणीच्या एक दिवस पूर्वी पत्र लिहून अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज चुकीच्या प्राधिकरणाकडे करुन

त्यांच्या या अपील अर्जावर निर्णय पारित न झाल्याचे कारण दर्शवून वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. या सर्वांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांचा युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर प्रथम अपील चुकीच्या प्राधिकरणाकडे केले आहे. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०९.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे काही माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. यावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्र.१ शी संबंधित काही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(९) च्या तरतुदीप्रमाणे नाकारली आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. २,३ व ४ शी संबंधित माहिती दिलेली आहे. आज रोजी अपिलार्थीच्या युक्तिवादावरुन अपिलार्थी या माहितीवर समाधानी नसल्याचे आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित त्यांच्याकडील सर्व नस्त्या/संचिका त्यांना तपासणीसाठी उपलब्ध करुन द्याव्यात व तदनंतर अपिलार्थीस या नस्तीतील आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना सशुल्क उपलब्ध करुन द्याव्यात. जन माहिती अधिकारी यांनी ही कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत करावयाची आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत, या प्रकरणाशी संबंधित सर्व नस्त्या/संचिका त्यांच्या तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात व त्यातील अपिलार्थीस आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना सशुल्क उपलब्ध करुन द्याव्यात.

**औरंगाबाद**
**दिनांकः १०-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संभाजी दिगांबर चेरकेवाड,रा. रायखोड,पो.हाळदा, ता.भोकर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (संशोधन), अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८३९
निर्णय दिनांक: १०-१२-२००९

१. श्री. प्रसाद भालचंद्र वैद्य, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तेरणा इंजिनिअरींग कॉलेज,
नवी मुंबई
२. जन अपिलीय अधिकारी,
तेरणा इंजिनिअरींग कॉलेज,
नवी मुंबई

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाशी संबंधित काही माहिती एकूण ४

मुद्यांद्वारे मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करताना त्यांचा द्वितीय अपील अर्ज, माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्जाच्या प्रती या व्यतिरिक्त इतर कोणतीही कागदपत्रे जोडलेली नाहीत व आज सुनावणीसाठी ते स्वतः अनुपस्थित आहेत. हे पाहता, आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आणि सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १०-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रसाद भालचंद्र वैद्य,हॉटेल मेघमल्हारच्या बाजूला, औसा रोड,रामनगर, लातूर-४१३ ५३१.

२. जन माहिती अधिकारी, तेरणा इंजिनिअरीग कॉलेज, प्लॉट नं.१२,सेक्टर २२,फेज-II,नेरुळ (वेस्ट), नवी मुंबई-४०० ७०६ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, तेरणा इंजिनिअरीग कॉलेज, प्लॉट नं.१२,सेक्टर २२,फेज-II,नेरुळ (पश्चिम), नवी मुंबई-४०० ७०६यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८४०
निर्णय दिनांक: १०-१२-२००९

१. श्री. रामकिसन वाघजी माने, : अपिलार्थी
रा.दाताडा (खु.) ता.सेनगाव,जि.हिंगोली.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जलस्वराज्य प्रकल्प प्रमुख तथा जिल्हा समन्वयक, जलस्वराज्य कार्यालय, जिल्हा परिषद, हिंगोली

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, हिंगोली

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक आरेखक
जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद हिंगोली
जन अपिलीय अधिकारी : गट प्रमुख,
जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद हिंगोली

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०९.२००८ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. २४.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जल स्वराज्य

प्रकल्प प्रमुख तथा जिल्हा समन्वयक, जलस्वराज्य कार्यालय, जिल्हा परिषद, हिंगोली यांना उद्देशून केलेल्या एका अर्जाद्वारे त्यांच्याकडून मौ. दाताडा (खु.) येथील जलस्वराज्य प्रकल्पाविषयी काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने माहितीसाठीचा सदर अर्ज विहित नमून्यात केला नव्हता आणि त्यावर पोस्टाचे रु.१०/- इतक्या किमतीचा कोर्ट-फी-स्टॅम्प डकवला अथवा जोडला नव्हता. त्यामुळे अपिलार्थीच्या या अर्जास कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही. तदनंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावरही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व परिणामी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जलस्वराज्य प्रकल्प प्रमुख तथा जिल्हा समन्वयक, जि.प.कार्यालय, हिंगोली यांच्या नावाने अर्ज करुन त्यांना आवश्यक असलेली माहिती मागविली आहे. अपिलार्थीने हा अर्ज माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार शासन सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. आर.टी.आय. २००५/सी.आर.३१५/०५/५, दिनांक ११.१०.२००५ नुसार विहित केलेल्या परिपत्रकामध्ये केलेला

नाही. या अर्जामध्ये अपिलार्थीस ही माहिती कोणत्या माध्यमाद्वारे अपेक्षित आहे, अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याबाबत कोणताही खुलासा त्यांनी या अर्जामध्ये केलेला नाही. अपिलार्थीने त्यांचा मूळ माहितीसाठीचा अर्ज जिल्हा समन्वयक, जलस्वराज्य कार्यालय यांच्याकडे केला आहे. तथापि अपिलार्थीने ज्या योजनेसंदर्भात त्यांच्याकडून माहिती मागितली आहे, ते अधिकारी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी नाहीत. अपिलार्थीस त्यांनी या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची आजही आवश्यकता असेल तर त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.हिंगोली यांच्याकडे वर सूचित केलेल्या अधिसूचनेमधील परिपत्रकातील नमूना अर्जाप्रमाणे, जर ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ति नसतील तर १० रु. किंमतीचे कोर्ट स्टॅम्प डकवून माहिती मागवावी म्हणजे त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी नेमलेल्या जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकेल. त्यामुळे अपिलार्थीचा दि. २४.०२.२००७ रोजी केलेला माहितीसाठीचा मूळ अर्जच हा, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व पूर्णपणे सादर केला नसल्यामुळे, सुनावणीसाठी विचारात घेणे आयोगास प्रस्तुत वाटत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांक: १०-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामकिसन वाघजी माने,रा.दाताडा (खु.), पो.दाताडा (बु.), ता.सेनगाव,जि.हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आरेखक,जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट प्रमुख,जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२२६
निर्णय दिनांक १०/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत,<br>रा. परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, सोनपेठ, जि. परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, परभणी | | |

**निर्णय**

श्री. दिनकर हरिश्चंद्रराव सावंत यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०८.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.१७.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

२) श्री.  दिनकर हरिश्चंद्रराव सावंत, 'पुष्पक', दत्त नगर, जिंतूर रोड, परभणी, ता.जि. परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२२७
निर्णय दिनांक १०/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. श्रीकृष्ण वसंतराव सूर्यवंशी,<br>रा. तुळजापूर, जि. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक ग्रंथालय संचालक,<br>औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक ग्रंथालय संचालक,<br>औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | | |

**निर्णय**

श्री. श्रीकृष्ण वसंतराव सूर्यवंशी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २९.०९.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२८.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ९८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

३) श्री. श्रीकृष्ण वसंतराव सूर्यवंशी, 'पर्णकुटी', शुक्रवार पेठ, पाणी टाकीजवळ, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२२८
निर्णय दिनांक १०/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. स.जावेद सय्यद वाजेद,<br>रा. कौसडी, ता.जिंतूर, जि. परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, जिंतूर, जि. परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, परभणी | | |

## निर्णय

श्री. स. जावेद सय्यद वाजेद यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २९.०५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०९.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १०/१२/२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

४) श्री. स.जावेद सय्यद वाजेद, मु.पो. कौसडी, ता.जिंतूर, जि. परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२२९
निर्णय दिनांक ११/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. वसंत रामराव सानप,<br>रा. खडकवाडी, पो. निरगुडी, ता. पाटोदा, जि. बीड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती, पाटोदा, जि. बीड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, बीड | | |

**निर्णय**

श्री. वसंत रामराव सानप यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०८.०४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. २६.०९.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.१७.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

५) श्री. वसंत रामराव सानप, रा.खडकवाडी, पो. निरगुडी, ता.पाटोदा, जि. बीड.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२३०
निर्णय दिनांक ११/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मोतीराम गयबू काळे,<br>रा. जानापूरी, पो. वडेपूरी, ता. लोहा, जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, लोहा, जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मोतीराम गयबू काळे यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६.०३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. १८.०६.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.१८.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १०८ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

६) श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापूरी, पो. वडेपूरी, ता. लोहा, जि. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १६८/२००९ व १७३/२००९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६८ व १७३

निर्णय दिनांक ११.१२.२००९

१ सौ. एस.पी.नैण, : अपिलार्थी
द्वारा मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा
व विकास महासंघ, शिवमंदिरच्या पाठीमागे,
सहयोगनगर, नांदेड

**विरुध्द**

**अपील क्रमांक १६८/२००९**

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार, (पुरवठा विभाग),
तहसील कार्यालय भोकर, ता. भोकर,
जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर,
ता. भोकर, जि. नांदेड

त्रयस्थ पक्ष : १) श्री. तुळशीराम पोकलवार,
२) श्री. लक्ष्मण उत्तरवार,
३) श्री. विष्णू सोमेवाड व

४) श्री. एकनाथ महाजन

**अपील क्रमांक १७३/२००९**

१ जन माहिती अधिकारी तथा

नायब तहसीलदार, (पुरवठा विभाग), देगलूर,

ता. देगलूर, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

तहसीलदार, तहसील कार्यालय देगलूर,

ता. देगलूर, जि. नांदेड

त्रयस्थ पक्ष : १)श्री. बंडप्पा शंकर अप्पा गंदीगुडे,

२)मे.बालाजी ट्रेडिंग कं.,

३)मे. व्यंकटेश ट्रेडिंग कं.,

४)श्री. विजय धोडिंबा दाशेटवार व

५ )मे. दमय्या गंगय्या चिद्रावार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०१.२००९ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीच्या भोकर तालुक्याशी संबंधित, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २७.०९.२००८ रोजी माहिती मागितली असता, त्यांनी दिनांक ०८.१०.२००८ रोजी अपिलार्थीस पत्र देऊन माहितीपोटीचे शुल्क रु. १६८०० /- इतकी रक्कम भरण्याचे सूचित करुन अपिलार्थीची दिशाभूल केली. व माहिती देण्यासाठी जाणूनबुजून विलंब केल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भोकर यांच्याकडे प्रथम अपील केले असता, तहसीलदार

भोकर यांनी सुनावणी न घेता प्रथम अपील प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केले आहे.

देगलूर तालुक्याशी संबंधित, अपील क्रमांक १७३/२००९ च्या संदर्भात अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी दिनांक १०.१२.२००८ रोजी सुनावणी घेऊन नियमबाह्य निर्णय दिल्यामुळे त्यानी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), भोकर व देगलूर यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील अनुक्रमे ४ व ५ अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांच्या संदर्भात दिनांक ०१.०४.२००० ते दिनांक ३०.०९.२००८ या कालावधीशी संबंधित विस्तृत प्रमाणात माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास नायब तहसीलदार (पुरवठा), भोकर यांनी दिनांक ०८.१०.२००८ रोजी व नायब तहसीलदार देगलूर यांनी दिनांक १७.१०.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे अनुक्रमे शुल्क रु. १६८००/- व १,११,३६० /- इतके भरण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५.११.२००८ रोजी दोन स्वतंत्र द्वितीय अपिले अनुक्रमे तहसीलदार, भोकर व देगलूर यांच्याकडे सादर केले. तहसीलदार भोकर यांनी या प्रकरणी दिनांक २७.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थी यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा न केल्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळले.

तहसीलदार देगलूर यांनी दिनांक १०.१२.२००८ रोजी अशाच प्रकारचा निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. यानंतर अपिलार्थीची तहसीलदार भोकर यांनी सुनावणी न

घेतल्याचे व तहसीलदार देगलूर यांनी नियमबाह्य निर्णय दिल्याचे त्यांना वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपीले आयोगाकडे सादर केली आहेत.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनीधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीस दोनही प्रकरणी जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत आहे, असे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे का केला नाही, असे विचारले असता त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्क भरण्याच्या पत्रावर पत्रव्यवहार केल्याचे आयोगास अवगत केले. नायब तहसीलदार (पुरवठा), भोकर व देगलूर यांनी असा युक्तिवाद केले की, या प्रकरणी अपिलार्थीने शुल्क न भरल्याचे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क विहित मुदतीत कळवूनही त्यांनी या शुल्काचा भरणा न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाही. वरील दोनही प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी केलेल्या पत्रव्यवहाराचा योग्य तो पुरावा आयोगास सादर केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या दिनांक २७.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), भोकर यांनी दिनांक ०८.१०.२००८ रोजी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क, अधिनियमातील कलम ७ (३)(क) प्रमाणे आवश्यक असलेल्या तपशीलासह कळविले आहे. परंतू अपिलार्थीने या शुल्काचा भरणा करण्याची कधीही तयारी दर्शविली नाही. नायब तहसीलदार (पुरवठा), भोकर यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही तयार असून, ते ही

माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत. हे पाहता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांना अद्यापही या माहितीची जर आवश्यकता असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे रु. १६,८००/- इतक्या रकमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरुन त्यांना अवश्यक असलेली महिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी. सध्य स्थिती अपिलार्थीस आवश्यक ती माहिती नायब तहसीलदार (पुरवठा), भोकर यांच्याकडून प्राप्त न होण्यासाठी तेच जबाबदार असल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. नायब तहसीलदार (पुरवठा), देगलूर यांनी अपिलार्थीस जर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये म्हणजे दिनांक १७.१०.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद दिला असेला तरी या परिस्थितीमध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना देण्यात येणाऱ्या संभाव्य माहितीचा अधिनियमातील कलम ७ (३) (क) मध्ये नमूद केलेला तपशील जोडला नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस नायब तहसीलदार (पुरवठा), देगलूर यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत आहे. सबब नायब तहसीलदार (पुरवठा), देगलूर यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची अपील क्रमांक १६८/२००९ हे फेटाळण्यात येत आहे. आणि अपील क्रमांक १७३/२००९ हे मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील क्रमांक १६८/२००९ फेटाळण्यात येत आहे.

२) अपील क्रमांक १७३/२००९ मान्य करण्यात येत आहे.

३) नायब तहसीलदार (पुरवठा), देगलूर यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस.पी.नैण, द्वारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिरच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, (पुरवठा विभाग), तहसील कार्यालय, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा विभाग),तहसील कार्यालय, देगलूर, ता. देगलूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, ता. देगलूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १६९/२००९, १७०/२००९, १७१/२००९ व १७२/२००९**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६९, १७०, १७१ व १७२

निर्णय दिनांक ११-१२-२००९

१ सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी
व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा
व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे,
सहयोगनगर, नांदेड

**विरुध्द**

| | जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक १६९/२००९<br>जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, कंधार, तालुका<br>कंधार, जिल्हा नांदेड | तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार,<br>तालुका कंधार, जिल्हा नांदेड |
| २ | अपील क्रमांक १७०/२००९<br>जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, हिमायतनगर,<br>तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड | तहसीलदार, तहसील कार्यालय,<br>हिमायतनगर, तालुका हिमायतनगर,<br>जिल्हा नांदेड |

| | | |
|---|---|---|
| ३ | <u>अपील क्रमांक १७१/२००९</u><br>जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, नायगांव, तालुका<br>नायगांव, जिल्हा नांदेड | तहसीलदार, तहसील कार्यालय,<br>नायगांव, तालुका नायगांव, जिल्हा नांदेड |
| ४ | <u>अपील क्रमांक १७२/२००९</u><br>जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, मुखेड, तालुका<br>मुखेड, जिल्हा नांदेड | तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड,<br>तालुका मुखेड, जिल्हा नांदेड |

| | |
|---|---|
| त्रयस्थ पक्ष :<br>अपील क्रमांक १६९/०९ | १. श्री. मधुकर महाजन,<br>२. श्री. प्रल्हाद बोरलेपवार,<br>३. मे. व्यंकटी बोरलेपवार,<br>४. श्री. लतीफ खान इब्राहिम खान,<br>५. श्री. माधव बिवडे |
| त्रयस्थ पक्ष :<br>अपील क्रमांक १७०/०९ | १. श्री. संतोष शेषराव शिंदे,<br>२. श्री. शंकरराव पळशीकर<br>केरोसीन पंप |
| त्रयस्थ पक्ष :<br>अपील क्रमांक १७१/०९ | १. मे. उत्तम बसवंत कवटीवार,<br>२. श्री. अब्दुल वाहेद रहमतुल्ला,<br>३. मे. माधव सिताराम मेडेवार,<br>४. श्री. साईबाबा ट्रेडिंग कं. |

५. श्रीराम पंढरीनाथ चिद्रावार

| | |
|---|---|
| त्रयस्थ पक्ष : | १. श्री. लक्ष्मीकांत बालाजी चौधरी, |
| अपील क्रमांक १७२/०९ | २. श्री. नंदकुमार माधवराव मडगुलवार, |
| | ३. श्री. उत्तम किशन कालीदवार, |
| | ४. श्री. दिपक गणपतराव प्रेमलवाड, |
| | ५. श्री. बाबुअप्पा राजप्पा गंदीगुडे |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी नोंदविलेली चार व्दितीय स्वतंत्र अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक ११-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, अपील क्रमांक १६९/२००९ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत. अपील क्रमांक १७०/२००९ शी संबंधित जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत. अपील क्रमांक १७१/२००९ शी संबंधित जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत. अपील क्रमांक १७२/२००९ शी संबंधित जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेली त्यांची दिनांक ११-१२-२००९ रोजीची चार पत्रे आयोगास सादर केली असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता संपूर्ण

माहिती प्राप्त  झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही त्यामुळे ते त्यांची विचाराधीन अपिले क्रमांक १६९/२००९, १७०/२००९, १७१/२००९ व १७२/२००९ ही स्वखुषीने मागे घेत आहेत.  या पत्रामध्ये अखेरीस अपिलार्थीने ही सर्व अपिले रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांची आयोगाकडे केलेली विचाराधीन चार व्दितीय अपिले आता मागे घेतली असल्याने व ती रद्द करण्याची विनंती केली असल्याने अपिलार्थीची विचाराधीन चारही अपिले खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १६९/२००९, १७०/२००९, १७१/२००९ व १७२/२००९ ही खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कंधार, तालुका कंधार,

जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नायगांव, तालुका नायगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव, तालुका नायगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१७४

निर्णय दिनांक ११-१२-२००९

१ सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी
व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व
विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माहूर,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : १. श्री. बाबुलाल तेजीलाल जयस्वाल
२. श्री. बरकत अली अ. हुसेन

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मिळविण्यासाठी नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील

कार्यालय, माहूर यांच्याकडे दिनांक २७-०९-२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टामार्फत अर्ज पाठवून दिला असता त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी तहसीलदार, माहूर यांच्याकडे दिनांक ०५-११-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि तहसीलदार, माहूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०९-२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहूर तालुक्यातील दोन अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. बाबुलाल जैस्वाल व श्री. हुसेन यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून झालेल्या रॉकेल पुरवठ्यासंदर्भात आणि त्या रॉकेलच्या त्यांनी विक्री केल्यासंदर्भात दिनांक ०१-०४-२००० ते ३०-०९-२००८ या कालावधीशी संबंधित नोंदणीकृत टपालाव्दारे माहिती मागविली होती.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जरी त्यांनी जन माहिती अधिकारी

यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने प्रथम अर्ज केला होता असे नमूद केले असले तरीही, यासंदर्भात आवश्यक तो सबळ पुरावा त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. आज रोजी सुनावणीसाठी सर्व संबंधित गैरहजर आहेत, त्यामुळे मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे प्रथम अर्ज व प्रथम अपील दाखल केले होते किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे असे की, आयोगासमोर युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. या सर्व बाबी एकत्रित पाहता, अपिलार्थीस माहिती मिळविण्यामध्ये स्वारस्य नसावे असे दिसून येते. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १७५/२००९, १७६/२००९, १७७/२००९, १७८/२००९, १७९/२००९ व १८०/२००९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१७५, १७६, १७७, १७८, १७९ व १८०

निर्णय दिनांक ११-१२-२००९

१ सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी
व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा
व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे,
सहयोगनगर, नांदेड

**विरुध्द**

१ अपील क्रमांक १७५/२००९

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण मुखेड परिक्षेत्र, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड |

२ अपील क्रमांक १७६/२००९

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण किनवट परिक्षेत्र, किनवट, तालुका किनवट , जिल्हा नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड |

३ <u>अपील क्रमांक १७७/२००९</u>

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>तथा लागवड अधिकारी, सामाजिक<br>वनीकरण बिलोली परिक्षेत्र, बिलोली,<br>तालुका बिलोली, जिल्हा नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा उप<br>संचालक, सामाजिक वनीकरण विभाग,<br>नांदेड |

४ <u>अपील क्रमांक १७८/२००९</u>

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>तथा लागवड अधिकारी, सामाजिक<br>वनीकरण भोकर परिक्षेत्र, भोकर,<br>तालुका भोकर, जिल्हा नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा उप<br>संचालक, सामाजिक वनीकरण विभाग,<br>नांदेड |

५ <u>अपील क्रमांक १७९/२००९</u>

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>तथा लागवड अधिकारी, सामाजिक<br>वनीकरण हदगांव परिक्षेत्र, हदगांव,<br>तालुका हदगांव, जिल्हा नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा उप<br>संचालक, सामाजिक वनीकरण विभाग,<br>नांदेड |

६ <u>अपील क्रमांक १८०/२००९</u>

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>तथा लागवड अधिकारी, सामाजिक<br>वनीकरण देगलूर परिक्षेत्र, देगलूर,<br>तालुका देगलूर, जिल्हा नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा उप<br>संचालक, सामाजिक वनीकरण विभाग,<br>नांदेड |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी नोंदविलेली सहा स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

अपिलार्थीने ही सहाही व्दितीय अपिले जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांची प्रथम अपिले प्रलंबीत ठेवल्यामुळे, नियमबाह्य निर्णय दिल्यामुळे व जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करुनही त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्यामुळे अशा विविध कारणास्तव एकाच दिवशी केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या सर्व प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०९-२००८ रोजीच्या सहा स्वतंत्र अर्जाव्दारे लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, मुखेड, किनवट, बिलोली, भोकर, हदगांव व देगलूर यांच्या कार्यक्षेत्रातील एकसारखीच माहिती मागविली होती. अपिलार्थीने सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी सन २००१ ते २००८-०९ असा होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या कामांची यादी, कामावर उपस्थित असलेल्या मजुरांच्या हजेरीपत्रकाची सत्यप्रत, कोणत्या योजनेअंतर्गत या मजुरांना रोख रक्कम देण्यात आली व अन्नधान्य किती प्रमाणात वाटप करण्यात आले, अन्नधान्य वाटप केलेल्या रजिस्टरच्या सत्यप्रती, वाटप करणा-या स्वस्त धान्य दुकानाची यादी, शिधापत्रिकाची सत्यप्रत, मजुरांच्या पेशीटच्या सत्यप्रती, एम. बी. रेकॉर्डच्या सत्यप्रती, विभागीय कार्यालयातर्फे देण्यात आलेल्या एम. बी. व विभागीय कार्यालयास दाखल केल्या त्याच्या सत्यप्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, मुखेड, किनवट, भोकर व देगलूर यांनी अनुक्रमे दिनांक ११-१०-२००८, ३०-०९-२००८, २०-१०-२००८ व

दिनांक १३-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला. यापैकी लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, मुखेड यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे आवश्यक शुल्क कळवून प्रतिपृष्ठ रुपये २ याप्रमाणे अपिलार्थीस शुल्क भरण्याचे कळविले. लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, किनवट यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविली, लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, भोकर यांनी दिनांक २०-१०-२००८ रोजी अपिलार्थीस प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६,५०० इतके चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, देगलूर यांनी अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-११-२००८ रोजी लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, मुखेड यांच्याशी संबंधित माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर दिनांक १०-११-२००८ रोजी व उर्वरित पाच लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र यांच्याशी संबधित प्रथम अर्जावर दि. ०५-११-२००८ रोजी पाच स्वतंत्र अपिले केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जांपैकी बिलोली व हदगांवशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी यासंदर्भात सुनावणी घेतली असल्याचे आढळून येत नाही. लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, मुखेड च्या संदर्भात अपिलार्थीस माहिती पुरविली असल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील खारीज केले. सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, किनवटच्या संदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी यांनी माहिती न दिल्याचा निष्कर्ष जन अपिलीय अधिकारी यांनी काढून त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कार्यवाही आदेशित व्हावी असे अभिप्राय नोंदवले. लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, भोकर संदर्भात अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी माहिती मिळाल्याचे मान्य केले असल्याने अपील खारीज केले. लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र,

देगलूर यांनी दिनांक १३-१०-२००८ रोजी माहिती पुरविल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे अपील खारीज केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयांनी व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची एकत्रीत सुनावणी आज दिनांक ११-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी, अपील क्रमांक १७५/२००९, १७६/२००९, १७८/२००९ व १८०/२००९ शी संबंधित जन माहिती अधिकारी हजर व अपील क्रमांक १७७/२००९ व १७९/२००९ शी संबंधित जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. या सहाही प्रकरणाशी संबंधित अपिलार्थी गैरहजर आहेत. सर्व उपस्थित जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

सुनावणीच्या वेळी लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, मुखेड यांनी अपिलार्थीस दिनांक ११-१०-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविल्याचे आयोगास आढळून येत आहे. लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, किनवट यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०९-२००८ रोजी माहिती दिल्याचे नमूद केले आहे. लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र,बिलोली व हदगांव हे आज रोजी सुनावणीसाठी गैरहजर आहेत. लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, भोकर यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिनांक २०-१०-२००८ रोजी पुरवून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६,५०० इतके भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, देगलूर यांनी अपिलार्थीस दिनांक १३-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती पुरविली परंतु मस्टर, मोजमाप पुस्तिकाच्या सत्यप्रती दिलेल्या नाहीत असे आयोगास आढळून आले आहे.

वरील घटनाक्रम, सर्व उपस्थितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, मुखेड व लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, भोकर यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्याचे कळविले आहे. परंतु या शुल्काचा भरणा करण्याची तयारी अपिलार्थीने या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कधीही दर्शविली नसल्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे स्पष्ट होत आहे. सबब अपील क्रमांक १७५/२००९ व १७८/२००९ फेटाळण्यात येत आहेत. अपील क्रमांक १७७/२००९ व १७९/२००९ च्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर तीस दिवसाच्या आत सुनावणी घेण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. त्यामुळे अपिलार्थीचे अपील क्रमांक १७७/२००९ व १७९/२००९ निकाली काढण्यात येत आहेत. लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, किनवट यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती योग्य प्रकारे पुरविली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यामुळे लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, किनवट यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती व लागवड अधिकारी देगलूर यांनी त्यांना मूळ अर्जातील उर्वरित माहिती (मोजमाप पुस्तिकेच्या व हजेरी पत्रकाच्या प्रती) हे आदेश निर्गमत होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

या सर्व प्रकरणांमध्ये लागवड अधिकारी सामाजिक वनीकरण किनवट यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या, त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्या प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची संचालक सामाजिक वनीकरण यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक १७५/२००९ व १७८/२००९ फेटाळण्यात येत आहेत.

२. अपील क्रमांक १७७/२००९ व १७९/२००९ निकाली काढण्यात येत आहेत.

३. अपील क्रमांक १७६/२००९ व १८०/२००९ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण, नांदेड विभाग, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपील क्रमांक १७७/०९ व १७९/०९ शी संबंधित अपिलार्थीच्या दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

५. जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, किनवट यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

६. जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, देगलूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती (हजेरीपत्रक व मोजमाप पुस्तिकेच्या प्रती ) त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

७. संचालक, सामाजिक वनीकरण यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, किनवट यांचेवर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ११-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण मुखेड परिक्षेत्र, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण किनवट परिक्षेत्र, किनवट, तालुका किनवट , जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण बिलोली परिक्षेत्र, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण भोकर परिक्षेत्र, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण हदगांव परिक्षेत्र, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण देगलूर परिक्षेत्र, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ संचालक सामाजिक वनीकरण, शिवाजी कॉलेजजवळ एन-४, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०८४
निर्णय दिनांकः १४-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. सौ. एस.पी.नैण,<br>रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधिष्ठाता,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नांदेड यांच्याकडे दि. ०१.०७.२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज केला असता, मुदतीच्या आत व मुदतीच्या नंतरही त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नांदेड यांच्याकडे दि.०९.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी, विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत दि.०१.०४.२००५ ते दि.३१.०३.२००८ या कालावधीमध्ये खरेदी केलेल्या साहित्याच्या आणि या कालावधीत केल्या गेलेल्या छपाई कामाच्यासंदर्भात नोंदणीकृत टपालाद्वारे काही मागितली होती.

अपिलार्थीच्या या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १७,०००/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे न करता त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२७.१०.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर राहिल्यामुळे त्यांचे या अपिलासंदर्भात काहीही म्हणणे नाही, असा जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेऊन अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज निकाली काढला. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांनी घेतलेल्या निर्णयाची प्रत अपिलार्थीस दिली नाही. त्यामुळे अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील प्रलंबित ठेवले असे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क आवश्यक त्या तपशीलासह कळविले होते. तथापि या

शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात न केल्यामुळे ते अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क पुरविण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जरी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत माहिती मागविली असली तरीही, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्याची तयारी त्यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर कधीही दर्शविली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे अर्जदारास त्यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देण्यासंदर्भात निर्णय घेणे, हे कर्तव्य असते, त्याचप्रमाणे अर्जदाराचे देखील त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती यांनी सूचित केल्याप्रमाणे भरणा करणे, तितकेच महत्त्वाचे कर्तव्य आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार त्यांचे कर्तव्य पार पाडले आहे परंतु अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (५) च्या तरतुदीमधील आपल्या या कर्तव्याचा विसर पडल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक: १४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. सौ. एस.पी.नैण, व्दारा-मुख्य कार्यालय, अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे,सहयोगनगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०८५
निर्णय दिनांकः १४-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दिलीप रामभाऊ वाघ व इतर<br>औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका उपनिबंधक सहकारी संस्था,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,<br>औरंगाबाद | | |

त्रयस्थ पक्ष : सचिव, संत कबीर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, कांचनवाडी, औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, सदर अपील त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निकालाच्या विरोधात केले असून या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व आयोगास असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ विचारात न घेता निर्णय दिल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे संत कबीर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पतसंस्था मर्यादित नक्षत्रवाडी या पतसंस्थेशी संबंधित मे, १९९५ ते फेब्रुवारी,२००८ या कालावधीची काही माहिती एकूण ७ मुद्यांद्वारे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१,२ व ४ च्या संदर्भात माहिती अपिलार्थीस पुरवून व उर्वरित चार मुद्यांवरील माहिती संस्थेच्या सचिवांकडून प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारे प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.३०.०४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले आणि अपिलार्थीस उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचविले. तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली त्यांना संबंधित पतसंस्थेने तालुका उपनिबंधक सहकारी संस्था,औरंगाबाद यांच्या आदेशाप्रमाणे पूर्णपणे दिली नसून त्यांना पात्र झालेली माहिती ही अपूर्ण आहे. त्यांना तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबादकडून प्राप्त झालेली माहिती पूर्णपणे खोटी आहे व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस दि. १२.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२ व ४ या तीन मुद्यांशी संबंधित माहिती विनामूल्य पुरविली आहे व उर्वरित मुद्यांवरील माहिती संबंधित पतसंस्थेकडून प्राप्त करुन घेऊन ती, प्रमाणित करुन घेऊन अपिलार्थीस दि. २९.०८.२००८ रोजी पुरविली आहे. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचा इन्कार करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २९.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने ज्या पतसंस्थेशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे, त्या पतसंस्थाना माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही, अशा अर्थाचा मा.उच्च न्यायालय,मुंबईच्या नागपूर खंडपीठाने दि. १३.०१.२००९ रोजी रिट याचिका क्र.५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूरच्या संदर्भात निर्णय दिलेला आहे. त्यामुळे अपिलार्थीस आता संबंधित पतसंस्था ही तालुका उपनिबंधक,औरंगाबाद यांच्याकडे जी माहिती उपलब्ध करुन देईल, ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांच्याकडे तयार असेल. या प्रकरणी तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद यांनी दि. २९.०८.२००८ रोजी पाठविलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. सबब तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अद्यापपावेतो त्यांनी संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावयाची राहिलेली उर्वरित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी व प्राप्त माहितीवर जर अपिलार्थीचे काही आक्षेप असतील तर त्या आक्षेपांचे निराकरण त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार

सहकार विभागातील सक्षम प्राधिकरणाच्या स्तरावर करावे, असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे.

मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे, त्या त्रयस्थ पक्षास माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही, त्यामुळे तालुका उपनिबंधकास संबंधित त्रयस्थ पक्षाकडून ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध होईल,त्या स्वरुपात अपिलार्थीस देणे भाग आहे. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद यांनी हेतूपुरस्सर टाळाटाळ केली असे मानता येणार नाही. परिणामी अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये आयोगास विनंती केल्याप्रमाणे तालुका उपनिबंधक यांना शास्ती अथवा त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्याची कारवाई करणे आयोग योग्य समजत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संबंधित संस्थेकडून अद्यापपावेतो प्राप्त करुन घ्यावयाची उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी

**औरंगाबाद**
**दिनांकः १४-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. दिलीप रामभाऊ वाघ, एन-११,पाटणी अपार्टमेंट (बी-४), मयूरनगर,हडको, औरंगाबाद (नवीन पत्ता)

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२३१
निर्णय दिनांक १४/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,<br>रा. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>सना उर्दू प्राथमिक शाळा, नोमानियानगर,<br>तरोडा बु., ता.जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०१.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२४.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ५० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

७) श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, रा. मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड, ता.जि. नांदेड.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२३२
निर्णय दिनांक १४/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,<br>रा. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>सना उर्दू हायस्कूल, नोमानियानगर,<br>तरोडा बु., ता.जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४.०८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०५.०१.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२४.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक

असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ५० दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, रा. मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड, ता.जि. नांदेड.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२३३
निर्णय दिनांक १४/१२/२००९

१ श्री. राजेंद्र लक्ष्मण पवार, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक संचालक,
नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक संचालक,
नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

श्री. राजेंद्र लक्ष्मण पवार यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०६.०१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि.०७.०७.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२१.०८.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा १५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र लक्ष्मण पवार, गारखेडा गांव, हनुमान मंदिराच्या बाजुला, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०८६
निर्णय दिनांक १४/१२/२००९

१ श्री. माधवराव हरिबा सुरनर, : अपिलार्थी
रा. उदगीर, जि. लातूर

**विरुध्द**

१ शाखाधिकारी, : प्रतिवादी
उस्मानाबाद जनता सहकारी बँक लि.,
शाखा उदगीर, जि. लातूर
२ उस्मानाबाद जनता सहकारी बँक लि., उस्मानाबाद,
जि. उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक २२.०७.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे शाखाधिकारी, उस्मानाबाद जनता सहकारी बँक लि., शाखा उदगीर यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर अर्जास शाखाधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २६.११.२००८ रोजी उस्मानाबाद जनता सहकारी बँक लि., उस्मानाबाद येथे प्रथम अपील केले. या प्रथम अपील अर्जास अनुसरुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या दि. १७.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती अधिकार अधिनियम, २००५ त्यांच्या बँकेस लागू होत नसल्याबाबत अपिलार्थीस कळविले. परंतु या प्रतिसादाने समाधान न झाल्याने व हवी असलेली माहिती न मिळाल्याने

अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित व बँकेचे संबंधित अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित अपिलार्थी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने "नियंत्रण" व "वित्तिय सहाय्य" या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.

अशाप्रकारे मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ संबंधित बँकेस लागू होत नसल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०८६ /०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. माधवराव हरिबा सुरनर, ‘हरिकृपा’ निवास, शास्त्रीनगर, उदगीर, ता.उदगीर, जि. लातूर

२. शाखाधिकारी, उस्मानाबाद जनता सहकारी बँक लि., शाखा उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर.

३. उस्मानाबाद जनता सहकारी बँक लि., उस्मानाबाद, ता.जि. उस्मानाबाद.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०८७
निर्णय दिनांक १४/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. लक्ष्मण शिवराम पाटील,<br>रा. नवापूर, जि. नंदुरबार | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ चेअरमन / सरव्यवस्थापक,<br>श्री. पी.के. अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि.,<br>तळोदा रोड, नंदुरबार<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, नंदुरबार | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०८.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक १२.०५.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे चेअरमन / सरव्यवस्थापक, श्री. पी.के.अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि., नंदुरबार यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर अर्जास संबंधित बँकेकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २३.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जासंदर्भात दि. २७.०६.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील मान्य

करुन, अपिलार्थीस विनाविलंब सशुल्क माहिती पुरविण्याबाबत संबंधित बँकेच्या सरव्यवस्थापकांना आदेशित केले. परंतु यानंतरही माहिती न मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, बँकेचे संबंधित अधिकारी व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी, बँक अधिकारी व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार यांच्या असे निदर्शनास आणण्यात येत आहे की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे.

अशाप्रकारे मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ संबंधित बँकेस लागू होत नसल्याने, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार यांचे दि. २७.०६.२००८ रोजीचे आदेश अधिक्रमित करुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०८७ /०८ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लक्ष्मण शिवराम पाटील, माजी सैनिक, १० गुरुकुंज, मंगलदास पार्क, नवापूर, ता. नवापूर, जि. नंदुरबार.

२. चेअरमन / सरव्यवस्थापक, श्री. पी.के. अण्णा पाटील जनता सहकारी बँक लि., तळोदा रोड, नंदुरबार.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार, जि.नंदुरबार.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०८८
निर्णय दिनांक १४/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विवेकानंद रामराव वाघ,<br>रा. नांदुरघाट, ता.केज, जि. बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>चेअरमन,<br>शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, केज,<br>ता.केज, जि. बीड | : | प्रतिवादी |
| १ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक निबंधक,<br>सहकारी संस्था, केज, जि. बीड | : | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ०१.०४.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे चेअरमन, शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, केज यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली होती. सदर पतसंस्थेने अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपिलार्थीने सहायक निबंधक, सहकारी संस्था, केज, जि. बीड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०२.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल

केले. सदर अपिलावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, तालुका केज यांनी दि१२.०६.२००८ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस हवी असलेली माहिती १५ दिवसांत उपलब्ध करुन देणेबाबत पतसंस्थेच्या सचिवांना आदेशित केले. यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, पतसंस्थेचे अधिकारी व सहायक निबंधक, सहकारी संस्था, केज, जि.बीड हे सर्वजण उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी, पतसंस्थेचे अधिकारी व सहायक निबंधक, सहकारी संस्था, केज, जि.बीड यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप.बँक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी निर्णय दिला आहे. या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने “नियंत्रण” व “वित्तिय सहाय्य” या मुद्यावर सखोल विवेचन करुन माहिती अधिकार अधिनियम नागरी सहकारी बँकांना लागू नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. हेच विवेचन सहकारी पतसंस्थांना देखील लावल्यास असे दिसून येते की, सहकारी पतसंस्थांना देखील शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नाही व या पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष नियंत्रण नसल्याने माहिती अधिकार अधिनियम-२००५ आता मा.उच्च न्यायालयाच्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेस लागू होणार नाही. त्यामुळे सहायक निबंधक, सहकारी संस्था, केज, जि. बीड यांचे आदेश क्र. २३०/०८/सनिके/मा.अ./अपील/सुनावणी/०८, दि.१२.०६.२००८ हे रद्द करण्यात येत आहेत. तथापि अपिलार्थीस ते या पतसंस्थेचे सदस्य असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था

अधिनियम, १९६० मधील कलम ३२ नुसार संबंधित पतसंस्थेकडे आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रतींची मागणी करता येईल.

या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. २०८८ /०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**
अपील क्र. २०८८/०८

प्रत,

१. श्री. विवेकांनद रामराव वाघ, मु.पो. नांदुरघाट, ता.केज, जि. बीड.

२. चेअरमन, शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, केज, ता.केज, जि. बीड.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, केज, ता.केज, जि. बीड

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक २०७७/२००८, २०७८/२००८ व २०७९/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०७७, २०७८ व २०७९

निर्णय दिनांक १४-१२-२००९

१ सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी
व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा
व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे,
सहयोगनगर, नांदेड

**विरुध्द**

| | जन माहिती अधिकारी | जन अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक २०७७/२००८<br>जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, नांदेड, जिल्हा<br>नांदेड | तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड,<br>जिल्हा नांदेड |
| २ | अपील क्रमांक २०७८/२००८<br>जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, लोहा, तालुका<br>लोहा, जिल्हा नांदेड | तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा,<br>तालुका लोहा, जिल्हा नांदेड |

| | | |
|---|---|---|
| २ | <u>अपील क्रमांक २०७९/२००८</u><br>जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, बिलोली, तालुका<br>बिलोली, जिल्हा नांदेड | तहसीलदार, तहसील कार्यालय,<br>बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड |
| | त्रयस्थ पक्ष :<br>अपील क्रमांक २०७८/२००८ | १. श्री. दिगांबर व्यंकन्ना दमकोंडवार,<br>२. श्री. बालाजी नरहरी वाट्टमवार,<br>३. श्री. बालाजी गंगाधर कटकमवार<br>४. श्री. शरद नागनाथ रुद्रकंठवार कलंबर |
| | त्रयस्थ पक्ष :<br>अपील क्रमांक २०७९/२००८ | १. श्री. व्यंकटेश हनमलु कुंचनवार,<br>२. श्री. बसवंत महादप्पा बामने,<br>३. श्री. गंगाधर नागनाथ महाजन,<br>४. श्री. दिगांबर माणिकराव लोकमनवार,<br>५. श्री. अरुण बापुराव लोकमनवार,<br>६. मे. व्यंकटेश ट्रेडिंग कं. |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१२-२००८ रोजी नोंदविलेली तीन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १४-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, अपील क्रमांक २०७७/२००८, २०७८/२००८ व २०७९/२००८ शी संबंधित जन माहिती अधिकारी व अपील क्रमांक २०७८/२००८ व २०७९/२००८ शी संबंधित त्रयस्थ पक्ष हजर आणि या तीनही प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांची आयोगास उद्देशून लिहिलेली दिनांक ०३-१२-२००९, दिनांक १४-०२-२००९ व दिनांक ०९-१२-२००९ अशी तीन स्वतंत्र पत्रे आयोगास सादर केली असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आता प्राप्त झाली असून यासंदर्भात त्यांची आता कोणतीही तक्रार राहिलेली नाही. तसेच पूर्ण माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्या विचाराधीन अपिले स्वखुषीने मागे घेत आहेत आणि या पत्रांच्या अखेरीस त्यांनी आयोगास विचाराधीन अपिले रद्द करण्याची विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांची आयोगाकडे केलेली विचाराधीन तीनही व्दितीय अपिले आता मागे घेतली असल्याने व ती रद्द करण्याची विनंती केली असल्याने अपिलार्थीची विचाराधीन तीनही व्दितीय अपिले खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक २०७७/२००८, २०७८/२००८ व २०७९/२००८, दिनांक २२-१२-२००८ ही खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, व्दारा मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०८०

निर्णय दिनांक १४-१२-२००९

१ सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी

व्दारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, कै. नारायणराव चिद्रावार गर्ल्स उर्दू प्राथमिक शाळा, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मुख्याध्यापक, कै. नारायणराव चिद्रावार गर्ल्स उर्दू प्राथमिक शाळा, देगलूर, यांच्याकडे दिनांक २२-०७-२००८ रोजी पोस्टामार्फत अर्ज पाठवून दिला असता त्यांना मुख्याध्यापकाने माहिती दिली नाही त्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,

नांदेड यांच्याकडे दिनांक १९-०९-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु संबंधित अपिलेट अधिका-याने त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी हजर आणि जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थीच्या प्रतिनिधीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक २२-०७-२००८ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना मूळात प्राप्त झाला नसल्यामुळे ते अपिलार्थीला कोणतीही माहिती पुरवू शकले नाहीत. तथापि अपिलार्थीने त्यांच्याकडे नव्याने अर्ज केल्यास ते अपिलार्थीस माहिती पुरवतील. यावर अपिलार्थीच्या प्रतिनिधीस आयोगाने त्यांनी मुख्याध्यापक, कै. नारायणराव चिद्रावार गर्ल्स उर्दू प्राथमिक शाळा, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना अर्ज केल्यासंदर्भात काही पुरावा आहे काय असे विचारले असता, त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केल्याचा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे व त्यांनी मूळ अर्ज मुख्याध्यापकाला पाठविल्याबाबतचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम व वरील वस्तुस्थिती पाहता या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज केलेला नाही, हे सिध्द होत आहे. त्यामुळे अपिलार्थीस आता आवश्यक माहितीसाठी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडे माहितीसाठी परत नव्याने अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी त्यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कै.

नारायणराव चिद्रावार गर्ल्स उर्दू प्राथमिक शाळा, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांच्याकडे परत नव्याने अर्ज करुन त्याची पोच जपून ठेवावी. या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ केला असल्याचा कोणताही कागदोपत्री पुरावा अपिलार्थीचे प्रतिनिधी आयोगास दाखवू न शकल्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती न मागताच शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड व राज्य माहिती आयोग, औरंगाबाद यांच्याकडे अनुकमे प्रथम व व्दितीय अपील केल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीची आयोगाकडे द्वितिय अपील करण्याची ही पध्दती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींना पूर्ण छेद देणारी आहे, त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, व्दारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कै. नारायणराव चिद्रावार गर्ल्स उर्दू प्राथमिक शाळा, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०८१

निर्णय दिनांक १४-१२-२००९

१ सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी
व्दारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व
विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, उर्दू प्राथमिक शाळा, पाण्याच्या
टाकीजवळ, चौफाळा, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मुख्याध्यापक, उर्दू प्राथमिक शाळा, चौफाळा, नांदेड यांच्याकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी पोस्टामार्फत अर्ज पाठवून दिला असता त्यांना मुख्याध्यापकाने माहिती

दिली नाही. त्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १८-०९-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु संबंधित अपिलेट अधिका-याने त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केल्यासंदर्भातील कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १८-०९-२००८ रोजी प्रथम अपील केल्याचा पुरावा आयोगास सादर केला आहे. यापूर्वीच्या अपिलार्थीच्या अपील क्रमांक २०८०/२००८ च्या सुनावणीच्या संदर्भात आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज न करता सरळ जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील व तदनंतर आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. असाच प्रकार या अपिलासंदर्भात घडला आहे. त्यावेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज केल्याचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपील क्रमांक २०८०/२००८ बाबत जो प्रकार घडला आहे तोच प्रकार विचाराधीन अपिलाच्या संदर्भात घडला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. आयोगासमोर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी मूळात प्रथम अर्ज केला आहे हे सिध्द करण्यासाठी, अपिलार्थी किंवा त्यांचे प्रतिनिधी अथवा इतर कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे आवश्यक त्या

पुराव्याअभावी आणि कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, व्दारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, उर्दू प्राथमिक शाळा, पाण्याच्या टाकीजवळ, चौफाळा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०८२

निर्णय दिनांक १४-१२-२००९

१ सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी
व्दारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व
विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक,
मिल्लीया उर्दू प्राथमिक शाळा, निजाम कॉलनी, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मुख्याध्यापक, मिल्लीया उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांच्याकडे दिनांक ०८-०७-२००८ रोजी पोस्टामार्फत अर्ज पाठवून दिला असता त्यांना मुख्याध्यापकाने माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे

दिनांक १६-०९-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु संबंधित अपिलेट अधिका-याने त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केल्यासंदर्भातील कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १६-०९-२००८ रोजी प्रथम अपील केल्याचा पुरावा आयोगास सादर केला आहे. यापूर्वीच्या अपिलार्थीच्या अपील क्रमांक २०८०/२००८ च्या सुनावणीच्या संदर्भात आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज न करता सरळ जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील व तदनंतर आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. असाच प्रकार या अपिलासंदर्भात घडला आहे. त्यावेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज केल्याचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपील क्रमांक २०८०/२००८ बाबत जो प्रकार घडला आहे तोच प्रकार विचाराधीन अपिलाच्या संदर्भात घडला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. आयोगासमोर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी मूळात प्रथम अर्ज केला आहे हे सिध्द करण्यासाठी, अपिलार्थी किंवा त्यांचे प्रतिनिधी अथवा इतर कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे आवश्यक त्या पुराव्याअभावी आणि कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे व संबंधीतांच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीचे

विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, व्दारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मिल्लीया उर्दू प्राथमिक शाळा, निजाम कॉलनी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०८३

निर्णय दिनांक १४-१२-२००९

१ सौ. एस. पी. नैण, : अपिलार्थी
व्दारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व
विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक,
सरदार वल्लभभाई पटेल माध्यमिक शाळा, मुदखेड,
तालुका मुदखेड, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मुख्याध्यापक, सरदार वल्लभभाई पटेल माध्यमिक शाळा, मुदखेड,

तालुका मुदखेड, नांदेड यांच्याकडे दिनांक ०४-०७-२००८ रोजी पोस्टामार्फत अर्ज पाठवून दिला असता त्यांना मुख्याध्यापकाने माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक),

जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १६-०९-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु संबंधित अपिलेट अधिका-याने त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केल्यासंदर्भातील कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १६-०९-२००८ रोजी प्रथम अपील केल्याचा पुरावा आयोगास सादर केला आहे. यापूर्वीच्या अपिलार्थीच्या अपील क्रमांक २०८०/२००८ च्या सुनावणीच्या संदर्भात आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज न करता सरळ जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील व तदनंतर आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. असाच प्रकार या अपिलासंदर्भात घडला आहे. त्यावेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज केल्याचा कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपील क्रमांक २०८०/२००८ बाबत जो प्रकार घडला आहे तोच प्रकार विचाराधीन अपिलाच्या संदर्भात घडला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. आयोगासमोर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी मूळात प्रथम अर्ज केला आहे हे सिध्द करण्यासाठी, अपिलार्थी किंवा

त्यांचे प्रतिनिधी अथवा इतर कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे आवश्यक त्या पुराव्याअभावी आणि कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १४-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. एस. पी. नैण, व्दारा, मुख्य कार्यालय अखिल भारतीय महिला सुरक्षा व विकास महासंघ, शिवमंदिराच्या पाठीमागे, सहयोगनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सरदार वल्लभभाई पटेल माध्यमिक शाळा, मुदखेड, तालुका मुदखेड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०३१

निर्णय दिनांक : १५.१२.२००९

१ श्री. फुलपगार नारायण सिताराम, : अपिलार्थी
मु.पो. किल्ले धारुर, ता. धारुर, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, किल्ले धारुर, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, किल्ले धारुर, जि. बीड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : लिपिक,
नगर परिषद कार्यालय, किल्ले धारुर,
जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जनावरांचे कत्तलखाने बसविणे व त्यावरील नियंत्रणे इत्यादी संदर्भात शासनाने पारित केलेल्या निर्णयांच्या प्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"जनावरांचे कत्तलखाने बसविणे, स्थलांतर व त्यावरील नियंत्रणे व कत्तलखान्यावरील निर्बंध तसेच वस्ती पासून किती किलोमीटर पर्यंत कत्तलखाने बसविण्यात येतात याबाबतचे शासन निर्णय इत्यादी शासन निर्णय देण्यात यावेत".

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन जनावरांचे कत्तलखाने बसविणे व त्यावरील नियंत्रण व निर्बंधाबाबतचे व वस्तीपासून किती किलोमीटर पर्यंत अंतर असावे याबाबतचे शासन निर्णय त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपलिार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०४.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४.११.२००८ रोजी सुनावणी घेऊन त्यावरील आपले आदेश एक वर्ष पाच दिवस इतक्या विलंबाने पारित केल आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे सदरचे आदेश म्हणजे त्यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दिनांक १९.११.२००९ रोजीचे एक पत्र असून, या पत्रामध्ये नगर परिषदचे कामकाज ज्या अधिनियमाद्वारे चालत आहे ते पुस्तक अपिलार्थीस समक्ष दाखविल्याचे अपिलार्थीस अवगत केले आहे व अपिलार्थीस मुदतीत प्रतिसाद देऊन माहिती दिल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याचे कारण दर्शवून वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे, असे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही किंबहुना शासनाने नगरपरिषदेच्या क्षेत्रामध्ये कत्तलखाने हे वस्तीपासून किती किलोमीटर अंतरावर असावेत, या संदर्भात कोणतेही आदेश आजतागायत पारित केलेले नाहीत. कत्तलखान्याच्या बाबतीत नगर परिषदेचा कारभार हा महाराष्ट्र नगर परिषद, ग्रामपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम २६६, २६८, २६९, २७०, व २७३ मधील तरतुदीनुसार केला जातो. या तरतुदी त्यांनी अपिलार्थीस दाखविलेल्या आहेत. त्यामुळे अपिलार्थीस आता वेगळ्याने माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या स्वरुपात उपलब्ध नाही. परंतु या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचा नियमित कारभार हा महाराष्ट्र नगर परिषद, ग्रामपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम २६६, २६८, २६९, २७० व २७३ मधील तरतुदीनुसार चालत असतो, असे त्यांनी आयोगास अवगत केले आहे. तेव्हा अपिलार्थीस हे नियम माहित होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम, १९६५ मधील कलम २६६,२६८,२६९,२७० व २७३ च्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. जेणेकरुन अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होऊ शकते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम, १९६५ मधील कलम २६६, २६८, २६९, २७० व २७३ च्या प्रती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५.१२.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. फुलपगार नारायण सिताराम, मु.पो. किल्ले धारुर, ता. धारुर, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा लिपिक, नगर परिषद कार्यालय, किल्ले धारुर, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, किल्ले धारुर, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०३२
निर्णय दिनांकः १५-१२-२००९

१. श्री. ठकाराम जनार्धन सुरासे, : अपिलार्थी
रा. तलवाडा, ता.गेवराई, जि.बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग, गेवराई, जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
बीड.

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य  माहिती आयोगाकडे दि.३०.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना सहायक अभियंता यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली व खरी माहिती असल्याचे लेखी पत्र देऊन अपिलार्थीची दिशाभूल केली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे तलवाडा, ता.गेवराई येथील ३३ के.व्ही. विद्युत उपकेंद्राशी संबंधित एकूण चार मुद्यांद्वारे काही माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - तलवाडा ३३ विद्युत उपकेंद्राअंतर्गत ग्राहकांनी विहिर,कॅनॉल,तलाव मोटार कोटेशनसाठी दि. २०.१०.२००० ते २०.१०.२००८ पर्यंत भरलेल्या कोटेशनच्या छायाप्रती, कोटेशन भरल्यानंतर कोटेशनधारकांना लाईट कनेक्शन देण्याचा कालावधी किती ? यांच्या छायांकित प्रती, तलवाडा ३३ के.व्ही. उपकेंद्राअंतर्गत कर्मचाऱ्यांचा या ठिकाणी राहण्याचा कार्यकाल किती आहे व प्रत्येक कोटेशन धारकांच्या टेस्ट रिपोर्टच्या छायाप्रती- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २३.१२.२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती

अपिलार्थीस दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो सन २००६-२००८ या कालावधीतील त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती मिळणे बाकी आहे. त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित सर्व मुद्यांची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस दि.२३.१२.२००८ रोजी विनामूल्य दिली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे संगणक प्रणालीद्वारे तयार (Generate) होत असते. ज्यावेळी कंपनीचे ग्राहक कोटेशनची रक्कम त्यांच्या कार्यालयात भरतात, त्यावेळी ही प्रक्रिया पूर्ण होत असते. याप्रकरणी त्यांच्याकडे सन २००६ ते २००८ या कालावधीमध्ये विद्युत जोडणीसाठी अर्ज केलेल्या सर्व ग्राहकांनी कोटेशन भरले नसल्यामुळे व परिणामी सदर माहिती अपिलार्थीस, संगणक प्रणालीची ही प्रक्रिया पूर्ण न झाल्याने, देता आली नाही.आता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील सन २००६ ते २००८ या कालावधीशी संबंधित माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना तीस दिवसांच्या आत का दिली नाही याची कारणे त्यांना विचारली असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती संगणक

प्रणालीची प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे, सॉफ्टवेअरद्वारे रिपोर्ट जनरेट होऊ शकली नाही व त्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस देणे बाकी असलेली जी आता संगणक प्रणालीद्वारे जनरेट होऊन अपिलार्थीस देण्यासाठी तयार असलेली माहिती ती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः १५-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ठकाराम जनार्धन सुरासे,रा. तलवाडा, ता.गेवराई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,उपविभाग, गेवराई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभाग बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०३३
निर्णय दिनांकः १५-१२-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. कुमार आबादेव मुळे,<br>रा. माजलगाव,जि.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी,<br>श्री. सिध्देश्वर वरिष्ठ महाविद्यालय, माजलगाव,<br>जि.बीड.<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यवाह, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,<br>अंबाजोगाई, जि.बीड. | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती पुरविल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी देखील माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यांची - जाहीरातीच्या पेपरची प्रत, बिंदू नामावलीची प्रत, एम्प्लॉयमेंट ऑफीस व समाजकल्याण ऑफीसकडून मागविलेल्या याद्यांची प्रत, स्टॅण्डर्ड कोड १९८४ नुसार गठीत केलेल्या निवड समितीची यादी - या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०८.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये श्री. सिध्देश्वर वरिष्ठ महाविद्यालय, माजलगाव यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीबाबत सन १९९६ ते २००१ या कालावधीशी संबंधित माहिती एकूण ८ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार कार्यवाह, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई यांच्याकडे दि. ०५.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले.परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील उर्वरित माहितीची मागणी त्यांच्या युक्तिवादामध्ये कायम ठेवली. अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त व्हावयाची माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत

आहेत.सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो द्यावयाची, त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील व या निर्णयातील सुरवातीच्या परिच्छेदामध्ये नमूद केलेली उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरवून जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी, श्री. सिध्देश्वर वरिष्ठ महाविद्यालय,माजलगाव,जि.बीड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदींचा भंग केल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रु. २५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊन नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**
**दिनांकः १५-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कुमार आबादेव मुळे, 'यशोधन',समता कॉलनी, माजलगाव,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी ,श्री. सिध्देश्वर वरिष्ठ महाविद्यालय, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यवाह, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०३४
निर्णय दिनांकः १५-१२-२००९

१. सौ. उषा राजेंद्र सानप, : अपिलार्थी
बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपसंचालक,
आरोग्य सेवा लातूर मंडळ, लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
आरोग्य सेवा लातूर मंडळ, लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक,आरोग्य सेवा लातूर
कार्यालय,लातूर

त्रयस्थ पक्ष : श्री. संतोष पोतदार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून या प्रकरणी सहसंचालक, आरोग्य सेवा पुणे व उपसंचालक,आरोग्य सेवा,लातूर यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेल्या कथित त्रयस्थ पक्ष श्री. संतोष पोतदार,कनिष्ठ लिपीक, यांच्या नेमणूकीसंदर्भात काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षाच्या नेमणूकीचे आदेश व टिपणीची प्रत, २००६ ते २००८ या कालावधीमध्ये एका ठिकाणी एक वर्षापेक्षा कमी सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बदली आदेशाच्या प्रती व याच कालावधीमध्ये एक वर्षापेक्षा कमी सेवाप्रवेश करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बदली आदेशाच्या प्रती- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१०.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अंतिम सुनावणीसंदर्भात दि. ०२.१२.२००८ रोजी अपिलार्थीस कळविले होते. तथापि यासंदर्भात कोणताही निर्णय त्यांना दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. सी.ए. झाल्टे, सहायक अधीक्षक हे आयोगासमोर उपस्थित आहेत. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या वेळी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी

यांच्याकडे माहिती मागितली होती त्यावेळी जन माहिती अधिकारी या पदावर श्री. आर.एस.बन हे मुख्य प्रशासकीय अधिकारी या पदावर कार्यरत होते. अपिलार्थीस आता त्यांच्या कार्यालयातर्फे दि. १८.०३.२००९ रोजी संपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती मागितली आहे तो त्रयस्थ पक्षच मूळात अस्तित्त्वात नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, प्राप्त होऊ शकणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने, त्यांच्या कार्यालयातर्फे निर्गमित केलेल्या सन २००६-२००८ या कालावधीतील एक वर्षापेक्षा कमी सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बदली आदेशाच्या प्रती - अशी माहिती अपेक्षिली आहे, तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित- एक वर्षापेक्षा कमी सेवाप्रवेश करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे बदलीचे आदेश - या मुद्याद्वारे अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे, याचा बोध होत नाही. त्यामुळे ही माहिती मोघम स्वरुपाची ठरते व ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील देय माहिती जन माहिती अधिकाऱ्याने, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर दिली आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे आता कोणतेही आदेश नाहीत. तथापि या प्रकरणी एक बाब प्रकर्षाने अशी जाणवत आहे की, अपिलार्थीच्या दि. ०८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. तत्कालीन मुख्य प्रशासकीय अधिकारी श्री. आर.एस.बन यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रतिसाद न देण्याच्या त्यांच्या अशाप्रकारच्या

कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव निःसंशयपणे सिध्द केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण) यांना संबंधित मुख्य प्रशासकीय अधिकारी, श्री. आर.एस.बन यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण) यांना संबंधित मुख्य प्रशासकीय अधिकारी, श्री. आर.एस.बन यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १५-१२-२००९**

**( वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. उषा राजेंद्र सानप, भक्ती कन्स्ट्रक्शन, शामनगर समोर, पर्णकुटी सोसायटी, बालेपीर, बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,उपसंचालक,आरोग्य सेवा लातूर कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,आरोग्य सेवा लातूर मंडळ, लातूर यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०३५
निर्णय दिनांकः १५-१२-२००९

१. श्री. टेकाळे शेषेराव एकनाथ, : अपिलार्थी
रा.कुपटी (मा.), ता.माहूर, जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
कार्यालय मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं),
जिल्हा परिषद, नांदेड.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती न दिल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी, यांना त्यांच्याकडील दि.०८.०१.२००८ रोजी केलेल्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीशी संबंधित कागदपत्रांची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन १९९७-९८ ते दि. ०१.०८.२००८ असा होता. तसेच अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या या अर्जासोबत त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नांदेड यांना उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दि. ०८.०१.२००८ रोजीच्या तक्रार अर्जाची प्रत देखील जोडली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दि. २२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जास उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) जिल्हा परिषद,नांदेड यांनी दि.०८.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन "अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही तक्रार स्वरुपाची बाब असल्याने तिचा समावेश माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये होत नसल्याने अपिलार्थीचा अर्ज मान्य करता येत नाही" असे अपिलार्थीस कळविले व अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला. या पत्राने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जिल्हा परिषद, नांदेड मध्ये त्यांच्या प्रकरणाशी संबंधित अधिकारी हे त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणाशी संबंधित माहिती अधिकारी हे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं), जिल्हा परिषद, नांदेड श्री. पी.बी.बलुरकर नावाचे अधिकारी होते. अपिलार्थीने प्रथम अर्ज करते वेळी ते माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. सध्या ते नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांची नेमणूक झाल्याचेही माहिती अधिकाऱ्याचे उपस्थित प्रतिनिधी श्री. एम.एन.केंद्रे यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दि. ०८.०१.२००८ रोजी केलेल्या अर्जावर जिल्हा परिषदेने काय कार्यवाही केली एवढीच माहिती मागितली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने संदर्भित केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेली कार्यवाही, याचा अर्थ अर्जदाराने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेला अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्यापासून त्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या प्रथम अर्जाच्या दिनांकापर्यंत विविध प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती आणि या विषयासंदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्यात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधितांनी नोंद केलेले अभिप्राय आणि टिपणीच्या प्रती अशाप्रकारच्या माहितीचा समावेश होतो. त्यामुळे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीने जिल्हा परिषदेकडे दि. ०८.०१.२००८ रोजी केलेल्या अर्जावर त्यांच्या कार्यालयातर्फे दि. ०१.०८.२००८ पर्यंत सर्व प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती आणि यासंदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती, त्यांना अपिलार्थीस द्याव्या

लागतील. या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीस दि.०८.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद हा पूर्णतः चुकीचा आणि गैर आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, एवढीच माहिती मागितली असताना, तक्रार स्वरुपाची बाब माहिती अधिकार अधिनियमात येत नाही, असे तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) यांनी अपिलार्थीस कळविले, जे पूर्णपणे गैर व चुकीचे आहे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. तथापि ते आता नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांच्यावर कारवाईचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे)**

**दिनांकः १५-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. टेकाळे शेषेराव एकनाथ,रा.कुपटी (मा.), ता.माहूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२३४
निर्णय दिनांक १५/१२/२००९

१ श्री. फारुख कुरेशी,
रा. जाफ्राबाद, जि. जालना : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
जाफ्राबाद, जि. जालना : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
जाफ्राबाद, जि. जालना

**निर्णय**

श्री. फारुख कुरेशी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १६.०७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०६.१२.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.०४.०२.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम

अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४२ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. फारुख कुरेशी, मु.पो. जाफ्राबाद, ता. जाफ्राबाद, जि. जालना.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२३५
निर्णय दिनांक १५/१२/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शेख मुस्तफा मोईन,<br>रा.गंगाखेड, जि. परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>आयुक्त तथा संचालक,<br>नगर पालिका प्रशासन संचालनालय,<br>वरळी, मुंबई | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक (अस्थापना),<br>नगर परिषद प्रशासन संचालनालय,<br>शासकिय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला,<br>वरळी, मुंबई ३० | | |

**निर्णय**

श्री. शेख मुस्तफा मोईन यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १७.०६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०९.०९.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२२.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा २५ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख मुस्तफा मोईन, जैंदिपूरागल्ली, ता. गंगाखेड, जि. परभणी.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२३६
निर्णय दिनांक   १५/१२/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुधाकर आर. जाधव<br>रा. नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तहसीलदार कार्यालय, नाशिक | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी,<br>तहसीलदार कार्यालय, नाशिक | | |

**निर्णय**

श्री. सुधाकर आर. जाधव यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०३.०३.२००९  रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल   झालेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने दि. ०१.०८.२००८ रोजीच्या माहितीच्या अर्जासंबंधी दि.२०.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपीलावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी वर नमूद केलेले व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) मधील तरतूदीनुसार प्रथम अपीलाच्या दिनांकापासून १२० दिवसाचे आत द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते.  तथापि, प्रस्तुत अपीलाची प्राथमिक तपासणी केली असता, हे अपील अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या दिनांकापासून १२० दिवसापेक्षा ४३ दिवस इतक्या जास्त दिवसाच्या विलंबाने दाखल

केले आहे. सदरचे विलंबाबाबत अपिलार्थी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण आयोगासमोर सादर केले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुत अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १५/१२/२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१) श्री. सुधाकर आर. जाधव, एन-४१, जेए-३-१२-१, सावतानगर, ४ थी स्किम, नवीन सिडको, नाशिक-८.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७६२

निर्णय दिनांक १५-१२-२००९

१ श्री. गोपाळराव अंबादासराव बोरीकर, : अपिलार्थी
रा. पंचवटी-गंगा निवास, शिवाजीनगर, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. सुधाकर पंढरीनाथ जावळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना, जन माहिती अधिकाऱ्यांनी

माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर कलम २० प्रमाणे कार्यवाही व्हावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष  श्री. सुधाकर पंढरीनाथ जावळे, सेवाअंतर्गत पदवीधर प्राथमिक शिक्षक, यांच्या संदर्भात एकूण दहा मुद्याव्दारे काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतूदीनुसार दिनांक १५-०४-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक १७-०६-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीचा मतितार्थ काढून उपलब्ध असलेली व वस्तुनिष्ठ व अद्यावत माहिती अपिलार्थीस दिनांक १०-०६-२००८ पूर्वी पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेश दिले.  सदर आदेश जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील अपील अर्जावर दिनांक २७-०५-२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी त्यांनी दिले होते.  परंतु हे आदेश लिखीत  स्वरुपात जन अपिलीय अधिकाऱ्याने अपिलार्थीस माहिती देण्याची मुदत संपल्यानंतर निर्गमीत केल्याचे आढळून येत आहे.  तथापि या आदेशानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न  झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे  विचाराधीन अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १३-११-२००९ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पोस्टाव्दारे पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातर्फे पुरविण्यात आलेली माहिती आयोगास सादर केली आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'ब', 'क'', व 'य' या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) च्या तरतुदीमध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा खुलासा मागणे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलची कारणे आणि खुलासे अर्जदारास देणे अशा प्रकारच्या प्रक्रियांचा माहिती अधिकार अधिनियमामध्ये समावेश नाही. परंतु अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'अ' व 'ड' शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णतः देय आहे. त्यापैकी मुद्दा क्रमांक 'अ' शी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १३-११-२००९ रोजीच्या पत्रामध्ये दिलेली आहे. परंतु याच पत्रातील मुद्दा क्रमांक 'ड' च्या संदर्भात माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही पूर्णतः चुकीची आहे. अपिलार्थीने परावर्तीत पदावर जिल्हा परिषदेने शिफारस केलेल्या शिक्षकांची यादी मागविली असता या यादीसंदर्भात त्यांनी या पत्रामध्ये कोणतेही भाष्य केलेले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्यावर माहिती पुरवली नसल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'इ' मध्ये अपिलार्थीने त्यांना सन १९८७-८८ साली कोणत्या निकषावर डावलण्यात आले याची माहिती मागविली असता, या संदर्भात अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही भाष्य केलेले नाही. त्यामुळे माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस या पत्रामध्ये मुद्दा

क्रमांक 'इ' व्दारे दिलेली माहिती देण्याचे टाळले असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक 'ई', 'क', 'ग', 'घ', 'फ', 'भ' व 'ह' या मुद्यांमधील अंशतः माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या मुद्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी जिल्हा परिषद, शिक्षण विभाग (प्राथमिक), औरंगाबाद यांच्या दिनांक २३-१२-९६ च्या परिपत्रकाप्रमाणे ज्या शिक्षकांची प्रशिक्षणासाठी निवड झाली त्यांची यादी मुद्दा क्रमांक 'फ' मध्ये विहामांडवा प्रशालेने दिनांक २०-०१-१९९५ व्दारे पाठविलेल्या माहितीमध्ये श्री. जावळे यांची शिफारस करुनही त्यांना ज्या निकषावर डावलण्यात आले ते निकष, या वर्षी बी. एड. पदवी प्राप्त न केलेल्या शिक्षकांची एकूण संख्या व त्यांची यादी या मुद्यावर, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा 'ग' मधील श्री. जावळे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व प्रधान सचिव, शिक्षण विभाग यांना वेळोवेळी केलेल्या (या अर्जांच्या दिनाकांचा उल्लेख अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये आहे) अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे काय कार्यवाही करण्यात आली, त्या अर्जावर कोणत्या टिपणी केल्या त्याच्या प्रती ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. या संदर्भात देखिल जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये दिलेले उत्तर हे दिशाभूल करणारे दिलेले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'घ' वरील शिक्षण खात्याच्या चुकीमुळे त्यांना प्रशिक्षणास मुकावे लागले याबाबत संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली, अशी अपिलार्थीने माहिती मागितली असता, याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'फ' मधील श्री. जावळे यांच्या झालेल्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असणा-या व्यक्तीवर काय कार्यवाही केली या मुद्यावर देखिल जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस चुकीचे व दिशाभूल करणारे उत्तर दिल्याचे दिसून येत आहे. मुद्दा क्रमांक 'ह' मधील श्री. जावळे यांची वेतन निश्चिती न होण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर काय कार्यवाही

केली, या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीमध्ये कोणतेही भाष्य केलेले नाही, असे आयोगास आढळून येत आहे. यापूर्वी या अपिलाची सुनावणी दिनांक १२-११-२००९ रोजी झाली असता औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना या संदर्भात प्रत्येक मुद्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणती माहिती त्यांनी अपिलार्थीस देणे अभिप्रेत आहे हे तोंडी सूचित करुनही एक महिन्याच्या कालावधीनंतरही जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने अपिलार्थीस परत चुकीची आणि दिशाभूल करणारी माहिती त्यांच्या दिनांक १३-११-२००९ रोजीच्या पत्राव्दारे दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली कथित माहिती पाहता, अपिलार्थीने मागितलेली माहिती जणू अपिलार्थीस द्यावयाचीच नाही असा संबंधित अधिकारी व त्यांच्या कार्यालयाने निश्चय केला आहे की काय असे आयोगास जाणवत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरविले आहे. सबब सचिव (शालेय शिक्षण) यांना संबंधित शिक्षणाधिकारी व शिक्षण विभागातील त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक करवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. याच बरोबर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या कार्यालयातील जिल्हा परिषदेचे जे कर्मचारी या प्रकरणाशी संबंधित आहेत या सर्वांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे. अपिलार्थीस अपेक्षित माहिती त्यांना स्पष्टपणे देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्यांना देय असलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येत

आहे की, शिक्षण विभागातील माहिती अपिलार्थीस पाठविण्यापूर्वी या माहितीची त्यांनी स्वतः तपासणी करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (शालेय शिक्षण) यांना संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद या प्रकरणाशी संबंधित त्यांचे शिक्षण विभागातील सहाय्यक यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जिल्हा परिषदेच्या सर्व संबंधितांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोपाळराव अंबादासराव बोरीकर, सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी, पंचवटी-गंगा,

निवास, शिवाजीनगर, वसमत रोड, परभणी- ४३१ ४०१

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०२६

निर्णय दिनांक १५-१२-२००९

१ श्री. कृष्णदास शंकरराव सोमासे, : अपिलार्थी

ई-३०-१-२, गुलमोहर कॉलनी, सिडको एन -५, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. दौलत रामभाऊ शिंदे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे पूर्ण शुल्क वसूल करुनही अपूर्ण माहिती दिली, प्रथम अपिलीय अधिका-याने त्यांच्या अपिलाची सुनावणी घेतली नाही व श्री. दौलत रामभाऊ शिंदे हे दिनांक ३१-०१-२००८ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवेबाबत उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जालना यांनी उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, औरंगाबाद यांना काय अहवाल पाठविला त्याची

माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविली गेली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्रयस्थ पक्ष श्री. दौलत रामभाऊ शिंदे यांच्या सेवेबाबत उप संचालक सामाजिक वनीकरण, जालना यांनी उप संचालक सामाजिक वनीकरण, औरंगाबाद यांना पाठविलेल्या अहवालाची छायांकीत प्रत ही आपली मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. दौलत रामभाऊ शिंदे यांच्यासंदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. दौलत रामभाऊ शिंदे यांच्या विरुध्द चालू असलेल्या विभागीय चौकशीचा निर्णय झाला असल्यास त्या निर्णयाची साक्षांकीत प्रत, त्रयस्थ पक्ष श्री. दौलत रामभाऊ शिंदे हे लागवड अधिकारी, परिक्षेत्र भोकरदन येथे कार्यरत असतांना त्यांच्याविरुध्द लाचलुचपत विभागामार्फत चालू असलेल्या चौकशीच्या निर्णयाची साक्षांकीत प्रत व श्री दौलत रामभाऊ शिंदे दिनांक ३१-०१-२००८ रोजी सेवानिवृत्त झाले असतांना त्यांच्या सेवेबाबत जन माहिती अधिकारी यांनी जो अहवाल पाठविला आहे त्या अहवालाची साक्षांकीत प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ९ इतके आकारुन त्यांना माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती दिली गेल्याच्या निर्णयाची प्रत येऊन अपिलार्थीचे अपील खारीज केले. जन

अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-११-२००८ व दिनांक २१-११-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि काही अपरिहार्य कारणामुळे जन अपिलीय अधिकारी यांना ती सुनावणी घेता आली नाही. त्यामुळे त्यांनी अंतीमतः दिनांक ०८-१२-२००८ रोजी सुनावणी घेतली व आपले आदेश पारीत केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून त्यामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी सुरुवातीला अपिलार्थीस ९ रुपये इतक्या रकमेचे चलन भरण्याबाबत कळविले होते. यावरुन अपिलार्थीस त्यांना प्रथमतः संपूर्ण माहिती द्यावयाची होती असे दिसून येते. कारण दीड रुपया प्रतीप्रमाणे सहा प्रतीकरिता खर्च ९ रुपये होतो. परंतु अंतीमतः जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दोन पृष्ठांची माहिती पुरविली. त्यामुळे प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांचा खर्च ३ रुपये झाला आहे. याचाच अर्थ त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक अपूर्ण माहिती पुरविली आहे. तसेच अपिलार्थीने दिनांक ०८-१०-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. त्यावेळी जर सुनावणी घेतली असती तर उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जालना यांच्या कार्यालयातील जावक नोंदवही व श्री. डी. आर. शिंदे यांची वैयक्तीक संचिका तपासता आली असती, म्हणजेच मुद्दामहून त्यांनी सुनावणी घेतली नाही असे सिध्द होत आहे. त्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी श्री. व्ही.

ए. सोनवणे व प्रथम अपिलीय अधिकारी यांना शिक्षा द्यावी अशी त्यांनी या युक्तिवादामध्ये आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली आणि त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सशुल्क पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या दोन इतकी आहे. या माहितीमध्ये प्रतिपृष्ठ रुपये दोन प्रमाणे चार रुपये व अपिलार्थीस प्रथमतः आवश्यक ते शुल्क कळविण्यासाठी करण्यात आलेल्या पत्रव्यवहारापोटी त्यांना आलेला खर्च रुपये ५ असा एकूण रुपये ९ इतका खर्च या प्रकरणी त्यांनी केलेला आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले आहे की, त्रयस्थ पक्ष श्री. शिंदे, तत्कालीन लागवड अधिकारी यांच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चालू असलेल्या कथित चौकशीचा अहवाल त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला नाही. त्यामुळे ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. तसेच त्रयस्थ पक्ष श्री. दौलत रामभाऊ शिंदे यांना नाहरकत प्रमाणपत्र त्यांच्या कार्यालयाकडून पारीत केले गेले नव्हते व त्यांच्या कार्यालयाच्या नाहरकत प्रमाणपत्राशिवाय त्रयस्थ पक्षास सेवानिवृत्ती वेतन मंजूर केले गेले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीच्या अर्जातील तीनही मुद्दयांवरील माहिती दिली आहे. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिली आहे. या माहितीमध्ये आयोगास असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध असलेली माहिती पूर्णतया पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या लाचलुचपत विभागामार्फत चालू असलेल्या चौकशीच्या निर्णयाची प्रत आवश्यक असेल तर त्यांनी तसा अर्ज लाचलुचपत विभागाकडे करावा.

या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. तसेच त्रयस्थ पक्षाच्या सेवेसंदर्भात नाहरकत प्रमाणपत्र हे उप संचालक सामाजिक वनीकरण विभाग, औरंगाबाद यांच्यामार्फत दिले गेले असल्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उप संचालक सामाजिक वनीकरण विभाग, औरंगाबाद यांनी पाठविलेल्या त्रयस्थ पक्षाच्या नाहरकत प्रमाणपत्राची प्रत हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत प्राप्त करुन घ्यावी आणि अपिलार्थीस पुरवावी. उप संचालक सामाजिक वनीकरण, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, सहायक संचालक, सामाजिक वनीकरण, जालना यांच्याकडून अशा प्रकारची विनंती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील ही माहिती सामाजिक वनीकरण विभाग, जालना यांना त्वरीत द्यावी जेणेकरुन अपिलार्थीस ही माहिती १५ दिवसाच्या आत देणे जन माहिती अधिकारी यांना शक्य होईल.

अपिलार्थीस माहितीपोटीच्या आकारलेल्या शुल्काबाबत असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीस कळविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आलेला खर्च त्यांनी अपिलार्थीकडून वसूल करणे, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत नाही. अर्जदाराला माहिती देतांना प्रत्यक्षात त्यांना जितक्या पृष्ठांची माहिती दिली जाते तितक्या पृष्ठांकरीता प्रतिपृष्ठ रु. २ इतके शुल्क अधिक ही माहिती पोस्टाने पाठविण्याकरिता लागणारे पोष्टाचे शुल्क इतकी रक्कम जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून प्राप्त करुन घेणे या अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतूदीव्दारे अभिप्रेत आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहारापोटीचे शुल्क रुपये पाच इतके त्यांना अपिलार्थीस याच कालावधीमध्ये परत करावे लागेल.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर दडवून ठेवली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने व तसेच माहिती अधिकार

अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांना शास्ती करण्याची अधिकारिता आयोगास नसल्याने, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती आयोग मान्य करत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील क्रमांक "क" शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून पोस्टाचे शुल्क म्हणून आकारलेले अतिरिक्त शुल्क रुपये पाच इतके अपिलार्थीस, हे निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कृष्णदास शंकरराव सोमासे, ई-३०-१-२, गुलमोहर कॉलनी, सिडको एन -५, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, जालना

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०२७

निर्णय दिनांक १५-१२-२००९

१ श्री. बनकर रंगनाथ अंबादास, : अपिलार्थी

रा. मोहन बिल्डींग, रुम नंबर १५, भाजीमंडी रोड,

कूंभारवाडा, औरंगपूरा, औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

कृषी अधिकारी कार्यालय, जाफ्राबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

कृषी अधिकारी कार्यालय, जाफ्राबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मंडळ कृषी अधिकारी, जाफ्राबाद, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषी अधिकारी, जाफ्रबाद, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी उत्तर न दिल्यामुळे आणि त्यांना माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००४-०५ ते २००७-०८ या कालावधी-तील मौजे सातेफळ येथे कृषि उपविभागाअंतर्गत झालेल्या रोजगार हमी योजनेतील केलेल्या कामाच्या संदर्भात एकूण आठ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठ्या प्रमाणात असल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तपासणीसाठी उपलब्ध असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे सूचित केले आणि या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि ही प्रत अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने व आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आवश्यक असल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०१-१०-२००८ रोजीच्या पत्राच्या सूचनेप्रमाणे त्यांच्याकडील दिनांक १३-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे

विनामूल्य पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस ही माहिती अद्यापपावेतो प्राप्त झाली नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेली कथित माहिती ही अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत आहे. तथापि अपिलार्थीस ही माहिती अद्यापपावेतो प्राप्त झाली नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस जी माहिती पुरविली आहे त्याची एक अतिरिक्त प्रत अपिलार्थीस परत त्यांच्या कार्यालयात दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयातून स्वतः हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः त्यांच्या कार्यालयातून उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बनकर रंगनाथ अंबादास, रा. मोहन बिल्डींग, रुम नंबर १५, भाजीमंडी रोड, कूंभारवाडा, औरंगपूरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी, जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, जाफ्रबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०२८

निर्णय दिनांक १५-१२-२००९

१ श्री. रंजीतराव बळीरामजी गरुड, : अपिलार्थी
मु. पो. पिंगळी, तालुका जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधिक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास
प्राधिकरण, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : सहायक अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना पिंगळी येथील पाणी न मिळाल्याने व चारी गाळ न काढल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व या अपील अर्जाव्दारे त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पारडगांव वितरिका (ब) क्षेत्र पिंगळी येथील अपिलार्थीच्या शेतात पाणी न मिळाल्याबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" मला नेहमीच पाणी मिळत नाही, गाळ कधीच काढत नाहीत, गाळ कधी काढला, मजूर कोठले होते त्यांची नावे द्या, आजच पाहणी करा माझ्या समक्ष, गाळाने चारी भरली आहे, तुम्हाला अर्ज करुन काहीच होत नाही, त्याकरिता आता गाळ कधी काढणार, गुत्ते किती रुपयास दिले ते कळवा नसता मार्ग सांगा, आम्ही मार्ग शोधला तोही तुम्ही तात्काळ पाहणी केली तर म्हणजे तुम्हाला शेतक-याच्या गल्ली गेल्यावर गाव पाण्याच्या माहितीची सभा कधीच घेतली नाही, सर्व शेतकरी एकत्र घेतली असल्यास गावात या सांगा."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील ०६-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रुपये चार इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-११-२००८ रोजीच्या पत्राने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी करण्याचे सूचित केले व अपिलार्थीस त्यांचे प्रथम अपील दाखल करुन घेता येणे शक्य नसल्याचे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-१०-२००८ रोजीच्या पत्रामध्ये सूचित केल्याप्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात दिनांक १७-१०-२००८ रोजी केला. त्यानंतर दिनांक १८-१०-२००८ रोजी अपिलार्थीस माहिती दिली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जावरुन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती अपेक्षित आहे याचा स्पष्ट बोध होत नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या कालावधीशी संबंधित माहिती अपेक्षित आहे त्या कालावधीचा उल्लेख मूळात केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज अवैध ठरत आहे व परिणामी अपिलार्थीचे विचाराधीन अपील देखील अवैध ठरत आहे. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस पारडगांव वितरिका क्षेत्र पिंगळी येथे पाणी देण्यासंदर्भात व गाळ काढण्यासंदर्भात काही माहिती पुरविली आहे. हे पाहता अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रंजीतराव बळीरामजी गरुड, मु. पो. पिंगळी, तालुका जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक २, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सहायक अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०२९

निर्णय दिनांक १५-१२-२००९

१ श्री. प्रकाश माणिकराव दुधाटे, : अपिलार्थी

रा. माऊली नगर, वसमत रोड, खानापूर फाटा, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

त्रयस्थ पक्ष : १. श्री. पी. एम. दुधाटे

२. श्री. एच. कुलथे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्धवट व अपूर्ण दिली गेली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. दुधाटे, कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती, औंढा व श्री.

कुलथे, कनिष्ठ लेखाधिकारी, वित्त विभाग, हिंगोली यांच्या दिनांक १२-११-२००७ रोजीच्या केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीशी संबधित काही माहिती पाच मुद्दयाव्दारे व्यक्तिशः मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे दिनांक ०४-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना काय निर्णय दिला हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. परंतु यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीविषयी अपिलार्थीने विचाराधीन अपिलात आपले जे आक्षेप नोंदविले आहेत त्यामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हेतुपुरस्सर माहिती देण्याचे टाळल्याचे व त्यांना अपूर्ण माहिती दिल्याचे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'अ', 'ब', 'क' व 'ड' च्या संदर्भात नमूद केले आहे व वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-१२-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती माहिती दिली हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आणि संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हेतुपुरस्सर माहिती देण्याचे टाळले असल्याचे नमूद केले आहे. तथापि या संदर्भात त्यांनी कोणताही पुरावा आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. तथापि अपिलार्थीस या संदर्भात न्याय मिळण्याच्या दृष्टीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, परभणी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस या प्रकरणी त्यांच्या दिनांक ३०-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली देय असलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध होईल याची दक्षता घ्यावी व त्यांचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या, मूळ अर्जातील त्यांना देय असलेली परंतु त्यांना अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५-१२-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रकाश माणिकराव दुधाटे, रा. माऊली नगर, वसमत रोड, खानापूर फाटा, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०२५

निर्णय दिनांक १५.१२.२००९

१ श्री. वाघचौरे सुरेश रामराव, : अपिलार्थी

मु. रामराई, पो. वाळूज, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल

विकस प्रकल्प, गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी : | बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, गंगापूर, जि. औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी : | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद, औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास कोणत्याही स्वरुपाची विशिष्ट अशी विनंती केलेली नाही परंतु आपल्या मूळ माहितीचा अर्ज सोबत जोडला आहे. यावरुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती अपेक्षित असावी असे अनुमान काढण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे गंगापूर तालुक्यातील अंगणवाडी कार्यकर्ता मदतनीसच्या जागांच्या भरती संदर्भात एकूण सहा मुद्याद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २५०/- इतके चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या प्रमाणे माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा न करता दिनांक २४.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ते आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २५०/- इतके भरण्यास तयार असल्याचे फक्त पत्र, व्यक्तिशः दिले. या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी "अपिलार्थीच्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करुन घ्यावा", असा गट विकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयास उद्देशून अभिप्राय दिला व अपिलार्थीस हे शुल्क पंचायत समिती कार्यालयात भरण्याचे सूचित केले. परंतु अपिलार्थीने या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १२.११.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५.०१.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि दिनांक ०८.०१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामार्फत अपिलार्थीने १२५ पानाची मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य हस्तांतरीत केली. ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची सही असलेली कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली. या पोच

सही बरोबर अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून 'अपूर्ण माहिती मिळाली ' असा अभिप्राय नोंदविला आहे. व त्यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०८.०१.२००९ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य व व्यक्तिशः हस्तांतरीत केली आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस अपूर्ण का वाटत आहे, याबद्दल त्यांना काहीही माहीत नाही. तसेच अपिलार्थीस निश्चित कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती हवी आहे, हे आयोगास अवगत करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज करतांना त्यांना निश्चित कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, याचा उल्लेख त्यांनी केलेला नाही. अपिलार्थीने अंगणवाडी कार्यकर्ता मदतनीसांच्या जागेच्या भरती संदर्भात माहिती मागविली आहे. कोणत्याही प्राधिकरणामध्ये कर्मचाऱ्यांची रिक्त पदावर भरती ही निरंतर चालणारी प्रक्रिया असते, त्यामुळे या भरती प्रक्रियेसंदर्भात माहिती मागताना निश्चित कालावधीचा उल्लेख करणे अर्जदारास अनिवार्य आहे. तथापि या प्रकरणी अशा कोणत्याही विशिष्ट कालावधीचा उल्लेख अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये न केल्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्जच मूळात अवैध ठरत आहे. त्यामुळे अपिलार्थीस या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दिलेली कोणतीही माहिती ही, अपिलार्थीस ती कोणत्याही

कालावधीशी संबंधित असली तरी, सतत अपूर्ण वाटत राहणार . त्यामुळे अपिलार्थीने कोणत्याही विशिष्ट कालावधीचा उल्लेख न करुनही एखाद्या निरंतर प्रक्रियेविषयी अपिलार्थीस माहिती पुरविण्याची जन माहिती अधिकारी यांची ही कृती चूकीची आहे, हे येथे विशेषत्वाने नमूद करण्यात येत आहे. अशा परिस्थितीत या प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्जच मूळात निश्चित कालावधीच्या उल्लेखाअभावी अवैध असल्याचे सिध्द होत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वाघचौरे सुरेश रामराव, मु. रामराई, पो. वाळूज, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, गंगापूर, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०३०

निर्णय दिनांक १५.१२.२००९

१ श्री. अण्णासाहेब ज्ञानोबा साखरे व : अपिलार्थी
श्री. भागवत प्रभु साखरे,
मु. कानडीबदन, पो. बोरी सावरगांव,
ता. केज, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,
कानडीबदन, मु. कानडीबदन, पो. बोरी
सावरगांव, ता. केज, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
केज, ता. केज, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२.१२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकाऱ्याने मुदतीच्या आत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास

अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी या अपिलाची सुनावणी घेतली नाही अथवा अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. अपिलार्थीने या अर्जाद्वारे आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००२ ते दिनांक २७.०८.२००८ या कालावधीतील काही माहिती एकूण सात मुद्याद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे दिसून येत आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.१२.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५.०९.२००८ रोजी टपालाद्वारे माहिती पाठविल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जातील जे मुख्य मुद्दे आहेत त्या मुद्यांची सन २००२ ते २००५ पर्यंतच्या कालवधीतील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली नाही. अपिलार्थीस माहिती न देण्याचे कारण म्हणजे संबंधित ग्रामसेवकाने सध्याच्या ग्रामसेवकाकडे त्यांचा पदाचा पदभार हस्तांतरीत केला नाही, असे लिहिले आहे. याच बरोबर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी जन्म मृत्यूच्या नोंदी त्यांच्या वरिष्ठ कार्यालयास केव्हा कळविल्या, अशी माहिती विचारली असता, या नोंदी त्यांनी वरिष्ठांना महिनाअखेरीस कळविल्या, अशी मोघम स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली आहे. ग्रामपंचायत कार्यालयाच्या कामकाजाच्या संदर्भातील सन २००२ ते २००५ या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली सन २००२ ते २००५ या कालावधीतील माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व पोस्टाद्वारे पुरवावी. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी मौजे कानडीबदन, पोस्ट बोरी सावरगांव, तालुका केज येथील तत्कालीन ग्रामसेवकाविरुध्द, त्यांनी ग्रामपंचायतीचे अभिलेखे त्यांच्या बदलीनंतर त्यांच्या जागी येणाऱ्या ग्रामसेवकाकडे हस्तांतरीत न केल्याबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करावी, आणि जर आता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीस उपरोक्त प्रकरणी देऊ शकले नाहीत तर संबंधित ग्रामसेवकावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तात्काळ फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी, जेणेकरुन ग्रामसेवकांच्या

अशाप्रकारच्या कार्यभार हस्तांतरित न करण्याच्या प्रवृत्तीस वेळीस आळा घालता येईल. या प्रकरणी अपिलार्थीस वरीलप्रमाणे अपूर्ण माहिती देऊन या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना करण्यात येत आहे. तसेच या प्रकरणी जर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर वेळेत सुनावणी घेतली असती तर, अपिलार्थीस ही माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता आयोगाकडे द्वितीय अपील करावे लागले नसते व त्यांना वेळेत माहिती प्राप्त झाली असती. जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेण्याच्या त्यांच्या बेपर्वा व बेजबाबदार कार्यशैलीची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती अत्यंत अस्पष्ट अशा स्वरुपात आहे. त्यामुळे ही माहिती देखिल जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्पष्ट स्वरुपात देणे भाग आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व वाचनीय स्वरुपात अपिलार्थीस हस्तांतरित करावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. गडगे जनार्दन यांचेवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १५.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. आण्णासाहेब ज्ञानोबा साखरे व श्री. भागवत प्रभु साखरे, मु. कानडीबदन, पो. बोरी सावरगांव, ता. केज, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, कानडीबदन, मु. कानडीबदन, पो. बोरी सावरगांव, ता.केज, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, ता. केज, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.